# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# भारतीय अर्थव्यवस्था

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**ऐच्छिक पेपर १ व २**

**बी. ए. भाग-१ : अर्थशास्त्र**

**सेमिस्टर १ व २ करिता**

# घटक – १

## स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास

## (Economic Development since Independence)

**अनुक्रमाणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेची मुलभूत वैशिष्टये

१.२.२. भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल

१.२.३ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास.

१.२.४ शाश्वत विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


### १.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेंची मुख्य वैशिष्ट्ये लक्षात येतील.

२. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत झालेले संरचनात्मक बदल लक्षात येतील.

३. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना अभ्यासता येईल.

४. भारतीय अर्थव्यवस्थेच्या 'शाश्वत विकासाचे महत्व' समजावून घेता येईल.

### १.१ प्रास्ताविक :

आपला भारत ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि संवैधानिक पाया असलेली प्रजासत्ताक राज्यव्यवस्था २६ जानेवारी १९५० रोजी आपण स्वीकारली. भयावह दारिद्र्य, मागासलेली शेती, पारंपारिक व आजारी उद्योग, निरक्षरता अशा आव्हानांना सामोरे जात देशाने 'कल्याणकारी

राज्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू केली. १९५१ पासून देशाने 'नियोजनाचा' अंगिकार केला. शेती, पायाभूत क्षेत्र, उद्योग, ग्रामीण विकास, शिक्षण, दारिद्र्य निर्मुलन, रोजगारनिर्मित्ती व अणुऊर्जा इ. विविध क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा झाल्या. हरीतक्रांती व औद्योगिक धोरण यांद्वारे शासनाने १९९० च्या दशकापर्यंत विकासामध्ये सक्रिय सहभाग घेतला. १९९१ नंतर स्वीकारण्यात आलेल्या नव्या औद्योगिक धोरणांद्वारे खासगी क्षेत्राला उत्तेजन, स्पर्धाक्षमतेतील वाढ, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढ, माहिती तंत्रज्ञान व अभियांत्रिकी इ. क्षेत्रातील विकास यावर भर दिला गेला. निर्गुंतवणुक धोरण, कर सुधारणा, डिजीटल क्रांती, बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा यांनाही प्राधान्य दिले गेले. मात्र वर्तमानात देशासमोर संकटातील शेती व शेतकरी वर्ग, वाढती महागाई, रूपयाची घसरण, वाढता कर्जबाजारीपणा व वित्तीय तूट असे गंभीर प्रश्नही उभे आहेत.

## १.२ विषय विवेचन : (Subject Description)

प्रस्तूत घटकामध्ये आपण भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्याच्या वेळची वैशिष्ट्ये, भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल, भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वसमावेशक वृद्धी आणि शाश्वत विकास या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ स्वातंत्र्याच्या वेळची भारतीय अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये –

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन करताना डॉ. जे.एस.मिल यांनी तिचे वर्णन पुढील शब्दांमध्ये केलेले दिसून येते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यप्राप्ती वेळची भारतीय अर्थव्यवस्था ही वसाहतवादी, मागास, अर्थ सरंजामशाही व स्थिर स्वरूपाची होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच देशाची फाळणी झाल्यामुळे पाकिस्तानमध्ये देशातील बराच मोठा भाग गेल्याने अनेक आर्थिक प्रश्न निर्माण झालेले होते. या पार्श्वभूमीवर तत्कालीन भारतीय अर्थव्यवस्थेची दिसून येणारी ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

#### १. वसाहतवादी अर्थव्यवस्था

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९४७ पर्यंत सुरूवातीला १८५७ पर्यंत इस्ट इंडिया कंपनीने व नंतर ब्रीटन सरकारने प्रामुख्याने व्यापारी दृष्टिकोण समोर ठेऊन भारताची अर्थव्यवस्था एक वसाहत म्हणून वापर केला होता. परिणामी ब्रीटनसह इतर जगाशी भारताचे व्यापारी संबंध हे भारताच्या दृष्टीने सातत्याने प्रतिकूलच राहीले. कारण ब्रिटन भारतातून कच्च्या मालाची मोठ्या प्रमाणावर आयात करत असे व पुन्हा ब्रिटनच्या कारखान्यांमध्ये तयार झालेला पक्का माल भारतात निर्यात केला जात असे. परिणामी या व्यापारातून फार मोठा नफा ब्रिटनलाच होत राहीला. शिवाय ब्रीटनने भारतामध्ये रेल्वे, जहाज, रस्ते, टपाल, टेलीफोन, उद्योग इ. क्षेत्रांमध्ये जी प्रचंड गुंतवणूक केलेली होती याच्या भांडवलावरील नफा, गुंतवणुकीवरचे व्याज, लाभांश ब्रीटनलाच मिळत गेले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था सातत्याने दुबळी होत गेली. भारतीय संपत्तीचे हे नि:सारण सर्वप्रथम शास्त्रीय पद्धतीने आकडे–वारीसह मांडण्याचे काम दादाभाई नौरोजी यांनी केले. 'गृह खर्च' या गोंडस नावाखाली भारतीय संपत्तीची लूट ब्रिटीशांनी राजरोसपणे १५० हून जास्त वर्षे केली. निर्यात कमी व आयात प्रचंड अशी तुटीची व्यापार निती स्वतःच्या स्वार्थाकरता अवलंबिली जात होती.

#### २) आर्थिकदृष्ट्या शोषीत अर्थव्यवस्था

ब्रिटीशांनी व्यापारी व राजकीय हेतूंनी जी धोरणे राबविली त्यातून भारतीय अर्थव्यवस्थेची सातत्याने

पिळवणूक व शोषण झाले व ब्रिटनचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा झाला. १७५७ पासून सुरू झालेली भारताची आर्थिक लूट देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ ते ३% एवढी प्रचंड होती. यातूनच अर्थव्यवस्थेत एक कायमस्वरूपी स्थिरावलेपणा आलेला होता.

**३) अनुत्पादक श्रम –**

भारतातील लघु, कुटीर व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांमधील श्रमिकांची उत्पादकता ही फारच अल्प होती. त्यावेळचा भारतातील सर्वात मोठा श्रमावरील उद्योग म्हणजे 'कापड उद्योग'. सन १९४५ च्या आकडेवारीनुसार भारतातील कापड उद्योगातील प्रति श्रमिक उत्पादकता १.९ किलो होती. त्याच वेळ जपानमध्ये हे प्रमाण ३.३ किलो व अमेरिकेमध्ये ६.९ किलो एवढे जास्त होते.

**४) पारंपरिक औद्योगिक संरचना :**

पारंतत्र्याच्या काळातील भारतीय उद्योग हे प्रामुख्याने पारंपारिक स्वरूपाचे होते. घरगुती हस्तोद्योगांचा ऱ्हास होऊन नवे औद्योगिक प्रारूप उदयाला आले. कारण त्यावेळची ही नवी औद्योगिक रचना ही खूपच विषम होती. प्राथमिक क्षेत्राचा औद्योगिक उत्पादनातील वाटा हा ८४% एवढा होता.

**५) स्थिर स्वरूपाची अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश राजवटीत देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, देशाची निर्यात व उत्पादकता इ. मध्ये फारशी वाढ झालेली दिसून येत नाही. त्यामुळे ती स्थिर अर्थव्यवस्था होती. कारण विकासाकरता जी साधनसामग्री असावी लागते. ती फारच अल्प होती. उत्पादनापासून-विक्रीपर्यंत सर्वच स्तरांवर वापरले जाणारे तंत्रज्ञान हे खूपच मागास होते. देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासाकरता आवश्यक असणारा व्यापक दृष्टीकोण आणि योग्य अशा संस्थात्मक रचनेचा देखील अभाव होता. आर्थिक स्थिरावस्थेमागील आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येचा ताण शिवाय ब्रिटीशांच्या वसाहतविषयक धोरणांमुळे देखील आर्थिक पिळवणूक सातत्याने होत राहिली.

**६. मागासलेली अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश कालीन भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान होती. जवळपास ७०% पेक्षा जास्त लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतलेली होती. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ५७% पेक्षा जास्त होता. बेकारीचे मोठे प्रमाण, निरक्षरता, शहरीकरणाचा मंद वेग इ. मुळे अर्थव्यवस्था संपूर्णपणे मागास होती. तीचे स्वरूप ब्रिटनची एक वसाहत असे होते. त्यामुळे तीचे आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक शोषण होत होते. भांडवलाच्या वापरातून उद्योधंद्याचे जे काही आधुनिकीकरण घडून आले. त्याचा वेग हा अतिशय मंद होता. एकूण उत्पादनाकरता आवश्यक असणाऱ्या भांडवलाची उपलब्धता ही फारच अल्प होती. उत्पादन कार्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान मागास व कमी दर्जाचे होते. उद्योग व व्यापारांकरता ज्या धाडशी व कल्पक संयोजकांची गरज असते. त्यांचा खूपच अभाव होता. आर्थिक वाढीकरता लागणाऱ्या संस्थात्मक रचना देखील नव्हत्या. शिवाय हे सर्व घडून येण्यामध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक अडथळे होते.

**७. अर्थ-सरंजामशाही अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश काळात प्रदीर्घ काळ भारतीय अर्थव्यवस्था ही अर्थ-सरंजामशाही स्वरूपाची होती. कारण

'जमीनदार' नावाचा मध्यस्थ वर्ग शासन व शेतकरी यांमध्ये होता. शेतकऱ्यांची पिळवणूक करून, त्यांना लुबाडून ते आपले वर्चस्व कायम करत होते. जमीनदारी, रयतवारी व महालवारी या पद्धतींनी शेतकरी पूरता नाडला गेला. पुढे सरंजामशाहीच्याच प्रारूपात देशामध्ये भांडवलशाहीचा प्रवेश झाला.

भारतातील तत्कालीन करप्रणाली ही जमीनीशी संबंधीत होती. परिणामी शेती व शेतकरी यांची दुरावस्था झालेली होती. शेती अत्यंत मागासलेली होती. तिच्यात अनेक सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता होती. २०% पेक्षा कमी जमिनीला सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होत्या. रासायनिक खते, बी-बीयाणे किटकनाशके आधुनिक अवजारे इ.चा वापर हा अल्पच होता. शेतीच्या वित्तपुरवठा स्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की, शेतकरी वर्ग प्रामुख्याने 'सावकारी' वित्तपुरवठ्यावर अवलंबून होता. कारण प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचा फारसा विकास झालेला नव्हता.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारताने नविन आर्थिक धोरण........................ मध्ये स्वीकारले.

अ) १९३० ब) १९९१ क) १९९२ ड) १९९३

२. भारतीय अर्थव्यवस्था ........................... अर्थव्यवस्था आहे.

अ) भांडवल प्राधान ब) कृषीप्रधान क) साम्यवादी ड) सरंजामशाही.

३. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने ........................ प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा अंगिकार केला.

अ) भांडवली ब) समाजवादी क) मिश्र ड) हुकूमशाही

४. देशाच्या आर्थिक विकासासाठी ......................... च्या माध्यमातून प्रयत्न केले गेले.

अ) परकीय व्यापाराच्या ब) नियोजनाच्या क) औद्योगिकीकरणाच्या ड) शेती

**१.२.२. भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल.**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रांच्या प्रगतीवर अवलंबून असतो. कारण या क्षेत्रांच्या विकासातून एकूण समाजाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला जातो.जरी भारतीय अर्थव्यवस्था 'कृषीप्रधान' असली तरी १९७० च्या दशकानंतर कृषी क्षेत्राचा देशाचा 'स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील वाटा उत्तरोत्तर घटत गेलेला दिसून येतो. याउलट उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा मात्र वाढत गेलेला आहे. १९९१ नंतर च्या आर्थिक उदारीकरणाने उद्योगांवरील निर्बंध शिथील होत गेले व त्यातील सरकारी नियंत्रण, हळूहळू कमी होत गेले. अलिकडील काळात शेती व उद्योगांच्या रचनेत जे आधुनिक बदल घडून आले त्याचा प्रयक्ष व अप्रत्यक्ष फायदा सेवा क्षेत्राच्या वाढीला झाल्याचे दिसून येते. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे त्याच्या सहभागानुसार स्थान पाहिले असता सेवा क्षेत्राचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. द्वितीय स्थानावर उद्योगांना तर 'शेती क्षेत्र' तृतीय स्थानी असलेले दिसून येते. या सर्व पार्श्वभूमीवर शेती, उद्योग, सेवा तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये गेल्या ७० वर्षांमध्ये घडून आलेले रचनात्मक बदल पाहुयात.

**भारतीय शेती क्षेत्रातील रचनात्मक बदल.**

**(Structural change in Indias Agricultural Sector)**

१९४७ ला भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा देशाच्या शेतीक्षेत्राची अवस्था अत्यंत दयनीय होती. बहुतांश शेतकरी वर्ग हा 'सावकारी' पाशात अडकला होता.शेतजमीनीचे तुकडीकरण व विभाजन झालेले होते. शेती कसण्याचे तंत्र व पद्धती ही अत्यंत मागास व परंपरागत होती. शेतकरी वर्ग प्रामुख्याने निरक्षर, दैववादी व अंधश्रद्धाळू असल्याने शेतीत नविन तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, खते, बी-बियाणे, जंतुनाशके व किटकनाशके इ.चा वापर होत नव्हता. शेती ही प्रामुख्याने लहरी व बेभरवशाच्या मान्सुनच्या पावसावर अवलंबुन होती. परिणामी शेतीची उत्पादकता फारच कमी होती. अशा शेतीक्षेत्रावर सुमारे ७०% पेक्षा अधिक लोक हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अवलंबून होते. स्वतंत्र प्राप्तीनंतर अन्नधान्य उत्पादन करणारा फार मोठा प्रदेश फाळणी झाल्याने पाकिस्तानात गेला. शिवाय बांग्लादेश व पाकिस्तानातून आलेल्या लाखो निर्वासितांचा प्रश्न गंभीर होता. नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या देशावर पाकिस्तान व चीन यांच्याशी युद्धे करावी लागली. दुष्काळी संकटांना सामोरे जावे लागले. परिणामी देशाला फार मोठ्या प्रमाणावर अन्नधान्यांची आयात करावी लागली. यातूनच देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने 'पहिली पंचवार्षिक' योजना पूर्णपणे कृषी विकासाला प्राधान्य देणारी होती. यामध्ये कृषीच्या उत्पादन वाढी सोबतच कसेल त्याची जमीन, कुळकायदा व कमाल जमीन धारणा कायदा असे काही जमीन सुधारणा कार्यक्रम राबविले गेले. शेतीचा किफायतशीर आकार जमीनीच्या विभाजन व तुकडीकरणाने कमी होत होता यासाठी 'तुकडे जोड' कार्यक्रम हाती घेतला गेला. शेतीसाठी 'जलसिंचन' हा कळीचा मुद्दा लक्षात घेऊन देशपातळीवर 'भाक्रा-नानगल,'दामोदर खोरे' इ. मोठी धरणे, पाठबंधारे प्रकल्प जलसंधारण प्रकल्प यांचे विस्तृत जाळे उभे केले गेले.शेतीला 'वित्तपुरवठा' हा रास्त दरात व वेळेवर व्हावा यासाठी शासन व सहकारी संस्था यांच्या समन्वयातून वित्तपुरवठा, आदानांचे वितरण व मार्गदर्शन याबरोबर विपणन सुविधा इ. विविध पातळ्यांवर संरचना उभी केली गेली अशा विविध प्रयत्नांतून कृषीच्या विकासाचे एक नवीन पर्व सुरू झाले.

कृषी विकासाकरिता पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्येच 'प्रकर्षित शेती जिल्हा कार्यक्रम' राबविण्यात आला. तीसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये हरित क्रांतीच्या माध्यमातून 'उच्च पैदास देणाऱ्या बीयाणांचा कार्यक्रम' राबविला गेला. यातूनच 'शेती विकासाची नवी व्युहरचना आकारास आली. त्यामुळे पूर्वीची उपजीविकेपूरती केली जाणारी शेती जाऊन ती व्यापारी शेती या स्वरूपात विकसित होत गेली. सिंचनाच्या सोयी, आधुनिक यंत्रे व अवजारे, शास्त्रशुद्ध व वैज्ञानिक पद्धतींचा वापर, अधिक उत्पादन देणारी बीयाणे, किटकनाशके, जंतुनाशके यांचा वापर इ. नाविण्यपूर्ण साधणे व पद्धतींचा वापर करून शेतीच्या उत्पादनात लक्षणीय वाढ घडून आली. यात संकरीत बीयाणांच्या वापरावर जास्त भर दिलेला होता. यासाठी खते, बीयाणे, किटकनाशके इ. च्या संशोधन, उत्पादन व वितरण इ. साठी विविध महामंडळांची स्थापना केंद्र व राज्य सरकारांनी केली. याचाच परिणाम गहू, तांदूळ, कापूस व ऊस इ. पीकांच्या उत्पादनात विक्रमी वाढ झाली. यातूनच शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाटून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत गेला. शेतीच्या हरीत क्रांतीचे वरील फायदे जरी झाले असले तरी काही प्रश्नही यातून निर्माण झाले. जसे यातून झालेला विकास हा काही पिकांपूरताच मर्यादीत राहीला. हरीतक्रांतीचा फायदा काही

विशिष्ट राज्यांनाच झाला. यातून विषम विकास, गरिब श्रीमंत दरी, भांडवली शेती इ. प्रश्नही उभे राहिले.

१९८० च्या दशकामध्ये हरितक्रांतीचाच एक भाग म्हणून सर 'वर्गिस कुरीअन' यांच्या नेतृत्वाखाली 'दुग्ध क्रांती' घडून आली. याद्वारे जी दूध महापूर योजना' (Operation Flood Programme) राबविण्यात आली त्यामुळे आज भारत हा दुध उत्पादनामध्ये जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून पुढे आला. पुढे१९९१ नंतर ज्या आर्थिक सुधारणा घडून आल्या त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये अनेक 'रचनात्मक बदल' घडून आले. आर्थिक उदारीकरणातून शेती क्षेत्रामध्ये 'भांडवलीकरणाला' प्रारंभ झाला. कंत्राटी शेतीसारखे नवे प्रयोग पुढे येऊ लागले. फलोत्पादन, फळबाग लागवड यांद्वारे व्यापारी व नगदी पिके ही प्रामुख्याने प्रक्रिया उद्योग वा निर्यातीच्या उद्दिष्ट्याने घेतली जाऊ लागली. शेतीतील भांडवलीकरण व यांत्रिकीकरणाने रोजगारसंधी कमी होऊन बेकारी वाढली. उत्पादनाचा खर्च वाढला. सध्या तर शेती हा 'न परवडणारा व्यवसाय'' अशी ओळख निर्माण झाली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक वर्षे इतर क्षेत्रांच्या तुलनेत शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा जास्त होता. अलिकडील काळात हा वाटा कमी झालेला दिसून येतो. रोजगार निर्मिती आणि निर्यातीबाबतही असेच चित्र दिसून येते. सन १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पानातील शेतीचा वाटा ५९.२ % होता. हरित क्रांतीच्या काळात तो ४५.१% पर्यंत घटला. नविन आर्थिक धोरणाच्या काळात सन १९९०-९१ मध्ये तो ३४% वर आला. आणि आज २०१६-१७ च्या आकडेवारीनुसार तो १६.१ टक्के वर आलेला आहे. सन १९५०-५१ मध्ये शेतीतील रोजगार निर्मितीचे प्रमाण ७०% एवढे होते. सन १९७०-७१ मध्ये ते ६८.७% पर्यंत कमी झाले. १९९०-९१ मध्ये ते ५८.२% इतके कमी झाले. तर सन २०१६-१७ च्या आकडेवारी नुसार ते ४८.९% पर्यंत कमी झाले. शेतीतून सन १९५०-५१ मध्ये ७०% एवढी परकीय निर्यात होत होती. ही निर्यात सन १९९०-९१ मध्ये घटून तब्बल १८.५०% एवढी प्रचंड कमी झाली. २०१६-१७ मध्ये तर हे प्रमाण आणखी घटून १२.१७% तर आले. २००४-०५ मध्ये शेतीतील भांडवलानिर्मितीचा दर ७.५% होता. तो २०१६- १७ मध्ये तो घटून ५.८% एवढा राहिला.

अशाप्रकारे उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरण यांच्या परिणामामुळे खाजगी क्षेत्र व भांडवली करणाने शेती क्षेत्रामध्ये वरील विविध रचनात्मक बदल घडून आले.

**भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील रचनात्मक बदल :**

**(Structural changes in Indias Industrial Sector)**

१८ व्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. पुढे अमेरिका, जर्मनी, जपान यांसारख्या देशांनी देखील औद्योगिकीकरणाची कास धरली. ब्रिटीश राजवटीतच भारतात औद्योगिकीकरणाला प्रारंभ झाला होता. मात्र त्याचा परिपूर्ण विकास होण्यासाठीचे प्रयत्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच सुरू झाले. स्वातंत्र्यापूर्वी टाटा, बिर्ला, किर्लोस्कर इ. च्या प्रयत्नातून व मुंबई, गुजरात इ. ठिकाणच्या कापड गिरण्यांच्या उभारणीतून औद्योगिक विकासाला सुरूवात झाली होती. या सर्व पार्श्वभूमी वर देशाच्या औद्योगिक क्षेत्रात घडून आलेले संरचनात्मक बदल पुढील प्रमाणे-

अ) औद्योगिक विकासाचा पायाभूत विकासाचा काळ - (१९५१-१९६५)

ब) अल्प विकास व संरचनात्मक ऱ्हासाचा काळ- (१९६५-१९८०)

क) अल्प विकास व संरचनात्मक बदलाचा काळ) (१९८०- १९९१)

ड) आर्थिक सुधारणांचा काळ (१९९१)

**अ) औद्योगिक विकास व पायाभूत विकासाचा काळ (१९५१ ते १९६५)**

**(Building up of Strong Industrial Base)**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राला आवश्यक अशा पायाभूत संरचनेची निर्मिती करण्यावर भर दिला गेला. देशाच्या औद्योगिक विकासाला दिशा व गती देण्याचे कार्य हे खऱ्या अर्थाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत केले गेले. कारण या योजना काळात 'भांडवली वस्तू उद्योग व अवजड व पायाभूत उद्योग' यांच्या संरचनात्मक विकासावर भर दिला गेला. यामध्ये लोह, पोलाद व अवजड यंत्रसामग्री इ. उद्योगांमध्ये मोठी गुंतवणूक केली गेली. यातून देशाच्या औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाला चालना मिळाली.

**ब) अल्प विकास व संरचनात्मक ऱ्हासाचा काळ- (१९६५-८०)**

**(Industrial Declaration & Structural Retrogression)**

सन १९६५ ते १९८० या पंधरा वर्षाच्या काळात औद्योगिक वस्तुंच्या उत्पादनवाढीचा दर मंदावला. तसेच उद्योगांचा संरचनात्मक ऱ्हास झाला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ९.८% होता सन १९६५ ते १९७६ या कालखंडात तो दर घटून वार्षिक ४.१% एवढा कमी झाला. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनाकाळात भांडवली वस्तु उद्योगांची वाढ चांगली झालेली होती. मात्र १९६५ ते १९७६ या कालखंडात ही वाढ फक्त २.६% होती. मूलभूत उद्योगांबाबत देखील हीच स्थिती होती. कारण औद्योगिक क्षेत्राचा संरचनात्मक ऱ्हास घडून आला. त्यामुळे अवजड वस्तू आणि भांडवली वस्तू यांच्या उत्पादनात घट घडून आली. डॉ. एन.के. राव यांच्या मते, औद्योगिक क्षेत्रातील या मंदीमागे शेती क्षेत्रातील अल्प उत्पादकता हे कारण होते. कारण त्यामुळे कच्च्या मालाचा पुरवठा घटला व तुलनेने औद्योगिक वस्तूंची मागणी मात्र वाढली. शिवाय सरकारचे चुकीचे औद्योगिक धोरण, परवाना पद्धत, लाल फितीचा कारभार अशीही कारणे जबाबदार होती.

**क) अल्प विकास व संरचनात्मक बदलाचा काळ - (१९८० ते १९९१)**

सन १९८० ते १९९१ हा औद्योगिक सुधारणांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. तसेच तो संरचनात्मक बदल व अल्प विकासाचा कालखंड म्हणूनही ओळखला जातो. कारण सन १९८० मध्ये 'भांडवली वस्तु' उत्पादनाच्या वाढीचा दर ८.७% होता. तो घटून १९९० मध्ये ३.८% एवढा झाला. तर मुलभूत वस्तू उत्पादनाच्या वाढीचा दर ६.१% एवढा खाली आला. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा दर ५.१% होता. तो १०.४% एवढा वाढला. टिकाऊ वस्तू उद्योगांमध्ये ०.५ % नी वाढ झाली. तर नाशवंत वस्तूंच्या उत्पादनात ६ % नी वाढ झाली. एकूणच औद्योगिक वस्तू उत्पादनाचा निर्देशांक २% नी खाली आला.

**ड) आर्थिक सुधारणांचा काळ - (सन १९९१ पासून)**

देशाने १९९१ मध्ये उदारीकरणाच्या धोरणाचा अंगिकार केला. त्यातूनच औद्योगिक परवाना धोरण शिथील झाले. सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी असलेले उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले झाले. उद्योगांमध्ये विदेशी भांडवलाला

मुक्त प्रवेश दिला जावू लागला. १९९० च्या दशकात चलन तुटवड्यामुळे उद्योगांना अनेक अरिष्टयांना सामोरे जावे लागले. १९९१ मध्ये रूपयाचे जे अवमुल्यन झाले त्याचा परिणाम उद्योगांवर झाला. त्यातून या क्षेत्राला मंदीला सामोरे जावे लागले. खासगी क्षेत्रातील गुंतवणूकीचा वेग खूपच मंद होता. पेट्रोलियम पदार्थाच्या किंमती वाढल्याने उत्पादन खर्च देखील वाढला होता. सर्वत्र सामाजिक व राजकीय अस्थिरतेची स्थिती होती. १९९३-९४ नंतर मात्र परिस्थिती सुधारत गेली. औद्योगिक क्षेत्राला उत्तेजन देणारी धोरणात्मक चौकट आकाराला येऊ लागली. औद्योगिक क्षेत्राचे आजवरचे सार्वजनिक क्षेत्राच्या गुंतवणूकीवरचे अवलंबित्व कमी होत गेले. प्रचंड नफा मिळविणारी 'खाजगी संयुक्त मंडळे' आकाराला येऊ लागली.

सन २००० पर्यंत औद्योगिक वाढीचा दर चांगला राहीला. मात्र पुन्हा औद्योगिक घसरण चालू राहीली. अलिकडील काळात मूलभूत उद्योग, धातू उत्पादने, यंत्रे, रसायने, पेट्रो केमिकल्स, वाहन उद्योग यांमध्ये वेगाने वाढ होत गेली त्याचे महत्त्व वाढले. आर्थिक क्षेत्रात देखील 'नवप्रवर्तन' सुरू झाले. परिणामी रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होत गेल्या मात्र लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाला. रोजगारसंधी असुनही कौशल्या अभावी बेरोजगारीचे प्रमाणही वाढले.

**सेवा क्षेत्रातील रचनात्मक बदल : (Structural Changes in Service Sector)**

भारतीय आर्थिक विकासाचा एकूण प्रवास पाहिला असता सन १९८० च्या दशकांपर्यंत 'सेवा क्षेत्राला' फारसे महत्त्व नव्हते त्यामुळे त्याचा फारसा विकासही झाला नाही. मात्र तरीही सन १९५०-५१ ते सन १९७९-८० या कालखंडात सेवा क्षेत्राची वाढ ४.६% नी झाली. १९७९- ८० ते १९९५-९६ या काळात या क्षेत्राचा विकासाचा दर ६.५% एवढा राहीला. पुढे १९९५-९६ ते २०१०-११ मध्ये तर तो वाढून ९.५% एवढा विस्तारला. परिणामी आज देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा हा ६०% एवढा वाढला आहे. कारण आर्थिक सुधारणा कालखंडात वाहतुक-दळणवळण, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, बँकिंग व विमा इ. मध्ये प्रचंड प्रगती झाली. आर्थिक उदारीकरणानंतर यामध्ये 'व्यापारी' क्षेत्राच्या प्रगतीची देखील भर पडलेली दिसून येते.

**सामाजिक क्षेत्रातील बदल :- (Changes in Social Sector)**

लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये सुधारणा करणे हे कोणत्याही विकासासाठीचे मुख्य उद्दिष्टय असते. गेल्या ७ दशकांतील आर्थिक नियोजन व सुधारणांद्वारे जनतेच्या राहणीमानाचा दर्जा बऱ्यापैकी सुधारला आहे. स्त्री व पुरूषांचे आयुर्मान, साक्षरता, आरोग्य सुविधा, रोजगारनिर्मिती इ. मध्ये वाढ होत आहे. दारिद्र्य, कुपोषण, बालमृत्यू इ. मध्ये घट होत आहे. रोजगारनिर्मिती व व्यापारवृद्धीतून उत्पन्न वाढून लोकांची क्रयशक्ती वाढली आहे.

शासनाने शेती, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व दळणवळण यांवर आजवर जो सार्वजनिक खर्च केला त्यामुळे मानवी भांडवलाची उत्पादकता व गतिशीलता वाढली आहे. विषमता कमी होऊन समानतेमुळे सर्व समावेशक विकासाला सुरूवात झाली.

मात्र उद्योगांमुळे व भांडवलनिर्मितीमुळे समाजात गर्भश्रीमंतांचा एक वर्ग उदयाला आला. सरकारच्या आस्थापना, कार्यालये, सरकारच्या मालकीचे उद्योग व सेवा इ. मुळे सरकारी नोकर व कर्मचाऱ्यांचा एक वर्ग उदयाला आला. माहिती तंत्रज्ञान व वाहन उद्योगांतूनही चांगले उत्पन्न असणारा नव श्रीमंत मध्यमवर्ग उदयाला

आला. एकीकडे शहरी भागात हे चित्र असताना ग्रामीण भागात जमीनदार, बागायती शेतकरी आणि कामगार, शेतमजूर व कारागीर असे दोन वर्ग दिसून येतात. आजही समाजात टोकाची विषमता निर्माण झाली आहे.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न–**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण केंव्हा स्वीकारले.

अ) १९९०　　ब) १९३१　　क) १९ ९२　　ड) १९९३

२. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती विकासासाठी कोणती योजना सुरू केली गेली.

अ) प्रकर्षीत कृषी विकास कार्यक्रम　　ब) सुधारित खते व अवजारांचा कार्यक्रम.

क) उच्च पैदास देणाऱ्या बीयाणांचा कार्यक्रम　　ड) हरितक्रांती

३) धवलक्रांती ................................ शी संबंधीत आहे.

अ) मांस　　ब) दूध　　क) मत्स्य　　ड) सोयाबीन

४) .......................... या पंचवार्षिक योजनेत मूलभूत व अवजड उद्योगांचा विकास झाला.

अ) पहिल्या　　ब) दुसऱ्या　　क) तिसऱ्या　　ड) चौथ्या

५) ...................................... या कालखंडास आर्थिक सुधारणांचा कालखंड म्हणतात.

अ) सन १९५० ते १९६०　　ब) सन १९८० ते १९९१

क) सन १९९१ ते २०००　　ड) सन १९९७ ते १९८०

### १.२.३ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास

### (Indian Economy and Indusive Growth)

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने त्याचबरोबर भारताच्या पंचवार्षिक योजनेच्या मुळाशी असलेल्या कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्ट्यांच्या दृष्टीने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना महत्त्वाची ठरते. सर्वसमावेशक विकास ही एक व्यापक कल्पना असून त्यामध्ये अधिकाधिक लोकांना विकासात सहभागी करून घेण्यावर भर दिला जातो. विकासाची फळे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविणे आणि विकासाच्या प्रक्रियेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे. या दृष्टीने २१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विशेष प्रयत्न केले जात आहेत. सर्वसमावेशक विकास हा विकसनशील देशासाठी एक परवलिचा शब्द बनला आहे. विकासाची प्रक्रिया ही सामाजिक न्याय वाढविणारी असावी. सर्वसमावेशक वृद्धित सर्वांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचे लाभ मिळावेत ही अपेक्षा असते. त्यामुळे समाजाच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळू शकते. सर्वसमावेशक विकास व कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा नव्याने विचार होत असला तरी प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरूपात या संकल्पना मांडल्या गेल्या आहेत. उदा. कौटिल्याची आदर्श शासन व्यवस्था, प्लेटोचे रिपब्लीक या प्राचीन तर अर्वाचिन काळातील गांधीवादातील अंत्योदय, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, हरितक्रांतीचे जनक डॉ. एम.

एस. स्वामीनाथन व दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरीयन यांच्या स्वप्नातील भारत या सर्व संकल्पनांचा मूळ पाया कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक विकास हाच आहे.

**सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेचे सैदधांतिक विश्लेषण–**

**(Therotical explanation of Inclusive Growth)**

जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी त्यांच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सर्वसमावेशक विकासाचे तत्व अंगीकारले आहे. भारताच्या विविध पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्टांमध्ये देखील सर्व समावेशक विकासाच्या दृष्टीने वाटचाल केल्याचे दिसुन येते. गरीबी हटाओ कार्यक्रम, २० कलमी कार्यक्रम, कृषी विकासाला प्राधान्य, रोजगारनिर्मिती, महिला व बालविकास, सर्व शिक्षा अभियान यांसारख्या योजनाद्वारे सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उददेश सर्वसमावेशक विकास हाच होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेतही हाच प्रयत्न जाणीवपूर्वक केला गेला. आर्थिक विकास मोजण्याचा दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा जरी महत्वाचा निकष मांडला असला तरी आर्थिक सुधारणा कालखंडात मानव विकास निर्देशांक हा देखील महत्वाचा मानला जात आहे. सर्वसमावेशक वृद्धिच्या संकल्पनेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या विषमतेसह सामाजिक वंचिततेला महत्व दिले जाते.

'सामाजिक वर्जन' ही एक प्रक्रिया आहे. काही समुदायांना, गटांना, किंवा व्यक्तींना आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात आपण पूर्णतः किंवा अंशतः वर्जित आहोत असे वाटतो. नोबेल परितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी या प्रक्रियेला Capability Depervation असे म्हटले आहे. विल्सन या लेखकाने या प्रक्रियेला Social disclotion असे म्हटले आहे. ''आपल्या देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधावयाचा झाल्यास सर्वच समुदायांना सर्वच क्षेत्रात प्रतिनिधीत्व देवुन त्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणणे अत्यावश्यक आहे.'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. सर्वसमावेशक विकासाचे धोरण समजून घेण्यासाठी आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती व्यवस्था व अस्पृश्यतेविषयीचे मूल्यमापन समजून घ्यावे लागेल. भारतातील जाती, जातीयतेचे उच्चाटन, दि अनटचेबल्स, 'हिंदू धर्माचे तत्वज्ञान', या लिखाणात त्यांचे विचार प्रतिबिंबीत झाले आहेत. जात हा राक्षस आहे आणि जोपर्यंत आपण त्या राक्षसाला नष्ट करत नाही तोपर्यंत भारतीय समाजात समानता व सर्वसमावेशक विकास होवू शकत नाही. अशी त्यांची धारणा होती. देशातील सामाजिक आर्थिक समस्या सोडविणे ही सरकारची मुख्य जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते सर्वांना समान हक्क असले पाहिजेत. मानवी हक्कांचे उल्लंघन होवू नये यासाठी कायदेशीर तरतूद करून सर्वाना सामाजिक, राजकीय नागरी व आर्थिक क्षेत्रात सहभाग आणि प्रवेश तसेच गरीबांच्या सबलीकरणासाठी व सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने निश्चित कृती योजना राबविणे गरजेचे आहे. महिला, आदिवासी भटके, गरीब आणि अस्पृश्य हे घटक आज ही सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत आहेत. म्हणून डॉ. आंबेडकर सुचवतात वर्गनिहाय सर्वसमावेशक धोरणामुळे सामाजिक भेदभाव व असमानतेच्या परिणामाला उत्तर मिळू शकते. भेदभाव रहित आर्थिक संरचनेत बहिष्कृत वर्गांना देशाच्या आर्थिक विकासात सामावून घेणे गरजेचे आहे. उदा. उद्योगधंदे, बाजारपेठा, खाजगी शिक्षण, घरांची उभारणी करणारी व्यवस्था या क्षेत्रात बहिष्कृत समाजाला प्रवेश मिळेलच असे नाही. म्हणून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून ते 'समानसंधी' चा पर्याय सुचवतात. हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे

सर्वसमावेशक विकासाबाबतचे धोरण आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्याचा प्रत्यक्ष संबंध हा मनुष्यातील मुलभूत क्षमतांपासून दुरावलेल्या गरीबांशी अधिक जवळचा आहे. गरीबांच्या सु-क्षमता शक्तीत आणि कौशल्यात जसजशी वाढ होत जाईल तसतशी त्यांना दारिद्र्यातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळेल.यासाठी विकासाचा पाया हा 'सर्वसमावेश वृद्धी' या संकल्पनेवर आधारीत असणे आवश्यक आहे. त्यांच्या मते कृषी व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक वृद्धिचे उद्दिष्ट असले पाहिजे. सन २००८ च्या UNDP च्या अहवालानुसार समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास आणि वितरणातील समानता महत्त्वाची आहे. हि दीर्घकालीन प्रक्रिया असून रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होवू शकते.

**सर्वसमावेशक विकासाचे निकष (Indicatiors of Inclusive Growth)**

सर्वसमावेशक विकासाची भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात व्यावहारिकता पडताळून पाहताना काही निकष विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. काही प्रमुख निकष आपणास पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

**१. दारिद्र्यनिमूर्लन (Poverty Elimination)**

भारतासारख्या बहुसंख्य विकसनशील देशांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य ही प्रमुख समस्या आहे. दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी देशातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. मानवी संसाधनाच्या कौशल्यात वाढ करण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये आज जवळ-जवळ २५% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. गेल्या ७० वर्षामध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण जरी घटले तरी दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या ३५ कोंटीपेक्षा जास्त झाली आहे. यामध्ये सर्वसमावेशक विकास साध्य करावयाचा असेल, तर दारिद्र्य निर्मुलनाच्या योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**२) रोजगार निर्मीती (Employment Generation)**

देशामध्ये अस्तित्वातील-लोकसंख्येला (श्रमशक्ती) रोजगार उपलब्ध करून देणे. ही बाब आर्थिक विकासाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची आहे. देशात योजना काळात रोजगार निर्मीतीचे अनेक प्रयत्न केले गेले. मात्र आजही बेरोजगारीचे प्रमाण फार मोठे असलेले दिसून येते. यामध्ये सुशिक्षित व निरक्षर अशा दोन्हीमध्ये बेकारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. आर्थिक सुधारणा काळात रोजगाराच्या नवनव्या संधी तंत्रवैज्ञानिक बदलांमुळे निर्माण होत आहेत. मात्र त्या मिळविण्याकरता किमान कौशल्यांची आवश्यकता असते. अशी कौशल्ये निर्माण करण्यासाठी योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण समाजाला देणे गरजेचे आहे. समाजाच्या विविध स्तरांतील व्यक्तींच्या उत्पन्न पातळीत समतोल प्रमाणात वाढ घडवून आणण्यासाठी सर्वसमावेशक विकासाची निकड भासते.

**३) जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता (Availability of Consumable Goods)**

लोकांना राहणीमानाचा वाजवी दर्जा प्राप्त करून देण्याकरता जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता करून देणे हे शाश्वत विकासाच्या दृष्टिने आवश्यक ठरते. सर्वसमावेशक विकासाच्या निकषात 'उपभोग्य वस्तूंची उपलब्धता या घटकास फार महत्त्व आहे. त्यादृष्टिने सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अल्प-उत्पन्न गटातील

लोकांना गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, रॉकेल इ. वस्तूंचा पुरवठा अल्प किंमतीत करत असते. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टिने पिण्याचे पाणी, आरोग्य, सुविधा, भाजीपाला, दुध, पेट्रोल, डीझेल, खाद्यतेल इ. वस्तूंच्या रास्त किंमती व त्यांची उपलब्धता ही बाब महत्त्वाची ठरते. त्यादृष्टिने देशाचा सर्वसमावेशक विकास करीत असताना सरकारने या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता असते.

### ४) मागणीची कमतरता (Deficiency of Demand)

मागणीतील कमतरता भरूण काढणे ही बाब सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची आहे.डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते, ''बाजारपेठेतील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी श्रीमंताची श्रीमंती व गरीबांची गरीबी कमी करणे यासाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.'' गरीबांच्या मागणीत वाढ करण्यासाठी त्यांचे दरडोई उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने विविध प्रकारच्या रोजगार व स्वयं रोजगाराच्या योजना आखून त्याची प्रभावी अमंलबजावणी करणे गरजेचे आहे.गरीबांच्या खरेदीशक्तीत वाढ झाल्यास आपोआपच मागणीतील कमतरता कमी होऊन सर्वसमावेशक विकास होण्यास मदत होईल.

### ५) ग्रामीण व शहरी विषमता (Rural & Urban Disparity)

सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत व्यक्ती-व्यक्तींमधील प्रादेशिक तसेच ग्रामीण व शहरी विषमता कमी होणे अभिप्रेत आहे. जागतिक बँकेच्या सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत गरीब व श्रीमंत व्यक्तीच्या उत्पन्नातील विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. भारतात नियोजन काळात शासनाने राबविलेल्या विकास कार्यक्रमांचा लाभ ग्रामीण भागापेक्षा शहरी भागाला अधिक झाला. त्यामुळे ११ व्या व १२ व्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण व शहरी भागातील विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. त्याचा फायदा सर्व प्रकारच्या सुविधांपासून वंचित असणाऱ्या लोकांना होण्यास मदत होईल.

## भारताचे सर्वसमावेशक विकासाचे धोरण (Policy of Inclusive Growth of India)

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ पासून पंचवार्षिक योजना काळात आर्थिक विकासाचे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली घसरण भरूण काढणे हे उद्दिष्ट्य होते. त्यानुसार पहिली पंचवार्षिक योजना शेतीच्या विकाससाठी राबविण्यात आली. त्यानंतरच्या दुसऱ्या योजनेमध्ये मूलभूत व अवघड उद्योगांच्या विकासावर भर देण्यात आला. तिसऱ्या योजनेपासून सातव्या योजनेपर्यंत भारताच्या नियोजनाची प्रमुख उद्दिष्टये दारिद्रय निर्मुलन, रोजगार निर्मिती, आर्थिक विकास, प्रादेशिक विषमता कमी करणे लघु व कुटीर उद्योगांचा विकास करणे तसेच ग्रामीण विकास हे होते. १९५१ ते १९९० या काळात अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली गेली. त्यासाठीचे आवश्यक भांडवल कर्जाच्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय स्तरावरून उभारले गेले. त्याचा परिणाम म्हणून भारतावर कर्जाचा बोजा निर्माण झाला. चवथ्या पंचवार्षिक योजनेत निश्चित करण्यात आलेले ''स्थैर्यासह आर्थिक विकास'', हे उद्दिष्टय भारतात ''सर्वसमावेशक आर्थिक विकास'' करण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे पाऊल होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेत ''गरीबी हटाओ'' तसेच ''वीस कलमी कार्यक्रम'' हे दारिद्र्य निर्मुलन आणि समाजाच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिने महत्वाचे उपक्रम होते. रोजगार वृद्धीच्या दृष्टिने महाराष्ट्रासारख्या घटक राज्यात १९७२ मध्ये सुरू करण्यात आलेली ''रोजगार हमी योजना'' ही देशपातळीवर स्वीकारली गेली. देशातील अकुशल व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्राप्त

करून देऊन त्यांच्या खरेदी शक्तीत वाढ घडवून आणण्यास ही योजना महत्त्वाची ठरत आहे. १९८० नंतर लघु आणि कुटीर उदयोगांच्या विकासातून ग्रामीण व शहरी भागात निर्माण होणाऱ्या रोजगार संधी हे शाश्वत विकासाला प्रेरक ठरत आहे. याबरोबरच योजना काळात सरकारने शैक्षणिक धोरणात सर्वसमावेशकतेच्या दृष्टिकोनातून काही बदल केले आहेत. आरक्षणाचे धोरण, पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार, महीलांना शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण इ. उपक्रम राबवीले आहेत. गेल्या सहा दशकात सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने विविध प्रकारच्या योजना शासकीय पातळीवर राबविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये पुढील काही योजना सांगता येतील. इंदिरा आवास योजना, कामासाठी अन्न योजना, संजय गांधी निराधार योजना, आश्वासीत रोजगार योजना, अंत्योदय योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना, भारत निर्माण कार्यक्रम, सुक्ष्म वित्त पुरवठा व प्रकर्षित शेती विकास योजना यासारख्या योजना सर्वसमावेशक व शाश्वत विकासाच्या दृष्टिने देशभरात राबविल्या जात आहेत.

**भारतातील सर्वसमावेशक विकास आव्हाने व पर्याय :**

**(Inclusive Growth in India Challenges Alternatives)**

भारताने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारीत असे अनुषंगिक बदल आर्थिक धोरणांमध्ये केले गेले. त्याचा अनुकूल व प्रतिकुल परिणाम कृषी, उद्योग व सेवाक्षेत्रावर झाला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक चौकटीमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला पुरेशा भौतिक व सामाजिक सुविधा प्राप्त करून देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले. आर्थिक उदारीकरणाच्या काळात अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग ३.५% वरून ९% एवढा वाढला. कृषी अर्थव्यवस्था सेवाप्रधान अर्थव्यवस्था बनू लागली. भारतात ६०% घटक सेवा क्षेत्रावर आधारीत आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा विकास हा एक महत्त्वाचा घटक देशाच्या विकासाची गती वाढविण्यास प्रेरक ठरू शकतो. तथापि खेड्यातील लोक आजही विकासापासून वंचित आहेत. अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कृषी उत्पादनात महत्त्वाचे असूनही सामाजिक व आर्थिक विकासापासून दूर आहेत. महिला, मुले व मागासवर्गीय लोक हे देखील विकासापासून दूर आहेत. वाढत्या आर्थिक गरजा आणि वाढती लोकसंख्या यामध्ये मेळ घालण्यासाठी विकास साधनांचे नियोजन करावे लागेल. अर्थ सत्ता ही मूठभर लोकांच्या हाती एकवटली आहे. देशात १% लोकांच्या हाती १५.९% संपत्ती आहे. तर ५ % लोकांच्या हाती ३८.३% संपत्ती आहे. उर्वरीत लोक मात्र ४५.८% संपत्तीमध्ये अल्प प्रमाणात वाटेकरी आहेत.शाश्वत व सर्वसमावेशक विकासापुढील समस्यांचा आढावा घेतला असता असे दिसते की, दारिद्र्य, बेरोजगारी व शेती क्षेत्राची घसरण या देशासमोरील प्रमुख समस्या आहेत. त्यामुळे राज्यांतर्गत प्रादेशिक विषमताही वाढताना दिसते. गेल्या काही वर्षामध्ये देशात चलनपुरवठा मोठ्या प्रमाणात झाला आहे. जागतिक स्तरावरील अनिश्चितता वाढत आहे. युरो डॉलर व अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रूपया दुबळा होत आहे. अनेक योजना, आराखडे, धोरणे तयार असून त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे विकासाची फळे अपेक्षित वर्गापर्यंत पोहोचत नाहीत.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक व शाश्वत विकास हे ध्येय निश्चित केले गेले होते. त्यानुसार सर्वसमावेशक विकासासाठी पुढील काही महत्वाच्या उपाययोजना करून सर्वसमावेशक विकासाची व्युहरचना तयार केली गेली.

१. ग्रामीण संरचना भक्कम करणे.

२. कृषी क्षेत्रातील कामगिरीत सुधारणा.

३. शिक्षणाचा दर्जा व कौशल्य विकासाकरता अधिक सशक्त प्रयत्न.

४. मागासलेल्या व उपेक्षित वर्गासाठी विशेष विकास कार्यक्रम.

५. ग्रामीण आरोग्य योजनांमध्ये अमुलाग्र बदल.

६. नागरी विकासाची निकोप संरचना कमी करणे.

७. शहर व ग्रामीण विकासातील दरी कमी करणे.

८. देशातील बालमजुरी, महिलांचे शोषण आणि दुर्बल घटकांची उपेक्षा यांकडे गांभीर्याने लक्ष देणे.

९. रूढी, परंपरा व अंध:श्रद्धांचा प्रभाव कमी करून लोकांमध्ये विकासाबाबत जाणीव-जागृती निर्माण करणे.

१०. चांगल्या सुशासनास रचनात्मक प्रयत्नांची जोड देऊन भावी काळात खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी वाढविणे.

११. बहुराष्ट्रीय उद्योगांना सामाजिक जबाबदारीतून त्यांचे प्रकल्प काळजीपूर्वक आखावयास लावणे. ज्यायोगे संरचनात्मक विकास घडून विविध सामाजिक क्षेत्रात विविध कल्याणकारी योजना गतीने कृतीत येतील.

१२. उद्योगांच्या विकेंद्रिकरणाद्वारे अर्थिक सुधारणा घडवून नवे सामाजिक, आर्थिक व राजकीय वातावरण तयार केले पाहिजे.

अशा प्रकारे सर्वसमावेशक विकास साध्य करताना सर्व सुधारणांची दिशा ही शाश्वत स्वरूपाची असली पाहिजे. सर्वसमावेशक विकास ही केवळ सरकारची जबाबदारी नसून देशातील उद्योगसमूह तसेच सेवाभावी संस्थानीदेखील ह्यात वाटा उचलला पाहिजे. सध्याच्या विकास योजना या अशा पद्धतीने राबविल्या पाहिजेत की, भावी पिढीच्या गरजा सुद्धा योजकतेने पूर्ण होतील.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. 'सर्वसमावेशक विकास' हे प्रमुख उद्दिष्टय भारताने कोणत्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारले.

अ) पहिल्या ब) आठव्या क) दहाव्या ड) अकराव्या

२. सर्वसमावेशक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खालीलपैकी कोणता पर्याय सुचवितात.

अ) रोजगारात वाढ ब) समान संधी क) दारिद्र्य निर्मूलन ड) वरील सर्व

३. ............................................ हा सर्वसमावेशक विकासाचा निकष आहे.

अ) लोकसंख्या नियंत्रण ब) दारिद्र्य निर्मूलन क) शेती विकास ड) औद्योगिक विकास

४. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, बाजारातील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी ............. ची आवश्यकता आहे.

अ) लोकसंख्येचा जननदर कमी करणे ब) शैक्षणिक सुविधा वाढवणे

क) गरीब व श्रीमंत यातील अंतर कमी करणे ड) लोकांना आरोग्यविषयक सुविधा देणे.

५. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना ............. साली सुरू करण्यात आली.

अ) १९५१ ब) १९७२ क) १९८० ड) १९९१

## १.२.४ शाश्वत विकासः (Sustainable Development)

**प्रस्तावना :**

शाश्वत ही संकल्पना अभ्यासताना शाश्वत या शब्दाचा अर्थ पाहणे आवश्यक आहे. शाश्वत म्हणजे चिरकाल टिकणारा होय. म्हणजेच शाश्वत विकास हा सध्या जो विकास होत आहे तसाच तो भविष्यातही टिकवून ठेवणे. भविष्यात कितीही समस्या निर्माण झाल्या तरी कोणतीही तडजोड न करता व्यक्तीला त्याच्या आवश्यक गरजा पूर्ण करता येतील असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. हा शाश्वत विकास केवळ पर्यावरणशास्त्रापुरताच मर्यादीत राहिलेला नसून तो अनेक शास्त्रांचा एक महत्वाचा घटक बनला आहे. पर्यावरण आणि विकास या विषयावरील ब्रुटलॅड या जागतिक समितीने १९८७ मध्ये शाश्वत विकास ही संकल्पना सर्व प्रथम मांडली. पुढे सन १९९९ पासून जगातील बहुतेक सर्वच देशांनी शाश्वत विकास या संकल्पनेवर भर दिला आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना : (Concept of Sustainable Development)**

‘विकास या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणे अवघड आहे. कारण एकसारखे उत्पन्न असणाऱ्या दोन वेगवेगळ्या देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा भिन्न असू शकतो. युनोच्या निर्देशांकानुसार सरासरी आयुर्मान, प्रौढ साक्षरता, शिक्षण, सरासरी उत्पन्न घटकाच्या निकषाद्वारे मानवी विकास मोजता येतो. या मानवी विकासामध्ये व्यक्तीच्या निरोगी आयुष्यापासून आर्थिक, सामाजिक व राजकीय, स्वातंत्र्यापर्यंतच्या सर्वच घटकांचा समावेश होतो. शाश्वत विकासाची संकल्पना तशी अलिकडीलच आहे. नैसर्गिक साधने व जैवविविधता यांच्या संरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने प्रकाशित केलेल्या सन १९८० च्या जागतिक संरक्षण योजनेमध्ये World Conservation Strategy) ही संकल्पना सर्वप्रथम मांडली गेली. Sustainable याचा अर्थ शाश्वत टिकाऊ, चिरस्थायी स्वयंपोषणक्षम असा आहे. सध्या प्रत्येक देश विकासासाठी प्रयत्नशील आहे. मात्र असा विकास करणे जसे महत्वाचे आहे तसेच झालेला विकास चिरकाल टिकवून ठेवणे महत्वाचे आहे. विकास व पर्यावरणावरील जागतिक आयोगाने शाश्वत विकास या संकल्पनेचा विकास केला. आपले समाईक भविष्य (Our Common Future) या सहामाही अहवालामध्ये त्यांनी ही संकल्पना सविस्तर मांडली तो अहवाल म्हणून प्रसिद्ध आहे.

**शाश्वत विकासाचा अर्थ व व्याख्या :**

**(Meaning and Definations of Sustainable Development) -**

शाश्वत विकास ही संकल्पना व्यापक असून ती जगातील सर्व मानवी समूहांशी संबंधित आहे. भविष्यातील विकासाच्या अनुषंगाने वर्तमानातील विकास करणे असा शाश्वत विकासाचा अर्थ मांडला जातो. दुर्मिळ व पर्यायी साधनसंपत्तीच्या अवाजवी वापरातून भविष्यातील पिढ्यासमोर प्रश्न निर्माण होऊ शकतात. म्हणून साधनसामग्रीच्या शाश्वत वापरादवारे भविष्यातील पिढींच्या गरजांचा विचार करून निर्णय घेणे गरजेचे आहे. या दृष्टिने शाश्वत विकास ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना ठरते. शाश्वत विकासाच्या विविध तज्ञांनी दिलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे

१) **रॉबर्ट ॲलड :** ''शाश्वत विकास म्हणजे, मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकवून ठेवणे आणि व्यक्तिच्या जीवनामानात सुधारणा घडवून आणणे होय.''

२) **ब्रुटलँड समिती अहवाल :** ''भविष्यातील पिढींच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेचे (सामर्थ्याचे) तडजोड करण्यावाचून सध्याचा गरजा पूर्ण करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.''

३) **के. परीख:** '' अर्थ व्यवस्थेमध्ये उत्पादनाची जी शक्यता आहे. त्या शक्यतेचे रक्षण करण्यासाठी निसर्गाकडून वस्तू व सेवा प्राप्त करून त्याचा पुरवठा करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपणास असे लक्षात घेते की, शाश्वत विकास ही संकल्पना पर्यावरणाशी संबंधीत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास त्याचा अनिष्ट परिणाम भविष्यातील पिढ्यांवर होत असतो. म्हणून पर्यावरणाचा अतिरिक्त उपयोग किंवा उत्पादन करणे धोक्याचे असते. शाश्वत विकास ही संकल्पना सध्याची पिढी व भविष्यातील पिढी या दोहोंशी जोडलेली आहे. म्हणजेच सध्याच्या पिढीचा विकास करीत असताना भावी पिढीवर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ नये याची दक्षता शाश्वत विकास या संकल्पने मध्ये घेतली जाते. थोडक्यात शाश्वत विकास या संकल्पनेत पर्यावरण रक्षण आणि विकास यांना अत्यंत महत्व आहे.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टये : (Objectives of Sustainable Development)**

पर्यावरण व मानवी जीवन यांच्या चिरस्थायी व शाश्वत विकासाकरीता शाश्वत विकासाची मुख्य उद्दिष्टये पुढीलप्रमाणे.

१) मानवी जीवनाचा गुणात्मक विकास करणे.

२) सर्व मानवी समूहाच्या मुलभूत गरजांची पूर्तता करून आर्थिक विकासाद्वारे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे.

३) सामाजिक जीवनातील सहभागाची समान संधी देवून निकोप व आरोग्यपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक जीवनासाठी सहकार्य करणे.

४) वर्तमानकालीन व भविष्यकालीन पिढ्यामधील एकात्मता वाढविणे.

५) पृथ्वीवरील नैसर्गिक सामाजिक व सांस्कृतिक संसाधनाचा व संपत्तीचा साठा जतन व संवर्धन करून तो पुढच्यापिढीकडे संक्रमित करणे.

६) नैसर्गिक व भांडवली साधनांचा साठा संपुष्टात येवू नये असा शाश्वत विकास करणे.

७) संपूर्ण जगातील निरपेक्ष दारिद्र्य कमी करणे

✻ **जगातील शिखर परिषद (World Earth Summit)**

सध्या वाढत्या पर्यावरण समस्येने अनेक देशाचे लक्ष शाश्वत विकासाकडे वेधले आहे. त्यातून जगातील सर्व देशांची या विषयावर चर्चा व एकमत तयार करण्यासाठी दरवर्षी ''वसुंधरा शिखर परिषद'' आयोजित करण्याचे ठरले. सन १९८८ मध्ये हवामान बदलाच्या समस्येसंदर्भात आंतरराष्ट्रीय चौकशी समिती तयार करण्यात आली. ज्या योगे हरितगृह वायू सोडण्याचे प्रमाण कमी करता येईल. अलीकडच्या काळात विविध कारणांनी जागतिक तापमानात सातत्याने वाढ होत आहे व यासाठी कोणत्याही एका देशाला जबाबदार धरता येणार नाही.

## * शाश्वत विकासाचे निर्देशक (Indicators of Sustainable Development)

### १) स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP)

स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे देशाच्या सिमारेषेच्या आत तयार होणाऱ्या वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य होय. सध्याची असणारी पिढी व भावी पिढी यांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी आर्थिक वृद्धी होणे अपेक्षित असते. त्याकरिता स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ होणे गरजेचे असते. ही वाढ वस्तू व सेवांच्या उत्पादन दरावर अवलंबून असते. वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होत असताना पर्यावरणाची कमीत कमी हानी होणे आवश्यक असते व त्याच बरोबर दारिद्र्याचे प्रमाण देखील कमी होणे अपेक्षित असते.

### २) देशाची लोकसंख्या –

उत्पादनाच्या प्रक्रियेत 'श्रम' हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. देशाचा विकास साध्य करण्यासाठी पर्याप्त लोकसंख्या असल्यास देशाचा विकास वेगाने होतो. परंतू लोकसंख्या प्रमाणापेक्षा जास्त वाढत गेल्यास मात्र विकास साध्य होत नाही व ती विकासातील एक मोठा अडथळा बनते. अतिरिक्त लोकसंख्येमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होते, प्रदुषणात वाढ होते. त्याचे अनिष्ट परिणाम भावी पिढीवर होताना दिसतात. त्यामुळे प्रदूषण व पर्यावरणाची हानी होऊ नये त्याचबरोबर विकासाला पोषक इतकीच लोकसंख्या असणे आवश्यक आहे.

### ३) मानवी साधनसंपत्तीचा विकास

शाश्वत विकासासाठी मानवी साधन संपत्ती देखील अत्यंत महत्वाची असते. उत्पादन प्रक्रियेत भांडवल व मानवी साधनसंपत्ती हे दोन्ही अत्यंत महत्वाचे ठरतात. उत्पादन प्रक्रियेत जेवढी किंमत भांडवलाला आहे तेवढीच मानवी साधनसंपत्तीला देखील आहे. मानवी सामग्रीचा विकास होत गेल्यास आर्थिक विकासही होत जातो. मानवी विकास मोजण्यासाठी 'मेहबुब – उल – हक' यांनी 'युनो' मार्फत मानवी विकास निर्देशांक मांडला आहे. मानवी विकासाचे मोजमाप करीत असताना व्यक्तीचे शिक्षण व प्रशिक्षण, आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा उत्पन्न इ.चा विचार केला जातो.

### ४) आवश्यक पाण्याचा पुरवठा–

उत्पादन व उपभोगाच्या प्रक्रियेत पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शाश्वत विकास होण्यासाठी आवश्यक तेवढा पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेतल्यास पाणी पुरवठ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी लोकांना मिळत नाही. पाणी हे कुटुंबासाठी, उद्योगासाठी व शेतीसाठी अत्यावश्यक आहे. सध्या पाणी वापराचा वेग हा एवढा जास्त आहे की, तो त्याच्या नुतनीकरणापेक्षा ही जास्त आहे. पाणी टंचाईची आजची स्थिती लक्षात येता. भविष्यातील काळ हा फार चिंतेचा आहे. कारण पाण्याशिवाय मानवी जीवनाचे अस्तित्व नाही. म्हणूनच पाणी हा शाश्वत विकासाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

### ५) भौतिक स्वरूपाची साधनसंपत्ती –

शाश्वत विकासासाठी आवश्यक तेवढी उत्पादनाची साधने असणे गरजेचे असते. उत्पादन साधनांचा तुटवडा असल्यास शाश्वत विकास साध्य होऊ शकणार नाही. उत्पादन साधनांची उपलब्धता असून त्याचा वापर पर्याप्त होत नसेल तरीही शाश्वत विकास होऊ शकणार नाही. म्हणूनच शाश्वत विकासासाठीची साधने उपलब्ध

असणे आणि त्याचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

**६) इतर आवश्यक घटक**

**१) हवा –** शाश्वत विकासासाठी इतर घटकांबरोबर इतर घटकही कारणीभूत असतात. त्यामध्ये शुद्ध हवा असणे गरजेचे आहे. शुद्ध हवा ही मानवाला व इतर मानवेत्तर घटकांना जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. जर प्रदुषणाच्या प्रमाणात वाढ होत गेली तर भावी पिढीला शुद्ध हवा मिळणार नाही. त्यांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होईल.

**२) ऊर्जा –** शुद्ध हवेबरोबरच 'ऊर्जा' हा घटक देखील शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्वाचा आहे. ऊर्जेचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. एक पारंपरिक ऊर्जा आणि दुसरी अपारंपरिक ऊर्जा. ऊर्जेचा पर्याप्त वापर केल्यास शाश्वत विकास घडून येतो. अशा प्रकारे अनेक घटक शाश्वत विकासाचे निदर्शक ठरतात.

**शाश्वत विकासाचे धोरण –** (Policies for Sustainable Development)

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचा दर्जा घसरल्याने लोकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. आर्थिक उत्पादकता घटते आणि सुखसोई कमी होतात. त्यासाठी योग्य धोरण ठरविणे ही काळाची गरज ठरते.

**यादृष्टीने महत्वाची धोरणे पुढीलप्रमाणे –**

१) मोठे प्रकल्प राबवून रोजगार निर्मीतीद्वारे दारिद्रय निर्मुलन करणे.

२) अनुदान (Subsides ) कमी करणे, अथवा बंद केल्याने देशाला अनेक फायदे प्राप्त होतील.

३) उत्पादन व वितरणासाठी बाजारभिमुख दृष्टिकोन स्वीकारणे.

४) संपत्तीचे विकेंद्रिकरण करणे.

५) रास्त किंमत, संस्थात्मक रचना यांद्वारे वितरणात वाढ करणे.

६) दर्जेदार उत्पादनासाठी सुयोग्य नियंत्रण ठेवणे.

७) देशांतर्गत व परकीय व्यापाराच्या वाढीला चालना देणे.

८) सामाजिक सहभाग व सामाजिक ऐक्य निर्माण करणे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

१) शाश्वत विकास ही संकल्पना ........मध्ये सर्वप्रथम मांडण्यात आली.

अ) १९८० ब) १९८१ क) १९८२ ड) १९८३

२) .............यांनी मानवी विकास निर्देशांक ही संकल्पना सर्वप्रथम मांडली.

अ) अमर्त्य सेन ब) मेहबुन–उल–हक क) बराक ओबामा ड) लॉर्ड केंन्स

३) तापमान वाढीच्या समस्येची चर्चा करण्यासाठी जगातील सर्व देशांची .....परिषद दरवर्षी भरते.

अ) पॅरीस परिषद ब) दोहा परिषद क) शांतता परिषद ड) वसुंधरा परिषद

४) दुसरी जागतिक हवामान परिषद सन १९९० मध्ये ..... येथे भरली.

अ) पॅरीस ब) क्वेटो क) शांघाय ड) लंडन.

५) ..... ही संकल्पना पर्यावरण व विकास या दोहोंशी संबंधीत आहे.

अ) शाश्वत शेती ब) शाश्वत विकास क) शाश्वत वृद्धी ड) शाश्वत पर्यावरण

**१.३ सारांश –**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये त्या देशातील उपलब्ध साधनसंपत्ती आणि मानवी भांडवल हे घटक अत्यंत महत्वाचे असतात. भारताचा विचार करता भारतात हे दोन्ही घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि भारतातील नैसर्गिक संसाधनांचा विचार करता लोकसंख्या अतिरिक्त आहे. भारताच्या तुलनेत इतर देशांच्या लोकसंख्यावाढीचा दर हा अत्यल्प आहे लोकसंख्येच्या बाबतीत सध्या भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत हा दिडशे पेक्षा जास्त वर्षे ब्रिटीशांच्या गुलामगिरीत अडकलेला देश होता. ब्रिटीशांनी भारतातून प्रचंड संपत्ती लुबाडून नेली त्यासाठी इथल्या नैसर्गिक संपत्तीची व मानवी भांडवलाची अमानुष पिळवणूक केली. परिणामी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेला भारत व त्याची अर्थव्यवस्था ही अविकसित स्वरूपाची होती. तीचे स्वरूप अर्थसंरजामशाही होते. कृषीप्रधान असलेली अर्थव्यवस्था स्थिर व मागास होती. परंपरागत उत्पादन पद्धती मागास शेती, लघु-कुटीर उद्योगांचे प्राबल्य अशी स्थिती होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात अनेक क्षेत्रात काही रचनात्मक बदल घडून आले शेती क्षेत्राचे महत्व हळू हळू घटत गेले. उदर निर्वाहाची शेती जाऊन व्यापारी पिके येऊ लागली. कृषी आदाने, कृषी प्रक्रिया यांचे उद्योग उभे राहिले. कृषी व उद्योगांचा जसजसा विकास होत गेला तसतसे देशात सेवाक्षेत्र आकाराला येत गेले. लघु-कुटीर उद्योग नष्ट होऊन 'मोठ्या उद्योगांचे 'पर्व सुरू झाले. अंतर्गत व्यापारासोबत बाह्य व्यापाराचे महत्व वाढले. यातून बेरोजगारी, यांत्रिकीकरण, वाढता उत्पादन खर्च, वाढती स्पर्धा असे प्रश्न निर्माण होऊ लागले. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण असे विषम विभाजन पुढे झाले.

वाढत्या विकासाबरोबर येणारी विषमता, दारिद्र्य, पिळवणूक इ. वर मात करण्याकरता देशाच्या नियोजनात सर्वसमावेशक विकासाला अग्रक्रम दिला गेला. त्यासाठी ग्रामीण विकास, शेती विकास, रोजगार निर्मिती महिला सबलीकरण, अन्न, वस्त्र, निवारा यांची उपलब्धता, आरोग्य व शिक्षणाची सोय, वाहतूक व दळणवळणाची सोय. अशा विविध योजना शासन स्तरावर कार्यान्वित करण्यात आल्या. आदिवासी, प्रौढ नागरिक, महिला, बालके, ग्रामीण भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले गेले.

निसर्ग व संसाधने यांची लयलूट करून साध्य होणारा विकास हा चिरस्थायी नसतो, भविष्य काळातील पिढ्यांना त्यांच्या उपभोगासाठी साधनाची उपलब्धता राहील असा विचारपूर्वक वापर करून होणारा विकास ही आजच्या विकासाची मुख्य अट मानली जाते. नैसर्गिक साधने पर्यावरण उदा.- शुद्ध हवा,मृदा, पाणी, ऊर्जा इ. घटकांची शाश्वत उपलब्धता यावर भर दिला जात आहे.

थोडक्यात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेला भारत त्यावेळच्या परिस्थितीवर मात करत, सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने अग्रेसर होताना विविध क्षेत्रांतील बदलांना सामोरा जात आहे. मात्र या सर्वाला 'शाश्वत विकासाचे निकष' असणेही तितकेच महत्वाचे आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द :

**१) नैसर्गिक संसाधने –** मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी व निसर्गत: विनामुल्य उपलब्ध असणारी साधने.

**२) शिरगणती –** लोकसंख्येची मोजदाद करणे.

**३) पंचवार्षिक योजना –** आर्थिक विकास साधण्यासाठी सरकारने पाच वर्षासाठी तयार केलेली योजना.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.

**१.२.१**

१)- ब  २)- ब  ३)- क  ४)- ब

**१.२.२**

१)- ब  २)- क  ३)- ब  ४)- क  ५)- क

**१.२.३**

१)- ड  २)- ब  ३)- ब  ४)- क  ५)- ब

**१.२.४**

१)- अ  २)- ब  ३)-ड  ४)- ब  ५)- ब

## १.६ सरावासाठी प्रश्न

### अ) दिर्घोत्तरी प्रश्न

१. भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळची मुख्य वैशिष्टये सांगा.

२. भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्योत्तर घडून आलेले संरचनात्मक बदल स्पष्ट करा.

३. 'सर्वसमावेशक विकास' म्हणजे काय? तिचे विकासातील महत्व स्पष्ट करा.

४. 'शाश्वत विकासाची' संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

### ब) टीपा लिहा

१. शाश्वत विकास.

२. सर्वसमावेशक वृद्धी.

३. शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व.

४. हरित क्रांती.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. घाटगे एल. एन आणि वावरे ए. के – भारतीय अर्थव्यवस्था – निराली प्रकाशन १३१२ शिवाजी नगर पुणे ४११००५, प्रथमावृत्ती जून २०१०.

२) Rudder Datt. & K.P.M. Sundharam (2018) Indian Economy S. Chand & Company Ltd. Ram Nagar, New Delhi 110055

३) ए. बी. सौदी आणि पी. एस. कोळेकर. (१९९५) मानवी लोकसंख्या भूगोल, निराली प्रकाशन पुणे ४१ बुधवार पेठ, ४११००२.

४) डॉ. देसाई व डॉ. सौ. भालेराव (२०१६) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन ४१ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

५) Misra & Puri (2018), Indian Economy

६) Indian Economy - Pratiyogita Darpan

७) India - 2018

***

# घटक – २

# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने– ।

# ( Challenges before Indian Economy - I )

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ दारिद्र्याचा अर्थ व संकल्पना

२.२.२ दारिद्र्याची कारणे व उपाययोजना

२.२.३ बेरोजगारीचा अर्थ आणि प्रकार

२.२.४ बेरोजगारीची कारणे व उपाय

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

**२.० उद्दीष्ट्ये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) दारिद्र्याचा अर्थ आणि संकल्पना लक्षात येईल.

२) दारिद्र्याची कारणे व उपाय यांची माहिती होईल.

३) भारतातील बेरोजगारीचा अर्थ व प्रकार याचे आकलन होईल.

४) भारतातील बेरोजगारीची कारणे व उपाययोजना याचा अभ्यास करता येईल.

**२.१ प्रास्ताविक :**

घटक क्रमांक १ मध्ये आपण स्वातंत्र्यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्टये भारतीय अर्थव्यवस्थेतील

संरचनात्मक बदल, भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक वृद्धी व शाश्वत विकास या घटकांचा सविस्तर अभ्यास केला आहे. घटक क्रमांक२ मध्ये आपण भारतातील दारिद्र्य, त्याचा अर्थ आणि संकल्पना, दारिद्याची कारणे व उपाययोजना, भारतातील बेरोजगारी, तिचा अर्थ, प्रकार, कारणे व उपाययोजनांचा यांचा अभ्यास करणार आहोत. त्याचप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला वाढती लोकसंख्या, बेरोजगारी दारिद्र्य, आर्थिक व सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल, वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार यासारख्या महत्त्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांमुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. देशाचा विकास जर जलद गतीने व्हावयाचा असेल तर हे महत्वाचे प्रश्न सोडवावे लागतील. त्यासाठी भारत सरकार व घटकराज्ये प्रयत्नशील आहेत. तरीही या समस्यांची तीव्रता कमी होत नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात या समस्या कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्विकार केला आहे.

## २.२ विषय विवेचन :

सदर घटकामध्ये आपण भारतातील दारिद्र्याचा अर्थ, संकल्पना, कारणे व उपाय, बेरोजगारीचा अर्थ, प्रकार, कारणे व उपाय इ. विविध घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.१ भारतातील दारिद्र्याची समस्या :

भारताच्या अनेक प्रमुख समस्यापैकी दारिद्र्य ही एक महत्वाची समस्या मानली जाते. भारतात सार्वत्रिक दारिद्र्य आढळते. देशाच्या विकासामध्ये दारिद्र्यामुळे अडथळा निर्माण होतो आहे. भारतातील वाढती लोकसंख्या, बेकारीचे मोठे प्रमाण, आर्थिक विषमता, खाजगीकरण, शेतीप्रधान अर्थव्यवस्था अशा अनेक कारणामुळे भारतात दारिद्र्य व्यापक प्रमाणात आढळते. भारतात दारिद्र्य निवारण्यासाठी नियोजन काळात अनेक उपाययोजना आखण्यात आल्या. त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. परंतु भारतात आजही मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आढळून येते. भारतीय नियोजनाला मानवी चेहरा देण्याच्या दृष्टीने डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमावर भर देवून सामाजिक सशक्तता वाढविण्यावर भर देण्याचे सुचविले आहे.

### दारिद्र्याची संकल्पना :

दारिद्र्य ही आर्थिक व सामाजिक संकल्पना आहे. दारिद्र्याचे मोजमाप करणे कठीण काम आहे. दारिद्र्याची संकल्पना देशानुसार व समाजानुसार वेगवेगळी आढळते. भारत व इतर देशातील दारिद्र्याच्या संकल्पनेत मुलभूत स्वरूपाचा फरक आढळतो. दारिद्र्यामध्ये निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या दोन महत्वाच्या संकल्पना आहेत. दारिद्र्य ही संकल्पना फार जुनी संकल्पना असून स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी यांच्या दारिद्र्य आणि ब्रिटीशकालीन नियम या पुस्तकात यासंबंधी माहिती दिली आहे. अर्थशास्त्रामध्ये दारिद्र्याची संकल्पना संदिग्ध आहे. दरडोई उत्पन्न व उपभोग खर्च हे दारिद्र्याचे निर्देशांक असल्यामुळे वेगवेगळ्या देशामध्ये दारिद्र्याची पातळी वेगवेगळी असते म्हणून सापेक्ष दारिद्र्य व निरपेक्ष दारिद्र्य असे दारिद्र्याचे दोन प्रकार केले जातात.

### १) निरपेक्ष दारिद्र्य :

दारिद्र्याच्या निरपेक्ष संकल्पनेनुसार निर्वाहासाठी अत्यावश्यक असे एक निरपेक्ष मानक किंवा प्रमाण असते.

म्हणजेच जीवन जगण्यासाठी अन्नधान्य, कपडालत्ता आणि निवारा यांची किमान वास्तव परिमाणे असतात. या परिमाणांचे चालू किंमतीनुसार पैशात रूपांतर केले जाते. आणि अशा रितीने दरडोई किमान उपभोगाचा पैशातील आकडा ठरविला जातो. या व्याख्येच्या आधारे ज्या लोकांच्या उत्पन्नाची किंवा खर्चाची पातळी पैशात व्यक्त केलेल्या किमान आवश्यक उपभोगा पेक्षा कमी असते असे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत असे मानले जाते.

**२) सापेक्ष दारिद्र्य :**

लोकांचे सरासरी राहणीमान निरनिराळ्या देशात निरनिराळे असते. उदा. अमेरिकेसारख्या उच्च श्रीमंत देशातील सरासरी राहणीमान भारतातील सरासरी राहणीमानाशी तुलना करता फार उच्च पातळीवर आहे. अमेरिकेत जे लोक सरासरी राहणीमानापेक्षा खालच्या पातळीवरील जीवन जगतात असे लोक तेथे गरीब मानले जातील. श्रीमंत देशातील गरीब लोक भारतातील किंवा गरीब देशातील परिस्थितीच्या दृष्टीने श्रीमंत असू शकतात. भारताचा विचार केला तर जे लोक शहरी भागात गरीब मानले जातात त्यापैकी काही लोक देशाच्या ग्रामीण व आदिवासी भागातील गरीब लोकांशी तुलना करता श्रीमंत ठरू शकतात. तसेच ग्रामीण भागातील जे लोक गरीब समजले जातात त्यापैकी काही लोक भारतातील अन्य जाती-जमातीतील लोकांशी तुलना करता श्रीमंत मानता येतील. देशाच्या सरासरी राहणीमानाच्या तुलनेत दारिद्र्याची व्याख्या केली जाते. सरासरी राहणीमान पातळी देशपरत्वे बदलते म्हणून एखाद्या विशिष्ठ देशातील गरीब व्यक्ती इतर देशात श्रीमंत मानली जाते. तसेच भारतासारख्या देशातील श्रीमंतापैकी काही लोक श्रीमंत देशात गरीब मानले जाऊ शकतात.

**दारिद्र्याचा अर्थ :**

१) **श्री ओझा** : ''माणसाला दररोज आहारातून किमान २२५० उष्मांकाची गरज असते. व्यक्तीला त्यांच्या आहारातून २२५० कॅलरीज पेक्षा कमी उष्मांक मिळाल्यास त्याला दारिद्र्य किंवा गरीब समजावे.''

२) **गिलिन आणि गिलिन** : ''दारिद्र्य ही अशी अवस्था आहे आज की ज्यामध्ये व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नात असो या अयोग्य खर्चामुळे असो. ज्या समाजात ती व्यक्ती राहते तेथील राहणीमानाचा दर्जा गाठू शकत नाही की जो त्याची शारिरिक व मानसिक कार्यक्षमता वाढावी''

३) **जागतिक बँक** : ''दर माणसी दर दिवशी एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती होय.''

४) **जागतिक विकास अहवाल** : '' दारिद्र्य म्हणजे योग्य पद्धतीचे अन्न व निवारा यांचा अभाव ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पद्धतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य, शिक्षण सुविधा व पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही. थोडक्यात सर्व प्रकारच्या सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचीत असणे म्हणजे दारिद्र्य होय.''

५) **प्रा. अमर्त्य सेन** : ''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.''

६) **गोगार्ड** : '' दारिद्र्य म्हणजे स्वतःवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे पालन करण्यासाठी तसेच निरोगी

उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरूरीच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा होय.''

**दारिद्र्य रेषा संकल्पना** : ''ज्या खर्चाच्या पातळीस पोषणासाठी असलेले किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक अखाद्य वस्तू व सेवा उपलब्ध होऊ शकतात. ती खर्चाची पातळी म्हणजे दारिद्र्य रेषा होय.'' या रेषेच्या खालचे राहणीमान म्हणजे निकृष्ठ राहणीमान होय. तेव्हा निकृष्ठ राहणीमानामध्ये राहणाऱ्या लोकांना दारिद्र्य किंवा गरीब म्हणता येईल. निरक्षता, कमी उत्पन्न, बेकारी, उपासमार, कुपोषण, आजारपण, कमी आयुर्मान हे दारिद्र्याचे दर्शक आहेत. बकाल वस्त्यामध्ये राहणे, रोज योग्य पोटभर अन्न न मिळणे, पिण्याच्या पाण्याचा अभाव, अर्धनग्रता या अवस्थेत जगणे, वैद्यकीय सुविधा, शिक्षण व करमणूक यांचा अभाव असे दुःखी जीवनाचे चित्र म्हणजे दारिद्र्य होय. जागतिक दारिद्र्यरेषेनुसार दरडोई दर दिवशी १.२५ डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असणारी व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती म्हणून ओळखली जाते. त्यानुसार भारतातील ४०% लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. जागतिक बँकेच्या सन२०११ च्या अहवालात भारतातील ३२.७० %लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

**भारतातील दारिद्र्याचे प्रमाण** : दारिद्र्य हे आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतील मोठा अडसर आहे. प्रा.नर्क्स यांच्या मते देश दरिद्री आहे कारण तो दारिद्र्यात आहे. दारिद्र्य हे दारिद्र्याचे कारण आणि परिणाम आहे. हे दारिद्र्याचे दृष्टचक्र फिरत राहते. भारताच्या कमी विकासाचे दारिद्र्य हे मुख्य कारणही आहे व परिणामही आहे. भारतातील दारिद्र्याचे प्रमाण पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्रमांक – २.१**

**भारतातील दारिद्र्याचे प्रमाण**

| **वर्ष** | **१९७३–७४** | **१९८३** | **१९९३–९४** | **१९९९–२०००** | **२००४–०५** | **२००९–२०१०** |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५६.४ | ४५.७ | ३७.३ | २७.१ | २८.३ | ३३.८ |
| नागरी | ५९.० | ४०.८ | ३२.४ | २३.६ | २५.७ | २०.९ |
| **एकूण** | **५४.९** | **४४.५** | **३६.०** | **२६.१** | **२७.१** | **२९.८** |

तक्ता क्र. २.१ वरून असे दिसून येते की भारतातील दारिद्र्यात १९७३–७४ ते १९९९–२००० पर्यंत घट (५६% वरून २६.१%) होत गेल्याचे दिसते. मात्र २००४–०५ नंतर (२७.१%ते ३३.८%) पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. २०११ मध्ये योजना आयोगाने सर्वोच्च न्यायालयात शहरी भागासाठी ३२ रूपये व ग्रामीण भागासाठी २६ रूपये ही दरडोई दरदिवशी गरिबीची रेषा दिली आहे. २००९–१० मध्ये योजना आयोगाच्या मतानुसार ३५.५ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली होते.

**२.२.२ दारिद्र्याची कारणे :**

**१) लोकसंख्या वाढ :**

राष्ट्रीय उत्पन्नवाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल तर दारिद्र्य वाढते. भारतातील लोकसंख्येच्या वृद्धीदरात अलिकडील काळात काही प्रमाणात घट झाली असली तरी वृद्धी दर अजूनही जास्त आहे. त्यामुळे

दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग खर्च कमी राहून दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आहे.

**२) शेतीची कमी उत्पादकता :**

शेतीचा लहान आकार, भांडवलाचा अभाव, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे भारतीय शेतीची दर हेक्टरी व दर श्रमीक उत्पादकता अल्प आहे. पावसाची अनिश्चितता व वारंवार पडणारे दुष्काळ बहुताशी शेतीचे स्वरूप हंगामी व ती मान्सूनवर अवलंबून असल्याने शेती तोट्यात असल्याने शेतीतील संबंधित लोक कर्जबाजरी व दरिद्री आहेत.

**३) वाढती बेकारी :**

मंद औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती, यांत्रिकीकरण यामुळे रोजगार मागणीच्या तुलनेत रोजगार संधी कमी असल्याने दारिद्र्यात वाढ होत आहे.

**४) मंद आर्थिक विकास :**

गेल्या दोन दशकामध्ये देशाच्या विकासाचा वार्षिक दर ५% पेक्षा अधिक राहिलेला असला तरी १९५१ ते १९९० पर्यत हा दर केवळ सरासरी ३.५% इतकाच होता. वाढती लोकसंख्या ही विकासातील अडसर बनल्याने देशात अजूनही आर्थिक विकासाचा वेग मंदच आहे.त्यामुळे दारिद्र्य अधिक आहे.

**५) शिक्षण व कौशल्याचा अभाव :**

देशात आज शिक्षणप्रसार वाढत असला तरी ग्रामीण निरक्षरता अधिक आहे. देशात भांडवलाचा अभाव, संयोजन कौशल्याचा अभाव, व्यवसाय शिक्षणाचा अभाव, प्रशिक्षण व कौशल्याचा अभाव यामुळे भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आढळते.

**६) आर्थिक विषमता व भ्रष्टाचार :**

खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा भारताने स्वीकार केल्याने आर्थिक विषमता वाढत आहे. भ्रष्टाचार दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढला आहे. यामुळे देशात एकूण लोकसंख्येपैकी १०% लोकांकडे ९०% संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. ९०% लोकांकडे फक्त १०% उत्पन्न यामुळे दारिद्र्य टिकून आहे. जेवढी आर्थिक विषमता अधिक तितके सामाजिक कल्याण कमी म्हणजे विषमतेमुळे दारिद्र्याची तीव्रता वाढते.

**७) मूल्यांची घसरण :**

भारतात पूर्वी मानवी मुल्यांधिष्ठित व्यवस्था होती. त्या मुल्यव्यवस्थेमुळे दारिद्र्याची तीव्रता जाणवत नव्हती. परंतु विज्ञान व तंत्रविज्ञानातील प्रगती, औद्योगिकरण, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय रचना बदलली आहे. कल्याणकारी राज्यव्यवस्थेपासून सरकार दूर चालले आहे. खाजगीकरणाकडे सरकारचा अधिक कल असल्यानेच या बदलत्या रचनेतून मुल्यांची घसरण होत आहे. हेही दारिद्र्याचे एक कारण आहे.

**८) भाववाढ :**

भाववाढ हेही दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. जेव्हा वस्तूंच्या किंमती वाढतात. तेव्हा पैशाची खरेदी

शक्ती कमी होते आणि त्याचा परिणाम समाजातील कनिष्ठ, मध्यम व गरीब वर्गावर होतो. १९५५ पासून भारतात सातत्याने भाववाढ घडून येत आहे. त्यामुळे देशातील गरीब लोकांच्या संख्येत वाढ होत आहे.

**९) पर्यायी रोजगार क्षेत्राचा अभाव :**

ग्रामीण भागात पर्यायी रोजगार क्षेत्रे उपलब्ध नसून वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीक्षेत्रावरील ताण अधिकाधिक वाढत आहे. परिणामत: ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यात भर पडत आहे. ग्रामीण भागात निरक्षरतेमुळे व अंधश्रद्धेमुळे, तसेच पारंपारिक धार्मिक समजुतीमुळे कुटुंबनियोजन कार्यक्रम परिणामकारक ठरलेले नाहीत. त्यामुळे लोकसंख्या वाढून दारिद्र्य वाढच होत आहे..

**१०) जमिन वाटपात विषमता :**

भारतातील फार मोठ्या लोकसंख्येचे उपजिवीकेचे साधन शेती हे आहे. ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. मात्र भारतात एकूण ग्रामीण कुटुंबापैकी ५५% कुटुंबाकडे १ हेक्टरपेक्षा कमी व १८% कुटुंबाकडे १ ते २ हेक्टर आकाराच्या जमिनी होत्या. तर ग्रामीण भागातील ५०% लोकांकडे जमिनीची कसलीही मालकी नाही. थोडक्यात ग्रामीण भागात बहुसंख्य लोक अल्पभूधारक व भूमीहीन असल्याने त्यांना शेतीतून कमी उत्पन्न मिळत असल्याने दारिद्र्यात वाढ होत आहे.

**११) दारिद्र्याचे दुष्टचक्र :**

दारिद्र्याचे कारण त्या देशाच्या गरीबीत सापडते. भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याने त्यांची बचत व भांडवल गुंतवणूक कमी आहे. त्यामुळे रोजगार व उत्पादन कमी राहून दारिद्र्य वाढते आहे.

**१२) नैसर्गिक आपत्ती :**

भारतात दुष्काळ, महापूर अतिवृष्टी, भूकंप, प्रतिकूल हवामान, अनिश्चित मान्सून यामुळे लोकांच्या उत्पन्नात सातत्य राहत नाही. त्यामुळे दारिद्र्य मात्र सातत्याने वाढत आहे.

**दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना :**

**१. उद्योगधंदे सुरू करणे :**

शहरी व ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू केल्यास लोकांना रोजगार मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांचे दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

**२. लोकसंख्या नियंत्रण :**

वेगाने वाढणारी लोकसंख्या भारतातील दारिद्र्य वाढविण्यास कारणीभूत ठरलेली आहे. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या कार्यक्रमात लोकसंख्या नियंत्रणावर भर देण्यात आला आहे. यामुळे लोकसंख्या वाढीचा दर काही प्रमाणात कमी झाला असला तरी लोकसंख्येचा सातत्याने आकार वाढत आहे.

**३. आर्थिक विकासाचा वेग वाढविणे :**

दारिद्र्य निर्मूलनाचा सर्वात योग्य उपाय म्हणजे आर्थिक विकासाचा वेग वाढविणे होय. हा वेग वाढल्यामुळे

गरीब वर्गातील लोकांना अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या वस्तू उपलब्ध होतात. आर्थिक विकासाचा वेग वाढविल्यास दारिद्र्य निर्मूलनास मदत होते.

**४. गरीब शेतकऱ्यांना साहाय्य :**

सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतकरी, कोरडवाहू शेतकरी अशा आर्थिकदृष्ट्या गरीब शेतकऱ्यांना सरकारने खते, बी-बियाणे, वीज कमी दराने पुरवावीत. तसेच कर्जाचा पुरवठा पुरेसा व बिनव्याजी करावा. अशा शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी बिनव्याजी किंवा कमी दराने कर्जपुरवठा करावा व अशा व्यवसायाचे मार्गदर्शन करण्यात यावे.

**५. कुटुंबातील एका व्यक्तीस रोजगार :**

प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीस रोजगार देण्यात यावा. अशा योजना राबविल्या तर संपत्तीचे केंद्रीकरण कमी होईल व आणखी एका जादाच्या कुटुंबातील व्यक्तीला रोजगार/नोकरी मिळाल्यास त्यांचे दारिद्र्य दूर होण्यास मदत होईल.

**६. शिक्षणाचा प्रसार :**

शिक्षणाचा प्रसार दारिद्र्य निर्मूलनावरील उपाय आहे. देशात नियोजन काळात शिक्षणप्रसारावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला. शिक्षण प्रसारामुळे लोकसंख्या वाढ कमी होण्यास मदत झाली आहे. त्याबरोबर रोगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**७. आर्थिक विषमता कमी करण्यावर भर :**

भारतात उत्पन्न व संपत्तीमधील विषमता कमी करण्यासाठी सरकारने श्रीमंतावर उत्पन्न कर, व्यवसाय कर, असे विविध कर बसवून मिळालेल्या पैशातून गरीबासाठीच्या दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. मोठ्या शेतकऱ्यांकडील जादाची जमिन काढून घेऊन भूमिहीनांना त्याचे वाटप करण्यात येत आहे. अशारीतीने दारिद्र्य कमी करण्यासाठी उत्पन्न व संपत्ती वाटपातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**भारतातील योजना काळातील दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम :**

**१. ग्रामीण भूमिहीन मजूर रोजगार हमी कार्यक्रम :**

या योजनेची सुरूवात १५ ऑगस्ट १९८३ मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूराला १०० दिवस रोजगार देण्याची हमी या योजनेत आहे. या योजनेत कुटुंबातील किमान एका व्यक्तीला अशी हमी देते. केंद्रपुरस्कृत ही योजना राज्यशासनामार्फत अंमलात आणली जाते.

**२. प्रधान मंत्री ग्रामोदय योजना :**

२०००-२००१ मध्ये सुरू केलेल्या प्रधानमंत्री ग्रामोदय योजनेअंतर्गत खेड्यातील गरीबांना पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य योजना, राहण्यासाठी घरे आणि शिक्षण दिले जाते.

**३. इंदिरा महिला योजना :**

गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी इंदिरा महिला योजना सुरू करण्यात आली होती.

**४. इंदिरा आवास योजना :**

(१९८५-८६) या योजनेतून गरीबांना घरे बांधणीसाठी आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा ६०% फायदा हा अनुसुचित जाती व जमाती यांच्यासाठी आहे. तसेच डोंगरी व आदिवासी भागातील गरीबांना घर बांधणीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

**५. राष्ट्रीय रोजगार हमी योजना :**

(२ फेब्रुवारी २००६) सर्वप्रथम देशातील २०० जिल्ह्यात लागू केली. या योजनेतून कुटुंबातील एका व्यक्तीला १०० दिवस रोजगार दिला जातो. या योजनेची सुरूवात प्रथम आंध्रप्रदेश या राज्यात झाली. या योजनेतून वृक्ष लागवड, जलसंवर्धन, जलव्यवस्थापन, ग्रामीण विकास, रस्ते बांधणी इत्यादी कामे केली जातात.

**६. भारत निर्माण योजना :**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी भारत सरकारने भारत निर्माण योजना सुरू केली. या योजनेची घोषणा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००५ मध्ये केली. पाटबंधारे, रस्ते, घरे, पाणी, वीज व दूरध्वनी अशा ग्रामीण भागातील क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याची हमी या योजनेत देण्यात आली आहे.

**७. अंत्योदय अन्न योजना (डिसेंबर २०००) :**

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबापैकी गरीबात गरीब अशा १ कोटी कुटुंबांचा या योजनेत समावेश केला आहे. योजनेखालील प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रूपये किलो आणि तांदूळ ३ रू. किलो अशा दराने २५ किलो अन्नधान्य पुरविले जाते.

**८. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (डिसेंबर २०००) :**

दहाव्या योजनेच्या समाप्तीपर्यंत जेथे रस्ते नाहीत अशा ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील रस्त्याने जोडल्या न गेलेल्या १.८ लाख वस्तीस्थानांना रस्त्याची सुविधा पुरविण्याची ही योजना. ही योजना देशभर राबविली जाते.

**९. कामाच्या मोबदल्यात धान्य कार्यक्रम (फेब्रु २००१) :**

हा कार्यक्रम दुष्काळग्रस्त ग्रामीण भागात राबविला जातो. हा कार्यक्रम ८ राज्यात लागू करण्यात आला आहे. इतर दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम : पंतप्रधान रोजगार योजना (२००८-०९), जयप्रकाश रोजगार हमी योजना (२००२), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (१९९७), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२५ सप्टें २००१), एकात्मिक ग्रामीण विकास योजना (२ आक्टोबर १९८०), दुष्काळपिडीत क्षेत्र कार्यक्रम (१९७३), किमान गरजा कार्यक्रम, वीस कलमी कार्यक्रम (१९७५-१९८२), निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम (१९७७), खेडे विकास कार्यक्रम, ग्रामीण भागातील स्त्री व बाल विकासासाठीचा कार्यक्रम, समग्र आवास योजना (१९९९), जवाहर रोजगार योजना (१९८९).

**१०. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

सप्टेंबर २०११ मध्ये जवाहर ग्रामसमृद्धी योजना आली आहे. अशा प्रकारे भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम राबविले परंतु रोजगार निर्मितीच्या तुलनेत रोजगार मागणाऱ्यांची संख्या व लोकसंख्या जलद गतीने वाढल्याने दारिद्र्याचे प्रमाण वाढूच लागले आहे.

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्न :(वस्तूनिष्ठ प्रश्न)**

**दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) जागतिक बँकेच्या सन २०११ च्या अहवालानुसार भारतात .. % लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आढळते.

(अ) ४०% (ब) ३२.७०% (क) ४१% (ड) ४५%

२) ..... यांच्या मते देश दरिद्री आहे कारण तो दरिद्री आहे.

(अ) कार्ल मार्क्स (ब) प्रा.नर्क्स (क) जे.एम. केन्स (ड) मार्शल

३) भारत निर्माण योजनेची घोषणा .... यांनी केली.

(अ) इंदिरा गांधी (ब) राजीव गांधी (क) मनमोहन सिंग (ड) प्रणव मुखर्जी

४) पंतप्रधान ग्रामसडक योजना ..... मध्ये सुरू करण्यात आली.

(अ) १९८२ (ब) २००० (क) २००६ (ड) २०१०

५) जवाहर ग्रामसमृद्धी योजना व रोजगार हमी योजना यांचा समावेश .... योजनेत करण्यात आला आहे.

(अ) राष्ट्रीय रोजगार हमी योजना (ब) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

(क) पंतप्रधान रोजगार योजना (ड) जवाहर रोजगार योजना

**२.२.३ भारतातील बेरोजगारीची समस्या :**

जगातील सर्वच देशामध्ये सध्या बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. भारतातही ही समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. भारताला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांमध्ये बेकारीच्या समस्येला विशेष महत्त्व आहे. कारण वाढत्या बेकारीचे समाजावर व देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकुल परिणाम जाणवत आहेत. याकरिता या प्रश्नाचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

**बेरोजगारीचा अर्थ व प्रकार :**

बेरोजगारी म्हणजे काय? बेरोजगार कोणाला म्हणावे? याबाबत एक वाक्यता आढळून येत नाही. बेरोजगारीबाबत अनेकांनी व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही व्याख्यावरून बेरोजगारीचा अर्थ आपल्याला कळेल.

१) ''प्रचलित वेतनदारावर काम करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या व्यक्तींना काम न मिळण्याची स्थिती म्हणजे बेरोजगारी होय.''

२) प्रा.पिगू मते,'' रोजगारात नसलेल्या परंतू रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेकार म्हणता येईल.''

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बेरोजगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. बेरोजगारी भारतात सार्वत्रिक स्वरूपात आढळते. भारतात ग्रामीण बेरोजगारी व शहरी बेरोजगारी अशी दोन प्रकारची बेरोजगारी दिसून येते. ग्रामीण भागात पूर्ण बेरोजगारी, अर्धबेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुप्त बेरोजगारी व सुशिक्षित बेरोजगारी

आढळते. भारतात वाढती लोकसंख्या, यांत्रीकीकरण, चलनवाढ, शेती व उद्योगांचा कमी विकास, लघु, कुटीर व ग्रामोद्योगांचा ऱ्हास इ. कारणामुळे भारतात बेरोजगारींच्या संख्येत वाढ होत आहे.

**तक्ता क्रमांक २.२**

**भारतातील बेरोजगारीचे स्वरूप (आकडेवारी लाखात)**

| अ.क्र. | वर्ष | एकूण उपलब्ध श्रमशक्ती | काम मिळालेली श्रमशक्ती | बेरोजगार व्यक्तींची संख्या | बेरोजगारीचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९७१ | १८०.४ | १६१.७ | १८.७ | १०.४ |
| २) | १९८३ | २७७.३४ | २६९.३६ | ७.९८ | २.८८ |
| ३) | १९९३-९४ | ३४३.५६ | ३३४.५४ | ९.०२ | २.६२ |
| ४) | १९९९-२००० | ३७७.८८ | ३६७.३ | ७१०.५१ | १३.१० |
| ५) | २००९-१० | ४१९.७ | ३८४.९ | ३४.१७ | - |
| ६) | २००९-१० | ४२८.९ | ४००.०८ | २८.०१ | - |

**संदर्भ -** अ) डॉ. घाटगे - डॉ. वावरे - भारतीय अर्थव्यवस्था २०१०, निराली प्रकाशन, पुणे, पान क्र. १२.१ ब) देसाई - भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था २०१०, निराली प्रकाशन, पुणे. पान क्र. ४४.५

भारतात १९५१ मध्ये ९ लाख लोक, तर १९५६ मध्ये ५३ लाख लोक बेरोजगार होते. त्यानंतर भारतातील बेरोजगारीच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. तक्ता क्र. २.२ वरून एकूण उपलब्ध श्रमशक्ती, काम मिळालेली श्रमशक्ती, बेरोजगार व्यक्ती यामध्ये १९७१ ने २००९-१० पर्यंत वाढच झाल्याचे दिसून येते. बेरोजगारीचा दर मात्र कमी-जास्त झाल्याचे दिसते. तो सुरूवातीला अधिक होता, त्यानंतर तो कमी होत गेला व त्यानंतर पुन्हा त्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**भारतातील बेरोजगारीचे प्रकार :**

**१) हंगामी बेरोजगारी :**

हंगामी बेरोजगारीचा प्रकार शेतीक्षेत्रात आढळतो. ज्यांना शेतीत हंगामपुरतेच काम मिळते व इतरवेळी त्यांना कामाविना राहावे लागते. अशा बेरोजगारीला हंगामी बेरोजगारी असे म्हणतात.

**२) सुप्त/ छुपी बेरोजगारी :**

जी व्यक्ती वरवर पाहता कामात गुंतलेली दिसते परंतू त्या व्यक्तीमुळे उत्पादनात काहीच बदल होत नाही. त्याची उत्पादनक्षमता शून्य असते. अशा बेरोजगारीला छुपी/सुप्त बेरोजगारी असे म्हणतात. हा बेरोजगारीचा प्रकार शेतीक्षेत्रात आढळतो.

**३) ऐच्छिक बेरोजगारी :**

प्रचलित वेतनदारावर ज्यांची काम करण्याची पात्रता असूनही जे स्वइच्छेने रोजगाराविना राहतात त्याला ऐच्छिक बेरोजगार असे म्हणतात.

**४) अनैच्छिक बेरोजगारी :**

प्रचलित वेतनदारावर काम करण्याची इच्छा, पात्रता, कौशल्य, कुवत, ज्ञान असूनही जर रोजगार मिळत नसेल तर त्याला अनैच्छिक बेरोजगारी असे म्हणतात. अशी बेरोजगारी सर्वच क्षेत्रात आढळते.

**५) चक्रीय बेरोजगारी :**

तेजी-मंदीच्या व्यापार चक्रामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीला चक्रीय बेरोजगारी असे म्हणतात.

**६) घर्षणजन्य बेरोजगारी :**

जे लोक एक रोजगार सोडून दुसरा रोजगार शोधतात व दुसरा रोजगार मिळेपर्यंत त्यांना बेरोजगार राहावे लागते त्यालाच घर्षणात्मक बेरोजगारी असे म्हणतात.

**७) संरचनात्मक बेरोजगारी :**

उत्पादन तंत्रात व यंत्रात होणाऱ्या बदलामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीला संरचनात्मक बेरोजगारी असे म्हणतात.

**८) सुशिक्षितांची बेरोजगारी :**

जेव्हा व्यक्तींना पुरेसे उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण घेऊनही त्यांना जेव्हा रोजगार मिळत नाही तेंव्हा त्याला सुशिक्षित बेरोजगारी असे म्हणतात.

**९) औद्योगिक बेरोजगारी :**

औद्योगिक क्षेत्राचा कमी विकास, यंत्राचा वाढता वापर यामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांना रोजगार मिळत नाही. त्यांना औद्योगिक बेरोजगारी असे म्हणतात. वरील बेरोजगारीच्या प्रकाराबरोबरच कायमस्वरूपी बेरोजगारी, दीर्घकालीन बेरोजगारी, अर्ध बेरोजगारी इ. प्रकार आढळतात.

**२.२.४ भारतातील बेकारीची कारणे व उपाय :**

**भारतातील बेरोजगारीची कारणे :**

**१) लोकसंख्या वाढ :**

जगाच्या एकूण भूभागापैकी २.४ भूभाग व एकूण लोकसंख्येपैकी १७.५ लोकसंख्या भारतात राहते लोकसंख्येच्या दृष्टीने भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी अधिक वेगाने वाढत असल्याने अशा वाढत्या लोकसंख्येला रोजगाराच्या पुरेशी संधी निर्माण होत नसल्याने लोकसंख्या वाढीबरोबर बेरोजगारीतही वाढ होते.

**२) मंद आर्थिक विकास :**

भारतात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे प्रतिवर्षी रोजगार (नोकऱ्या) मागणाऱ्यांची

संख्या खूपच वाढत आहे. परंतू भारतात आर्थिक विकास मंद गतीने होत असल्यामुळे प्रत्येक वर्षी मागणीच्या प्रमाणात नवीन रोजगाराची (नोकऱ्यांची) संख्या मात्र वाढत नाही. त्यामुळे प्रत्येक वर्षी बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे.

**३) हस्तोद्योग व ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास :**

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी ग्रामीण भागात असणाऱ्या हस्तोद्योगांचा व ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास झाला. ग्रामोद्योगात श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जात असल्याने अधिकाधिक लोकांना रोजगार प्राप्त होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या उद्योगांचे पुनर्जीवन करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध योजना राबविल्या जात आहेत. परंतू त्यात हवे तेवढे यश न आल्याने बेरोजगारीत वाढ झाल्याचे दिसून येते.

**४) शेतीचे हंगामी स्वरूप :**

भारतातील शेती अद्यापी मोठ्या प्रमाणावर पावसावर व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. अद्यापही ७०% शेती सिंचनाशिवाय कोरडवाहू आहे. दुष्काळाचे प्रमाण वाढत आहे. पाणी टंचाईच्या समस्येने भयानक स्वरूप धारण केले आहे. वीजेची टंचाई अशा अनेक कारणामुळे वर्षातून अनेक पिके घेता येत नाहीत. शेतीचे हंगामी स्वरूपामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

**५) दारिद्र्य :**

दारिद्र्य हे बेकारीचे कारण आहे व अनेक व्यक्ती गरीब असण्याचे कारण बेकारी आहे. व्यक्ती गरीब असल्यामुळे त्यांच्याकडे साधन सामग्रीची टंचाई असते व त्यामुळे त्यांना रोजगार मिळविता येत नाही. गरिबीमुळे त्यांना व्यवसायही सुरू करता येत नाही. नोकरी मिळविण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. तो गरीबांकडे नसल्याने त्यांना बेरोजगार राहावे लागते.

**६) यांत्रिकीकरणावर भर :**

भारतात भांडवल प्रधान तंत्राचा वापर वाढल्यामुळे पुरेशा प्रमाणात रोजगार संधी निर्माण होऊ शकल्या नाहीत. भारतातील उद्योजक सातत्याने वाजवीकरण, आधुनिकीकरण, श्रमाची बचत करणाऱ्या यंत्राचा वापर, यावर भर देत आहेत. त्यामुळे श्रमाऐवजी यंत्राचा वापर वाढल्याने बेरोजगारीत वाढ होत आहे.

**७) एकत्र कुटुंब पद्धती** : ग्रामीण भागात सुप्त बेकारीचे एकत्र कुटुंब पद्धती हे महत्त्वाचे कारण आहे. लोकसंख्यावाढीमुळे कुटुंबाच्या आकारमानात वाढ होते. परंतु शेतजमिनीच्या आकारमानात वाढ होत नाही. त्यामुळे जमीनीच्या तुलनेत लोकांचे प्रमाण अधिक होते त्यामुळे छुपी किंवा प्रछन्न बेकारी निर्माण होते. शेती क्षेत्रावर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडल्याने छुप्या बेकारीत वाढ होते.

**८) नवीन आर्थिक धोरण :**

१९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारून अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, शिथिलीकरणाला परवानगी दिल्याने परदेशातून उच्च तंत्रज्ञान व प्रगत यंत्रसामग्री भारतात आल्याने कामगारांची संख्या कमी करण्यात आल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे.खाजगीकरण व यांत्रीकरणामुळे अनेक उद्योगात नोकर कपात करण्यात येत आहे. त्यामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

**९) दोषपूर्ण शिक्षण व्यवस्था :**

भारतात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याने प्रत्येक वर्षी शिक्षण घेऊन पदवीधर होऊन लाखो विद्यार्थी बाहेर पडत आहे. परंतू अशा प्रकारचे शिक्षण औद्योगिक क्षेत्रात फारसे उपयोगी पडत नाही त्यामुळे असे शिक्षण घेणाऱ्यांना नोकऱ्या/ रोजगार मिळत नाही. भारतात उद्योग, सेवा क्षेत्राच्या गरजा विचारात घेऊन शिक्षण पद्धती विकसित करण्यात आली नाही त्यामुळे केवळ कारकुनी स्वरूपाची नोकरी करू इच्छिणाऱ्या बेकारांची संख्या वाढत आहे. व्यावसायिक शिक्षणाचा भर न दिल्याने स्वयंरोजगार करण्यांचे प्रमाण कमी आहे त्यामुळे बेरोजगारी वाढत आहे.

**१०) औद्योगिकरणाचा मंद वेग :**

भारतात नियोजन काळात औद्योगिकीकरणाचा वेग वाढविण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. याला काही प्रमाणात यशही आले. परंतु शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्या सामावून घेण्याइतपत औद्योगिक क्षेत्रात रोजगारसंधी निर्माण झाल्या नाहीत. मोठ्या शहरातच उद्योगांची वाढ झाली. मात्र देशाच्या अनेक भागात औद्योगिक प्रगती फारशी झाली नसल्याने बेरोजगारीत वाढ होत आहे.

**१०) अपुरे रोजगार नियोजन :**

भारतात नियोजनाला १९५१ पासून सुरूवात झाली परंतू देशातील बेकारीच्या प्रश्नाला नियोजनात कधीही प्राधान्य देण्यात आले नाही. नियोजन काळात मनुष्यबळ नियोजनाचा विचार करण्यात आला नाही. देशाचा आर्थिक विकास घडून आला, की आपोआप रोजगार वाढेल असा विचार नियोजन काळात करण्यात आला परंतु रोजगार वाढीसाठी जाणीवपूर्वक राष्ट्रीय धोरण आखून त्याची पद्धतशीरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न न केल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**बेरोजगारीवरील उपाय योजना :**

**१) लोकसंख्या वाढ रोखणे :**

लोकसंख्या वाढ ही बेरोजगारी वाढीची महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे आवश्यक आहे. भारतात लोकसंख्या वेगाने वाढत राहिल्यास त्यांना रोजगार पुरविणे अतिशय अडचणीचे ठरेल. म्हणून शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी कुटुंबनियोजन करण्याचा प्रचार व प्रसार करावा. आणि लोकांनीही स्व व देश कल्याणासाठी कुटुंबनियोजनाचा अवलंब केल्यास बेरोजगारी आपोआप नियंत्रित होईल.

**२) आर्थिक विकासाची गती वाढविणे :**

भारतात आर्थिक विकास सुरू आहे परंतु तो मंद गतीने होत आहे. जर भारताचा आर्थिक विकास जलद गतीने घडवून आणल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार (नोकऱ्या) उपलब्ध होतील.

**३) शेतीपूरक उद्योगांचा विकास :**

भारताच्या ग्रामीण भागात शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन,

इ. व्यवसायांना प्रोत्साहन दिल्यास तसेच ग्रामीण भागात लघु, कुटीर उद्योग व शेतीपुरक उद्योग विशेषतः शेतमालावर आधारीत प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण केल्यास बेरोजगारी कमी होईल.

**४) रोजगार निर्मितीचे कार्यक्रम व योजना राबविणे :**

भारतात नियोजन सुरूवात झाल्यापासून बेरोजगारी दूर करण्यासाठी रोजनिर्मिती करण्यासाठी अनेक कार्यक्रम व योजना राबविल्या जात आहेत. परंतू त्या रोजगार मागणीच्या तुलनेने अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे अनेक नवीन रोजगार निर्मित्तीचे कार्यक्रम प्रकल्प व योजना प्रभावीपणे राबवण्यात यावे. देशातील मनुष्यबळाचा विचार करून रोजगार वाढीसाठी जाणीवपूर्वक राष्ट्रीय रोजगार धोरण आखून त्याची पद्धतशीरपणे अंमलबजावणी केल्यास बेरोजगारी कमी करण्यात यश प्राप्त होईल. नियोजन काळात देशात रोजगार वाढीसाठी शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (आक्टोबर १९८०) ग्रामीण भूमीहीन रोजगार कार्यक्रम (१५ ऑगस्ट १९८३), प्रधानमंत्री रोजगार योजना (१९९३), ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम (१९९५), स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (१एप्रिल १९९९) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२०००), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना(१९९७),जवाहर रोजगार योजना (२८/४/१९८९), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२००५) प्रमुख कार्यक्रम रोजगार निर्मितीचे कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. (ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम १९६१, ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना १९७१-७२ कामासाठी धान्य कार्यक्रम १९७७, ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांना रोजगार हमी योजना(१९८३), राष्ट्रीय रोजगार हमी योजना (२००६).

**५) शेतीपूरक व्यवसायाचा विकास करणे :**

ग्रामीण भागात रोजगारी निर्माण करण्यासाठी शेती व्यवसायाला पूरक असणारे दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन यासारख्या व्यवसायाचा विकास केल्यास रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. अलिकडे सरकार शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देवून मदत करीत आहे त्यामुळे बेरोजगारी काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.

**६) शेती आणि उद्योगाचा विकास :**

भारत हा शेतीप्रधान देश असून शेती मागासलेली आढळते त्यामुळे रोजगार निर्मिती होत नाही.जर शेतीचा विकास केला तर रोजगार निर्मिती होईल. सध्या शासनामार्फत शेती विकासाच्या विविध योजना राबविल्या जात आहे. शेतीचा विकास व्हावयाचा असेल तर उद्योगाचा विकास झाला पाहिजे. उद्योगातील अनेक समस्या आणि अडचणीमुळे उद्योगांची प्रगती म्हणावी अशी होत नाही. त्यामुळे उद्योग व शेतीच्या विकासाच्या योजना राबविल्यास निश्चितच बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल.

## २.६ सारांश :

विकसित आणि विकसनशील देशातील बेकारीचे स्वरूप, व्याप्ती वेगवेगळी असल्याने विकसनशील देशातील बेकारीचे वेगळ्यां पद्धतीने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. भारतातील बेकारीची समस्या विचारात घेत असताना बेकारीचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि आजपर्यंत करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यावरून आपणास बेकारीच्या समस्येचे बदलते स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. बेकारी आणि दारिद्र्य एकमेकांच्या हातात हात घालून येतात बेकारी तेथे दारिद्र्य आणि दारिद्र्य तेथे बेकारी

पाहाण्यास मिळते त्यामुळे बेकारीच्या समस्ये बरोबरच दारिद्र्याच्या समस्येचेही विचार करावा लागतो. भारतामध्ये अजूनही दारिद्र्य ही संकल्पना समजून घेत असताना निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या संकल्पना विचारात घ्याव्या लागतात. त्याप्रमाणेच भारतातील दारिद्र्याचे प्रमाण मोजमाप याबाबतीतही अभ्यास करण्यात आलेला आहे. दारिद्र्य ही संकल्पना समजून घेतल्यानंतर भारतातील दारिद्र्याची कारणे आणि त्यावर आजपर्यंत केलेल्या उपायोजनांचा आढावा घेणे सोयीचे होते. या उपघटकांमध्ये यासंबंधीची सर्व माहिती घेण्यात आली आहे.

**२.४ पारिभाषिक शब्द :**

दारिद्र्य : गरीबी २) श्रमशक्ती–श्रमीकांची काम करण्याची कुवत किंवा त्यांची संख्या ३) बेरोजगार– रोजगार नसलेला ४) सार्वत्रिक – देशभर ५) आर्थिक उदारीकरण – आर्थिक नियंत्रणे शिथिल करणे.

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतीय अर्थव्यवस्था ............................................ आहे.

(अ) विकसनशील (ब) विकसित (क) अविकसित (ड) यापैकी नाही.

२. शेती क्षेत्रात ................................................ प्रकारची बेकारी आढळते.

(अ) चक्रीयर (ब) सुप्त (क) घर्षणात्मक (ड) यापैकी नाही

३. भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार .................................. मध्ये केला.

(अ) १९५१ (ब) १९७१ (क) १९९१ (ड) २००१

४. भारतात जवाहर रोजगार योजनेची सुरूवात ..... मध्ये झाली.

(अ) १९८९ (ब) २००१ (क) १९७२ (ड) २००५

५. राष्ट्रीय रोजगार हमी योजना ..... मध्ये सुरू करण्यात आली.

(अ) २००१ (ब) २००६ (क) २०११ (ड) २००२

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तुनिष्ठ प्रश्न) उत्तरे :**

२.५ – १) अ २) ब ३) क ४) अ ५) ब

३.५ – १) ब २) ब ३) क ४) ब ५) ब

**२.७ : सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा लिहा :**

१) बेरोजगारीचे प्रकार २) बेरोजगारीची कारणे ३) बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजना

४) भारतातील दारिद्र्य ५) भारतातील दारिद्र्याची कारणे

६) दारिद्र्य निर्मूलनाच्या उपाययोजना

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील बेरोजगारी वाढीची कारणे सांगून ती कमी करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा.

२) भारतातील दारिद्र्याच्या समस्येचा सविस्तर आढावा घ्या.

**२.८ : अधिक वाचनसाठी संदर्भ ग्रंथ :**


१) भारतीय अर्थव्यवस्था : देसाई-भालेराव, निराली प्रकाशन-९ वी आवृत्ती, सप्टेंबर २०१२

२) भारतीय अर्थव्यवस्था : घाटगे-वावरे, निराली प्रकाशन, प्रथम आवृत्ती जून २०१०.

३) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०१०.

४) अर्थव्यवस्था, नियोजन आर्थिक विकास आणि कृषी : जाधव-काळे-मगर सुर्यवंशी, रत्नाई पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, एप्रिल २०१२.

५) शिवार्थ २३ वे वार्षिक अधिवेशन शिवाजी विद्यापीठ,इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर २०१३

६) भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. प्रभाकर देशमुख,पिंपळी पुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

७) भारतीय अर्थव्यवस्था : भोसले- भोसले-कदम-फडके प्रकाशन, कोल्हापूर-प्रथम आवृत्ती २०१८

७) Indian Economy - Datt Sundaram - S. Chand Company Ltd. New Delhi.

८) भारतीय अर्थव्यवस्था : साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

९) Indian Economy - A. N. Agarwal, Wishwa Prakashan, New Delhi.


***

# घटक ३
# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने – II
# ( Challenges before Indian Economy - II)

**अनुक्रमाणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ वाढती आर्थिक विषमतेची समस्या व ती कमी करण्याचे उपाय.

 ३.२.२ सामाजिक विषमतेची समस्या व ती कमी करण्याचे उपाय.

 ३.२.३ भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या व त्यावरील उपाययोजना

 ३.२.४ आंतरराष्ट्रीय तुलना : राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक.

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


**३.० उद्दिष्ट्ये**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) भारतातील वाढत्या आर्थिक व सामाजिक विषमतेची समस्या करता येईल.

२) भारतातील आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्याचे उपायांचा अभ्यास करता येईल.

३) भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या जाणून घेता येईल.

४) भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या कमी करण्याचे उपाय यांचा अभ्यास करता येईल.

५) भारतातील राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक यांची आंतरराष्ट्रीय तुलना समजून घेता येईल.

**३.१ प्रस्तावना :**

घटक क्रमांक २ मध्ये आपण भारतातील बेरोजगारी, तिचे प्रकार, कारणे व उपाययोजनांचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे भारतातील दारिद्र्य, संकल्पना, कारणे व उपाययोजना यांचा आढावा घेतला आहे. घटक क्रमांक ३ मध्ये आपण भारतात अलिकडे वाढत जाणाऱ्या आर्थिक व सामाजिक विषमतेच्या समस्येचाही आढावा घेणार असून भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्येचा आपण अभ्यास करणार आहोत. तसेच भारतातील राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांकाची आंतरराष्ट्रीय तुलना याचा आपण अभ्यास करणार आहे. या समस्यांची तीव्रता कमी होत नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात या समस्या कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्विकार केला आहे.

**३.२.१ भारतातील आर्थिक विषमता :**

भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेत समतोल आर्थिक विकास होणे ही महत्त्वाची बाब आहे. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनकाळात समतोल आर्थिक विकास होणे गरजेचे होते. परंतु तसे न होता त्यामध्ये विषमता वाढतच आहे.

**अ) आर्थिक विषमतेचा अर्थ व स्वरूप :**

आर्थिक विषमतेला गरीब आणि श्रीमंतामधील अंतर, संपत्तीची विषमता, उत्पन्नातील फरक असेही म्हटले जाते. ''देशातील एकूण लोकसंख्येमध्ये अगर दोन व्यक्तीमध्ये संपत्तीचे व उत्पन्नाचे होणारे असमान वितरण म्हणजे आर्थिक विषमता होय.'' थोडक्यात देशातील काही व्यक्तीजवळ संपत्तीचा मोठा हिस्सा व जास्त लोकांजवळ संपत्तीचा कमी वाटा केंद्रीत झालेला असतो. आर्थिक विषमतेमध्ये संधीची, अपेक्षांची व उत्पादनाची असमानता यांचाही समावेश होतो. भारतामध्ये सुरूवातीपासूनच आर्थिक विषमता दिसून येते. ही विषमता गरीब-श्रीमंतामध्ये, राज्या-राज्यामध्ये, ग्रामीण-शहरी, ग्रामीण-ग्रामीण, शहरी-शहरी भागामध्येही दिसून येते. भारतामध्ये २०% लोकांच्या हातात ४६.१% संपत्ती केंद्रीत झालेली आहे तर खालच्या स्तरातील २०% लोकांच्या हातात फक्त ८.१% संपत्ती एकवटलेली आहे. अशीच विषमता राज्या-राज्यामध्येही आढळून येते. एनएसएसच्या ५५ व्या अहवालानुसार पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र ही राज्ये अधिक श्रीमंत आहेत तर बिहार व ओरिसा ही राज्ये सर्वात गरीब आहेत. याच अहवालानुसार ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेने शहरी भागात आर्थिक विषमतता सातत्याने वाढत आहे.

**भारतातील आर्थिक विषमतेची कारणे :**

१) **संपत्तीचे असमान वितरण** : भारतामध्ये संपत्तीचे वितरण असमान झालेले आहे. देशातील २०% श्रीमंताकडे ४६.१% संपत्ती तर खालच्या स्तरातील २०% लोकांच्याकडे ८.१ संपत्ती आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढते आहे.

२) **वेतनातील तफावत** : भारतामध्ये वेतनात मोठ्या प्रमाणात तफावत आढळते. देशात मोठ्या संख्येने अप्रशिक्षित कामगारवर्ग असल्याने त्यांना कमी वेतन दिले जाते तर कुशल, प्रशिक्षित अशा कमी संख्येने असणाऱ्या कामगारांना उच्च वेतन दिले जाते. वेतनातील फरकामुळे विषमता वाढते.

**३) दोषयुक्त करव्यवस्था :**

भारतातील करव्यवस्था दोषयुक्त आढळते. एकूण करामध्ये अप्रत्यक्ष करांचे जास्त प्रमाण आहे. त्याचा भार गरीब लोकांच्यावर अधिक पडतो. कर उत्पन्नाचा गरीबांसाठी योग्य वापर केला जात नाही. मोठ्या प्रमाणात करचुकवेगिरी/करचोरी आढळून येते. परिणामतः श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होतात.

**४) शिक्षणाची संधी :**

शिक्षित, उच्चशिक्षित, प्रशिक्षित कामगारांना चांगले वेतन मिळते. भारतात गरीबांच्या मुलांना दारिद्र्यामुळे शिक्षण व उच्चशिक्षणाची संधी मिळत नाहीत. त्यांना लहान वयातच शिक्षण सोडावे लागते. भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण केवळ १० ते ११% आहे. परिणामतः गरीबांना उच्चवेतनाचा रोजगार मिळत नाही त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते.

**५) आर्थिक उदारीकरण :**

भारतात आर्थिक सुधारणा नंतर गरीब व श्रीमंतामधील विषमतेची दर रूंदावतच गेली आहे. ग्रामीण क्षेत्रापेक्षा शहरी भागामध्ये आर्थिक विषमता सातत्याने वाढत आहे. उदारीकरणामुळे कामगार संघटनांचे अस्तित्व कमी कमी होत आहे.

**६) जागतिकीकरण :**

जागतिकीकरणामुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रवेश केला आहे. या अकुशल कामगार, स्त्रिया व लहान मुलांना अल्प वेतन देतात. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे.

**७) खाजगीकरण :**

१९९१ नंतर भारतात मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाला महत्व देण्यात आले आहे. खाजगीकरण आर्थिक विषमतेला जन्म देते. भारतात उद्योग, सेवा सार्वजनिक उपक्रम यांचे खाजगीकरण झाल्याने अधिक विषमता वाढत आहे.

**८) भाववाढ :**

काही ऑस्ट्रेलियन अर्थशास्त्रज्ञांच्या मते भाववाढीमुळे देखील आर्थिक विषमता वाढत जाते. भाववाढीमुळे गरीबांची खरेदीशक्ती कमी होते. भारतात स्वातंत्र्यानंतर सातत्याने भाववाढ होत आहे.

**९) पसंती घटकांचा प्रभाव :**

लोकांच्या आवडी - निवडी, पसंती, प्रदर्शन प्रभाव, कामगारांचा आराम हे घटकदेखील आर्थिक विषमतेवर प्रभाव टाकतात. बरेच कामगार आरामाला पसंती देणारे असतात. शिवाय गरीबांची सीमांत उपभोग प्रवृत्ती जास्त असते यांचा बचत व गुंतवणूकीवर भर नसतो. परिणामतः आर्थिक विषमता वाढत जाते.

**१०) शेतजमिनीचे विषम वाटप :**

भारतात १०% कुटुंबांकडे एकूण शेतजमिनीच्या सुमारे ५६ जमीनीचे मालकी हक्क आहेत. तर ७०% कुटुंबाकडे १४ % जमीनीचा मालकी हक्क आहे. ग्रामीण भागात आर्थिक विषमता असण्याचे प्रमुख कारण म्हणजे शेतजमिनीच्या मालकी हक्कांची अत्यंत विषम वाटणी होय.

**११) वारसा हक्कासंबंधीचे कायदे :** वारसाहक्क कायद्यानुसार वडिलांची संपत्ती मुलांकडे येते. त्यामुळे श्रीमंतांची मुले श्रीमंतच राहतात व शेतमजूरांची, गरीबांची, हमालांची मुले गरीबच राहतात. थोडक्यात वारसाहक्क कायद्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

**१२) वाढती बेकारी :**

मागील ५ दशकात आर्थिक विकासाच्या असमाधानकारक गतीमुळे वाढत्या लोकसंख्येमुळे व वाढत्या श्रमिकांच्या संख्येमुळे देशातील बेकारांच्या संख्येत सतत वाढ होत असल्याने आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसून येते.

**आर्थिक विषमता कमी करण्याचे उपाय :**

**१) शेतजमिनविषयक सुधारणा कायदे :**

ग्रामीण भागात आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण म्हणजे शेतजमिनीची मालकी होय. स्वातंत्र्योत्तर काळात जमिनदारी पद्धतीचे व मध्यस्थांच्या व दूरस्थ शेतमालकीच्या पद्धतीचे उच्चाटन करण्यासंबंधी कायदे करण्यात आले. प्रत्येकाच्या मालकीची किती शेतजमीन याबाबत कमाल जमीन धारणा कायदे करण्यात आले.

**२) रोजगार व मजुरीविषयक धोरण :**

चौथ्या योजनेनंतर रोजगारासंबंधीच्या योजना आखण्यात येऊ लागल्या व त्यांची अंमलबजावणी केली जावू लागली. ग्रामीण रोजगाराची धडक योजना, कोरडवाहू जमिनीसाठी क्षेत्रीय योजना, इंजिनियर व सुशिक्षितांसाठी स्वयंरोजगार योजना, कामासाठी अन्नधान्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, जवाहर रोजगार योजना इ. रोजगार विषयक कार्यक्रम सुरू करण्यात आले.

**३) किमान गरजापूर्ती कार्यक्रम :**

५ व्या पंचवार्षिक योजनेत तळागाळतील लोकांसाठी किमान गरजापूर्तीचा कार्यक्रम कार्यवाहीत आणला गेला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्य व इतर काही आवश्यक वस्तू तळागाळातील गटांना कमी किंमतींना देण्याचा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**४) करआकारणी :**

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील करपद्धती प्रगतशील आहे त्यामुळे उत्पन्नाच्या संपत्तीच्या केंद्रीकरणावर मर्यादा पडतात. अशा रितीने भारतातील प्रत्यक्ष करआकारणीमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**५) ग्रामोद्योगांचा विकास :**

ग्रामोद्योगांमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात व लोकांची क्रयशक्ती वाढते. ग्रामोद्योगामुळे उत्पन्नाचे अधिक विस्तृत प्रसारण तसेच अधिक समान वाटप घडून येत असल्यामुळे हे उद्योग आर्थिक विषमता कमी करण्यासाठी मदत करतात. या उद्योगांच्या विकासाकरीता योजनाकाळात सर्व स्तरावरून प्रयत्न करण्यात आले आहेत.

**६) शिक्षणाचा प्रसार :**

रोजगार शोधणाऱ्या व्यक्तींना आवश्यक ते शिक्षण व प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्यामध्ये आवश्यक ती कौशल्ये निर्माण करणे हेही तेवढेच महत्वाचे आहे. भारतात शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे लोकांना चांगला रोजगार मिळाला व आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली.

**७) जीवनमान सुधारण्यासाठी विशेष कार्यक्रम :**

गरीब भूमीहीन शेतमजूर, छोटे शेतकरी, ग्रामीण कारागीर, हरिजन, गिरीजन, भटक्या जमाती यांचे दारिद्र्य कमी करण्यासाठी ६ व्या पंचवार्षिक योजनेत 'समन्वित ग्रामीण विकास योजना' व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना कार्यवाहीत आणली. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**८) कामगार कल्याण योजना :**

केंद्र, राज्य सरकार व कारखानदार यांनी कामगारांना त्यांच्या नेहमीच्या मजुरीशिवाय कामगार कल्याणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. या सोयीमुळे कामगारांच्या जीवनमानात सुधारणा होते व काही प्रमाणात आर्थिक विषमता कमी होते.

**९) कामगारांना बोनस :**

कामगारांना बोनस दिला जातो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते तर त्या प्रमाणात कारखानदारांच्या निव्वळ नफ्यामध्ये घट होते. कामगारांना बोनस देण्याची कायदेशीर व्यवस्था असल्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. थोडक्यात, आर्थिक विषमता कमी करण्याकरिता सरकारी पातळीवरून वरीलप्रमाणे उपाय योजना केल्या आहेत. परंतु ही धोरणे व उपाय आर्थिक विषमता कमी करण्यासाठी फारसे परिणामकारक ठरलेले नाहीत.

### ३.२.२ भारतातील सामाजिक विषमतेची समस्या :

धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय समाजाची रचना चातुर्वर्ण्यावर आधारित आहे. जातियता व अस्पृश्यता हे चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचे अपत्य आहे. ही बाब जगमान्य झाली आहे. भारतात समाजाचे विभाजन उच्चजातीय व कनिष्ठ जातीमध्ये झाले आहे. त्यामुळे समाजामध्ये सामाजिक विषमता वाढत आहे. त्यातूनच आर्थिक, राजकीय विषमता वाढत आहे.

**सामाजिक विषमतेचा अर्थ :**

१) ''समाजातील एक वर्ग उच्चस्तरीय असतो तर दुसरा वर्ग कनिष्ठस्तरीय असतो याला सामाजिक विषमता असे म्हणतात.''

२) ''समाजामध्ये एक वर्ग प्रतिष्ठेची कामे करून मानसन्मान मिळवितो तर दुसरा वर्ग कनिष्ठ कामे करून अनादरयुक्त जीवन जगत असतो. यालाच सामाजिक विषमता असे म्हणतात.''

सामाजिक विषमता ही सामाजिक संबंधाच्या प्रक्रियेशी संबंधीत आहे. सामाजिक विषमता ही जागतिक

घटना आहे व ती आर्थिक विषमतेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. सामाजिक विषमता ही जातीय विषमता, लिंग विषमता व सांपत्तीक विषमता व वर्ण विषमता यांनी युक्त असते. सामाजिक विषमताही नैतिकता आणि धर्म समूह यांच्यामध्ये धर्म, जात, लिंग, संपत्ती, वर्ण यावरून होणारे मतभेद म्हणजेच सामाजिक विषमता होय.

**सामाजिक विषमतेचे प्रकार/कारणे : सामाजिक विषमतेचे पुढील प्रकार पडतात.**

**१) लिंग विषमता :**

भारतामध्ये सामाजिक विषमतेच्या प्रकारामध्ये लिंग विषमता हा प्रकर्षाने जाणवणारा एक प्रकार आहे. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. अनेक ठिकाणी स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, रोजगार, शिक्षण, वैचारिक स्वातंत्र्य यांचा अधिकार नाकारला जातो. रोजगारामध्ये कमी वेतन दिले जाते. भारतीय समाजामध्ये स्त्रिया अतिशय नकारात्मक पद्धतीने जीवन जगतात. कुटुंबामध्ये स्त्रियांना फारसे स्थान दिले जात नाही. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांना अनेक समस्या व अडचणींना तोंड द्यावे लागते.

**२) वर्ण विषमता :**

समाजामध्ये त्वचेचा रंग, इतर शारीरीक विशेषत: राहण्याची ठिकाणे किंवा संस्कृती यावरून नैतिक मुल्यामध्ये भेदभाव केला जातो. तेंव्हा जातीय व सामाजिक विषमता जन्माला येते. उदा. काळ्या व गोऱ्या लोकांमध्ये वर्णावरून भेदभाव केला जातो. वर्ण विषमतेमध्ये कृष्णवर्णीय लोकांना रोजगाराच्या संधी, अधिकाराच्या जागा, शिक्षण इ. सारख्या संधी नाकारल्या जातात. कामाच्या ठिकाणी, सामाजिक ठिकाणी, प्रवासात भेदभाव केला जातो. याचा या लोकांच्या संपूर्ण सामाजिक व आर्थिक जीवनावर प्रतिकूल परिणाम होतात.

**३) जातीय विषमता :**

जाती व्यवस्था व जातीय विषमता भारतात अनेक वर्षापासून आढळते. लोकांच्या जातीवर त्यांचा व्यवसाय अवलंबून असे. भारतात जातीवरून दोन गटात विभाजन झालेले आहे.

**अ) उच्च जाती –** यामध्ये ब्राम्हण व काही स्पृश्य हिंदूचा समावेश होतो.

**ब) कनिष्ठ जाती –** यामध्ये २३९९ अनुसुचित जाती व जमाती व मागासवर्गीय जातीचाही समावेश होतो. कनिष्ठ जाती या अस्पृश्य मानल्या जात. आता ते प्रमाण कमी होत आहे. समाजातील साफसफाई, अप्रतिष्ठेची, अधिक कष्टाची, किळसवाणी, कमी मोबदला देणारी कामे त्यांना करावी लागत. तर प्रतिष्ठेची, मानापानाची कमी कष्टाची अधिक मोबदला देणारी कामे उच्च जातीच्या लोकांच्या हाती असत. त्यामुळे सामाजिक विषमता वाढत गेली.

**४) वर्ग विषमता :**

समाजामध्ये असणाऱ्या वर्गव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते. कार्ल मार्क्स यांनी समाजाचे कामगार वर्ग व भांडवलदार वर्ग असे दोन वर्ग पाडले होते. कामगार वर्गाच्या तुलनेत भांडवलदारांना नफा/संपत्ती अधिक मिळते ते अधिक श्रीमंत होतात. अधिक नफा मिळविण्यासाठी कामगार वर्गाचे शोषण केले जाते. यातून सामाजिक असंतोष व विषमता जन्माला येते. वरील विविध कारणांनी भारतामध्ये सामाजिक विषमता वाढत आहे.

**सामाजिक विषमतेचे परिणाम : सामाजिक विषमतेचे समाजावर पुढीलप्रमाणे परिणाम दिसून येतात.**

**१) आर्थिक विषमता वाढते :**

सामाजिक विषमतेमुळे लोकांना कमी वेतन दिले जाते. रोजगाराच्या, व्यवसायाच्या संधी मिळत नाहीत. यामुळे समाजामध्ये आर्थिक विषमता वाढीस लागते.

**२) दारिद्र्यामध्ये वाढ :**

सामाजिक विषमतेमुळे दारिद्र्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. समाजातील खालच्या स्तरातील लोकांना कमी वेतन, नाकारलेल्या विविध संधी यामुळे त्यांच्या दारिद्र्यामध्ये वाढ होत जाते.

**३) सामाजिक असंतोष वाढतो :**

सामाजिक विषमतेमध्ये उच्चवर्णीयांकडून कनिष्ठ वर्गाचे शोषण केले जाते. त्यामुळे उच्चवर्णीय व कनिष्ठ वर्गामध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचे रूपांतर मारामाऱ्या, दंगली, जाळपोळ, बहिष्कार, भांडणतंटे, यादवी यामध्ये होते.

**४) गुन्हेगारीत वाढ :**

सामाजिक विषमतेमुळे समाजातील कनिष्ठ वर्ग उपेक्षित राहतो. त्यांना नोकऱ्या, रोजगार व व्यवसायाच्या संधी मिळत नाहीत. त्यांना उत्पन्नाचे मार्गच उपलब्ध होत नसल्याने चोऱ्या, लुटमार, खून, दरोडे, बलात्कार यासारख्या गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ होते.

**५) सामाजिक कल्याणामध्ये घट :**

सामाजिक विषमतेमुळे अर्थव्यवस्थेतील संसाधनाचा योग्य वापर होत नाही त्याचे कार्यक्षम वाटप होत नाही परिणामत: सामाजिक कल्याणात घट होते.

**६) आर्थिक विकासामध्ये घट :**

सामाजिक विषमतेमुळे देशामध्ये वारंवार दंगली, बंद, मारामाऱ्या, बॉंबस्फोट घडून येतात. त्यामुळे लोकांच्या कार्यक्षमतेचा योग्य वापर होत नाही व याचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

**७) सामाजिक संबंधात बिघाड :**

सामाजिक विषमतेमुळे सामाजिक संबंध सलोख्याचे न राहता ते पूर्णपणे बिघडले जातात. लोकांचा एकमेकांवर विश्वास कमी होत जातो. समाजात व लोकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होते व सामाजिक एकात्मता विस्कळीत होऊन सामाजिक संबंधात बिघाड होतो.

**सामाजिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना :**

**१) शिक्षण सुविधा :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार मागासवर्गीय जातीमधील मुलांचे शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक उपाय केले आहेत. अनेक राज्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निशुल्क पाठ्यपुस्तके, युनिफॉर्म, स्टेशनरी, स्कूल बॅग, स्कॉलरशिप, आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आहे. शिक्षण शुल्क माफ केले आहे.

किंवा त्यामध्ये काही प्रमाणात सवलत दिली आहे. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अनुसुचित जातींच्या मुलांसाठी शैक्षणिक विकास कार्यक्रम आहे. मागासवर्गिय मुला-मुलींसाठी वस्तीगृहाच्या व भोजनाच्या मोफत सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**२) स्वास्थ्य व परिवार कल्याण कार्यक्रम :**

भारत सरकारने मागासवर्गियांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य धोरण १९८३ मध्ये सुरू केले. यामध्ये मागासवर्गिय वसाहतीमध्ये किटकनाशकाची फवारणी, मलेरियाविरोधी औषधे पुरविली जातात. तसेच किमान गरजा कार्यक्रमाअंतर्गत जनजातीय क्षेत्रामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे व समुदाय स्वास्थ्य केंद्रे स्थापन केली आहेत.

**३) आर्थिक विकास कार्यक्रम :**

दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांच्यामध्ये आर्थिक विकास व्हावा यासाठी लागणारा निधी उलब्ध व्हावा यासाठी राष्ट्रीय अनुसुचित जाती व जनजाती वित्त व विकास निगमची स्थापना केली आहे. १९९७ मध्ये सफाई कामगारासाठी आर्थिक विकास व स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास निगमची स्थापना केली आहे.

**४) विशेष प्रशिक्षण कार्यक्रम :**

श्रम व रोजगार मंत्रालयाद्वारे मागासवर्गियांच्या कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम लागू केले आहेत. संपूर्ण देशामध्ये २२ कोचिंग कम गाईडन्स केंदे स्थापन केली आहेत.

**५) महिला विकास कार्यक्रम :**

भारत सरकारने  महिलांच्यासाठी १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग स्थापन केला आहे. या शिवाय महिला स्वयंसिद्धता योजना, कस्तुरबा गांधी शिक्षा योजना (१९९७), बालिका समृद्धी योजना (१९९७) अशा अनेक योजना कार्यक्रम सुरू आहेत. त्यामुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

**६) कल्याण कार्यक्रम :**

गरीब लोकांचे आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी किमान वेतन कायदा, अन्नपूर्णा योजना, अंत्योदय अन्न योजना, मध्यान्हीचा भोजन कार्यक्रम, सर्वंकष बालविकास कार्यक्रम राबविले जात आहेत. तसेच राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात सरपंच, पोलीस पाटील, असे पद मागासवर्गियांसाठी राखीव ठेवून सामाजिक मान -सन्मान वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्न :**

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतात सामाजिक विषमतेत .... होत आहे.

अ) घट    ब) वाढ    क) स्थिर    ड) यापैकी नाही

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ..... मध्ये सुरू करण्यात आले.

अ) १९८६    ब) १९९१    क) १९५१    ड) २०१४

३) एकाच समाजातील लोकांमध्ये धर्म, जात, लिंग, संपत्ती, वर्ण यावरून होणारे मतभेद म्हणजेच... विषमता होय.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) यापैकी नाही

४) भारताच्या सामाजिक विषमतेच्या प्रसारामध्ये .......हा प्रकर्षाने जाणवणारा प्रकार आहे.

अ) वर्ण विषमता ब) लिंग विषमता क) जाती विषमता ड) यापैकी नाही

५) सामाजिक विषमतेमुळे ............................................... मध्ये वाढ होते.

अ) दारिद्र्य ब) गुन्हेगारी क) दारिद्र्य व गुन्हेगारी ड) वरील सर्व

६) उत्पन्न व संपत्तीचे असमान होणारे वितरण म्हणजे .......................... विषमता होय.

अ) सामाजिक ब) आर्थिक क) प्रादेशिक ड) यापैकी नाही

७) ............................................ कायद्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

अ) वारसा हक्क ब) किमान वेतन कायदा

क) बोनस कायदा ड) यापैकी नाही

८) ......................... योजनेत किमान गरजा पूर्तीचा कार्यक्रम कार्यवाहीत आणला गेला.

अ) पहिल्या ब) सहाव्या क) पाचव्या ड) दहाव्या

९) .............................. कर आकारणीमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

अ) अप्रत्यक्ष ब) प्रत्यक्ष क) प्रतिगामी ड) वरील सर्व

**३.२.३ भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या :**

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाचा समान विकास होण्यासाठी त्या देशातील सर्व प्रदेशांचा समान विकास होणे आवश्यक असते. भारतासारख्या संघीय राज्य व्यवस्थेमध्ये सर्व राज्यांचा समतोल विकास होणे आवश्यक आहे. परंतु तो होऊ शकला नाही. भारतात आर्थिक विकासाबरोबर प्रादेशिक असमतोल वाढला आहे. गरीब व श्रीमंतामध्ये वाढत जाणारी दरी, विविध राज्यातील भिन्न आर्थिक विकास, भिन्न दरडोई उत्पन्न, उद्योगाचा व शेतीचा भिन्न विकास दर ही सर्व प्रादेशिक असमतोलाची लक्षणे आहेत. प्रादेशिक असमतोलामध्ये भारतातील प्रगत व मागास राज्यांचा समावेश केला जातो. प्रगत राज्यात पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगाल, तामिळनाडू व आंध्रप्रदेश यांचा समावेश होतो. तर मागास राज्यात मध्यप्रदेश, राजस्थान, ओरिसा, बिहार, झारखंड, छत्तीसगड या राज्यांचा समावेश होतो.

**❊ प्रादेशिक असमतोलाची व्याख्या :**

१) '' देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व प्रदेशांचा समप्रमाणात विकास न होणे म्हणजे प्रादेशिक असमतोल होय.''

२) ''देशामध्ये एका क्षेत्राचा अन्य क्षेत्राच्या तुलनेने कमी/असमान विकास झालेला असतो त्याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात.''

३) '' राज्या-राज्यामध्ये शेती, उद्योग व सेवा क्षेत्र यांच्यातील असमान विकासाला प्रादेशिक असमतोल असे

म्हणतात.'' देशा प्रमाणेच एखाद्या राज्याच्या एका प्रदेशामध्ये विकास दिसून येतो तर त्याच राज्याचे दुसरे क्षेत्र अविकसीत असते. यालाच प्रादेशिक विषमता म्हणतात. उदा. महाराष्ट्रात विभागाचा विचार केला तर कोकण, मराठवाडा, विदर्भ विभागाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्राचा विकास अधिक झालेला आहे.

**✲ भारतातील प्रादेशिक असमतोलाची कारणे :**

**१) दारिद्र्य :**

दारिद्र्याचा विचार करता भारतात काही राज्ये व प्रदेश श्रीमंत/ प्रगत आहेत तर काही मागासलेले आहेत. उदा. राज्याच्या लोकसंख्येच्या आधारे सर्वात गरीब ओरिसा राज्य (४७.१५%) आहे. यानंतर बिहार (४२.६०%), मध्यप्रदेश (३७.४३%), सिक्कीम (३६.५५%) याचा क्रम लागतो. तर संपन्नतेच्या दृष्टीकोनातून जम्मू काश्मीर, गोवा, पंजाब राज्ये संपन्न आहेत. त्यामुळे देशात प्रादेशिक विषमता आढळते.

**२) औद्योगिक विकासातील असमतोल :**

भारतात औद्योगिक दृष्टीकोनातून प्रादेशिक असमतोल आढळतो. महाराष्ट्रातून औद्योगिक विकास सर्वात जास्त झालेला आहे. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २५% उत्पादन महाराष्ट्रात होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प. बंगाल, तामिळनाडू, गुजरात, उत्तरप्रदेश, उत्तराचल, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक व आंध्रप्रदेश मिळून एकूण उत्पादनाच्या ८३.५% औद्योगिक उत्पादन करतात व राहिलेले राज्य व केंद्रशासीत प्रदेश केवळ १६.५ % उत्पादन करतात.

**३) दरडोई उत्पन्नातील असमतोल :**

भारतात सर्व राज्यामध्ये दरडोई उत्पन्नामध्ये समानता आढळत नाही. दरडोई उच्च उत्पन्न असणारी राज्ये हरियाणा, महाराष्ट्र, पंजाब, गुजरात व आंधप्रदेश आहेत. तर कमी उत्पन्न असणाऱ्या राज्यामध्ये बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, आसामचा समावेश होतो. थोडक्यात दरडोई उत्पन्नामध्येही प्रादेशिक विषमता आढळून येते.

**४) शहरी लोकसंख्या :**

भारताची २७.८% लोकसंख्या शहरामध्ये राहते. परंतु यामध्येही राज्याराज्यामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भिन्नता आढळून येते. महाराष्ट्रात ४२.४% तामिळनाडू ४४ % गुजरात ३७.४% कर्नाटक ३४%,पश्चिम बंगाल २८% आंध्रप्रदेश २७.३%,मध्यप्रदेश २६.५%, ओरिसा १५%, हिमाचलप्रदेश ९.८% व बिहारमध्ये १०.५% शहरी लोकसंख्या राहते. थोडक्यात शहरी लोकसंख्येच्या दृष्टीनेही भारतात असमतोल आढळतो.

**५) कृषी विकासातील असमतोल :**

भारतात शेती क्षेत्रामध्येही विकासाच्या दृष्टीने असमतोल आढळतो. पंजाब व हरियाणा ही दोन्ही राज्ये मिळून गव्हाचे ३६% उत्पादन करतात. कृषी विकासाच्या दृष्टीने पंजाब, हरियाणा ही विकसित राज्ये आहे तर इतर राज्यांच्या तुलनेने कमी विकसीत आढळते.

**६) दरडोई विजेचा उपभोग :**

पंजाब, हरियाणा, गुजरात व महाराष्ट्रामध्ये विजेचा उपभोग उच्चस्तरावर आहे तर आसाम, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेशामध्ये विज उपभोग फारच कमी आहे. विज उपभोगाबाबतही प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

### ७) सिंचन विकास :

सिंचन सुविधांच्या दृष्टीकोनातून पंजाब, हरियाणा, तामिळनाडू व उत्तरप्रदेश या राज्यामध्ये चांगली परिस्थिती आहे. तर गुजरात, कर्नाटक, ओरिसा, राजस्थान, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र व छत्तीसगड इ. राज्यामध्ये वरील राज्यांच्या तुलनेने सिंचनव्यवस्थेचा कमी विकास झाला आहे. त्यामुळे या राज्यामध्ये शेती उत्पादन कमी आहे.

### ८) वाहतूक सुविधा :

वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून केरळ, तामिळनाडू, पंजाब, प. बंगाल इ. राज्यामध्ये वाहतूक रेल्वे सुविधा चांगल्या आहेत. परंतु आसाम, जम्मू काश्मीर, ओरिसा, मध्यप्रदेश, कर्नाटक इ. राज्यामध्ये वाहतूक सुविधा विकसित नाहीत.

### ९) पायाभूत सुविधा :

भारतात पायाभूत सुविधामध्ये प्रादेशिक असमतोल आढळतो. पंजाब, तामिळनाडू, हरियाणा, प. बंगालमध्ये पायाभूत सुविधा विकसित आहेत. तर इतर राज्यामध्ये त्या कमी विकसित आहेत. भारतात प्रादेशिक असमतोल आढळतो. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. प्रादेशिक असमतोलासाठी जबाबदार असणाऱ्या घटकामध्ये प्रामुख्याने औद्योगिक रचना, श्रम, तंत्रज्ञान, दळणवळण सुविधा, वित्तीय भांडवल इ. घटकांचा समावेश होतो. प्रादेशिक असमतोलाची निर्मिती ब्रिटिश काळात झाली आहे. ब्रिटिशकाळात जमीनदार वर्गाचे वर्चस्व होते. त्यामुळे गरीब व श्रीमंत दरी तेव्हापासून आहे. तसेच या काळात जलसिंचनाच्या सुविधा काही भागात सुरू झाल्याने काही ठराविक भागच विकसित झाला. स्वातंत्र्यानंतरही देशात समतोल विकास न होता असमतोल वाढतच गेला आहे. १९६० च्या दशकात ठराविक राज्यात शेती क्षेत्रासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अधिक वापर केल्यामुळे असमतोल अधिक वाढला. हरितक्रांतीमुळे फक्त पंजाब, हरियाणा या राज्यांचाच प्रचंड विकास झाला. नियोजन काळात प्रगत व विकसित राज्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्यात आली. मात्र त्याप्रमाणात मागास राज्यांना मदत केली नाही इत्यादींमुळे प्रादेशिक असमतोल वाढत आहे.

### * प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शासकीय प्रयत्न :

### १) पहिले औद्योगिक धोरण (१९४८) :

भारत सरकारने प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी पहिल्या औद्योगिक धोरणात औद्योगिक परवाना पद्धतीचा स्वीकार, अविकसित भागात सार्वजनिक उद्योग सुरू करणे, प्रादेशिक नियोजनावर भर, लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन व मागास भागात औद्योगिकरणासाठी प्राधान्य इत्यादींचा स्वीकार करण्यात आला.

### २) वांच्छू समिती : (१९६८)

मागास प्रदेशाकडे सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक वळविण्याचा प्रयत्न करावा, राज्यांनी औद्योगिक विकासाचे समतोल धोरण स्विकारणे, ग्रामोद्योग व शेतीवर भर देण्यात यावा, दळणवळणाच्या समतोल विकासावर भर देण्यात यावा. कृषी माल विक्री करिता सहाय्यभूत योजना सुरू करण्यात वांच्छु समितीची स्थापना राष्ट्रीय विकास परिषदेने १९६८ मध्ये केली.

**३)  ६ व्या पंचवार्षिक योजनेतील उपाय :**

सहाव्या योजनेत प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मागास भागाच्या विकासासाठी राज्य व केंद्राकडून उपाययोजनांचा स्वीकार व मागास प्रदेशांच्या विकासासाठी खास पदाची निर्मिती केली पाहिजे या मार्गांचा स्वीकार केला.

**४)  विशेष योजना :**

सरकारने डोंगरी भाग, जनजातीयक्षेत्र, दुष्काळग्रस्त भाग यांच्या विकासासाठी विशेष योजना तयार केल्या आहेत.

**५)  केंद्रीय गुंतवणूक सहाय्य योजना (१९७०) :**

या योजनेनुसार स्थिर भांडवलासाठी १०% सवलत दिली जाईल. पण त्यासाठी भांडवलाची अधिकतम मर्यादा ५ रूपये करण्यात आली.

**६)  वाहतूक साहाय्य योजना (१९७१) :**

या योजनेनुसार जे उद्योग डोंगरी भागात दूरवरच्या प्रदेशात आहेत. त्यांना रेल्वे वाहतूकीत कच्चा मालाच्या ५०% सवलत दिली जाते. तसेच १९७१ नंतर मागास भागात उद्योग स्थापन करतील त्या उद्योगांना उत्पन्न करात २०% सवलत.

**७)  राष्ट्रीय समतोल विकास योजना :**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी केंद्रसरकारने दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय समतोल विकास योजना सुरू केली . या योजनेचा प्रमुख उद्देश मागास भागामध्ये सकेंद्रीत विकासात्मक कार्यक्रम चालविणे ज्यामुळे मागास सुधारणा होऊन असमतोल कमी होईल.

**८)  आधारभूत संरचना निर्माण करणे :**

मागास प्रदेशामध्ये आधारभूत संरचना विकसित करण्यासाठी सरकार प्रयत्नशिल आहे. मागास भागामध्ये रस्ते बांधणी, रेल्वे वाहतूक विकसित करणे, विजेची उपलब्धता,स्वच्छ पाणी व आरोग्याच्या सोई पुरविल्या जातात.

**९)  वित्तीय सहाय्य :**

मागास राज्यांना विशेष वित्तीय सहायत्ता दिली जाते. त्यांना शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे,उद्योग,व्यवसाय सुरू करण्यासाठी वित्तीय  सहाय्य दिले जाते.

### ३.२.४ राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक : आंतरराष्ट्रीय तुलना

### (International Comparision : National Income, Per capita Income, Human Development Index)

**प्रास्ताविक :**

देशाच्या अर्थव्यवस्थाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक यांचे

विवेचन महत्वपूर्ण मानले जाते. कारण या संकल्पनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची वास्तव स्थिती लक्षात येते. देशातील राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील वाढीवर मानवी विकास अवलंबून असतो. तसेच देशाच्या आर्थिक विकासाची गती राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीवर अवलंबून असते. राष्ट्रीय उत्पन्नावरून नागरिकांचे दरडोई उत्पन्न समजू शकते व त्यांच्या राहणीमानाची पातळी समजते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून देशाच्या विविध क्षेत्रात झालेली प्रगती लक्षात येते. तसेच देशातील लोकांचे आर्थिक कल्याण व आर्थिक विषमता लक्षात येते. त्यामुळे देशाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना महत्त्वाची आहे.

**राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ :**

'' राष्ट्रीय उत्पन्न ही महत्त्वपूर्ण संकल्पना असून राष्ट्रीय उत्पन्नच्या विविध व्याख्यावरून राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट होईल.''

**१) डॉ. मार्शलची व्याख्या :**

''प्रतिवर्षी एखाद्या राष्ट्रातील श्रमिक आणि भांडवल हे नैसर्गिक साधनसामुग्रीच्या साहाय्याने मूर्त आणि अमूर्त अशा वस्तू व सेवांचे निव्वळ उत्पादन करतात ते त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**२) पिगूची व्याख्या :**

''समाजाच्या वस्तूनिष्ठ उत्पन्नाचा जो भाग पैशात मोजता येतो त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. यामध्ये विदेशातून मिळविलेल्या उत्पन्नाचाही समावेश होता.''

**३) फिशरची व्याख्या :**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या निव्वळ उत्पादनाकडे जो भाग प्रत्यक्षरित्या उपभोगासाठी वापरला जातो असा भाग होय.''

**४) भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समितीने केलेली व्याख्या :**

''एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवा यांचे दुहेरी मापन होऊ न देता केलेली मोजदाद म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**५) प्रा. कुझनेटस् ची व्याख्या :**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालखंडात देशाच्या उत्पादन पद्धतीत अंतिम उपभोक्त्याच्या हातात पडणारे किंवा देशाच्या भांडवली वस्तूंच्या साठ्यात शुद्धरूपाने वाढ घडवून आणणारे उत्पादन होय.''

६) ''देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती व श्रम यांच्या प्रयत्नातून उपभोग्य वस्तू, भांडवली वस्तू आणि सेवांची निर्मिती होत असते. या उत्पादनाचे पैशात काढलेले मुल्य म्हणजे त्या देशाचे त्या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना :**

**१) व्यक्तिगत उत्पन्न (Personal Income) :**

व्यक्तीला एक वर्षाच्या कालावधीत विविध मार्गाने मिळालेले उत्पन्न म्हणजे व्यक्तिगत उत्पन्न होय. प्रा.जे.एम केन्स यांनी व्यक्तिगत उत्पन्नाची संकल्पना सर्वप्रथम मांडली. 'एका वर्षाच्या कालखंडात अर्थव्यवस्थेत

व्यक्ती व संस्थांनी मिळविलेल्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे व्यक्तिगत उत्पन्न होय.' व्यक्तिगत उत्पन्नामध्ये वेतन, नफा, बोनस, लाभांश, व्याज, बेकारी भत्ता, खंड भाडे इत्यादी मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असतो. व्यक्तिगत उत्पन्नावरून नागरिकांची खरेदीशक्तीचा अंदाज येतो. तसेच देशातील नागरिकांचे कल्याण कितपत साधले जाईल हे समजते..

### २) विनियोग उत्पन्न (Disposable Income) :

विनियोग उत्पन्नावरून नागरिकांच्या राहणीमानाची व एकूण बचतीची कल्पना कल्पना येते. व्यक्तिगत उत्पन्न ही प्रत्याक्षात प्राप्त झालेल्या उत्पन्नाची बेरीज असते. परंतू ते प्राप्त झालेले सर्वच उत्पन्न खर्च केले जात नाही. त्यामुळे व्यक्तिगत उत्पन्नापैकी जे उत्पन्न प्रत्यक्षात खर्चासाठी वापरले जाते त्यास विनियोग किंवा खर्च योग्य उत्पन्न असेही म्हणतात. सर्वच व्यक्तिगत उत्पन्न खर्चासाठी प्राप्त होत नाही म्हणून खर्चासाठी उपलब्ध असलेले उत्पन्न म्हणजे विनियोग उत्पन्न होय. कारण व्यक्तीला आपले सर्वच उत्पन्न खर्च करता येत नाही एकूण उत्पन्नातील कर. बचत,विमा हप्ते यासाठी रक्कम यातून वापरावी लागते. त्यामुळे विनियोग उत्पन्न व्यक्तिगत उत्पन्न –प्रत्यक्ष कर व इतर वजावटी होत.

### ३) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product - GNP) :

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाला एकूण राष्ट्रीय उत्पन्न असेही म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेमधील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची ही संकल्पना अतिशय महत्त्वाची मानली जाते. आपल्या देशात उत्पादन केलेल्या वस्तू व सेवा यांच्या मूल्यातून परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वजा केले असता एकूण देशांतर्गत उत्पन्न समजते. ''एका वर्षाच्या कालखंडात एखाद्या देशात निर्माण होणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवा यांच्या बाजार किंमतीनुसार पैशातील मुल्याची बेरीज म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय.'' ''एका वर्षाच्या कालावधीत देशातील लोकांना त्यांच्या देशातील आणि परदेशातील उत्पादन साधनांद्वारे मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाला स्थूल राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात.'' थोडक्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात देशातील नागरिकांनी देशात व देशाबाहेर निर्माण होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा समावेश यामध्ये केला जाते.

### ४) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Income - NNP) :

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेच्या साहाय्याने निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना स्पष्ट करता येते. ''एका वर्षाच्या कालखंडात देशात निर्माण होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण मुल्यातून घसारा खर्च वजा करून केला असता मिळणारे उत्पन्न म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय.'' प्रतिवर्षी विविध वस्तू व सेवांचे उत्पादन करीत असताना यंत्रे, इमारती इत्यादी भांडवली वस्तूंची झीज व मोडतोड होत असते. देशाची उत्पादन क्षमता भविष्यात टिकवून ठेवण्यासाठी ही झीज भरून काढली जाते. त्यासाठी घसारा निधीची तरतूद केली जाते. थोडक्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादन–घसारा निधी निव्वळ राष्ट्रीय उत्पादन.

### ५) स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product GDP) :

नागरिकांनी आपल्या देशांतर्गत उत्पादन केलेल्या वस्तू व सेवा यांच्या मुल्यातून परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वजा केले असता एकूण देशांतर्गत उत्पन्न समजते.'' एक वर्षाच्या कालखंडात देशात उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवांचे पैशातील एकूण मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.'' थोडक्यात देशात राहणाऱ्या नागरिकांच्या बाबतीत व भौगोलिक सीमेशी ही संकल्पना संबंधित आहे.

**६) चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (Naional Income at Current Price) :**

एका देशातील एका वर्षातील उत्पादित वस्तू व सेवांच्या पैशातील मुल्यांची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न असते. राष्ट्रीय उत्पन्न हे पैशात मोजले जाते. ''जेव्हा पैशातील मुल्य चालू किवा वर्तमान किंमतीनुसार काढले जाते तेव्हा त्यास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.'' थोडक्यात चालू उत्पादनास चालू किंमतीने गुणले असता येणाऱ्या अंकास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. परंतू वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नात बदल होतो अशा वेळी विविध वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करणे अवघड जाते. याकरिता देशातील वस्तू व सेवांचे मापन एखाद्या पायाभूत वर्षातील किंमतीनुसार केले जाते. चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न मोजले तर त्याला पैशातील उत्पन्न असे म्हणतात.

**७) स्थिर/ आधार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (National Income at Constant Price) :**

वस्तू आणि सेवांच्या किंमतीत बदल झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नातही बदल होतो. किंमत बदलामुळे होणारे परिणाम टाळण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न स्थिर किंमतीनुसार मोजावे लागते.'' सामान्यत: ज्या वर्षी वस्तूच्या किंमती स्थिर असतात अशा पायाभूत वर्षाची निवड केली जाते आणि पायाभूत वर्षातील किंमतीनुसार चालू उत्पादनाचे पैशात मापन केले जाते त्याला स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.''राष्ट्रीय उत्पन्न पायाभूत वर्षातील स्थिर किंमतीनुसार मोजले असेल तर त्याला वास्तव उत्पन्न असे म्हणतात. यावरून विविध कालावधीतील नागरिकांच्या राहणीमानाची तुलना करता येते.

**तक्ता क्रमांक ३.१**

**जगातील काही निवडक देशांची राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना**

| अ.क्र. | देश | राष्ट्रीय उत्पन्न (मिलीयन डॉलर्स) |
|---|---|---|
| १. | यू.एस.ए | १७,८१३ |
| २. | चीन | १०२९६ |
| ३. | जपान | ४७९० |
| ४. | जर्मनी | ३९५६ |
| ५. | फ्रान्स | २८९५ |
| ६. | यू.के. | २८८४ |
| ७. | इटली | २१४१ |
| ८. | भारत | २०४१ |
| ९. | रशिया | १७९३ |
| १०. | कॅनडा | १७५९ |
| ११. | मेक्सिको | १२४८ |

Source - World Bank, World Development Indicators -2015

वरील तक्त्यामध्ये जगातील निवडक देशातील राष्ट्रीय उत्पन्न दर्शविले आहे २०१४ मधील विविध देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला असता भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा यू.एस.ए, चीन, जपान, जर्मनी, यू.के, फ्रान्स, इटली इ. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे. रशिया, कॅनडा, मेस्क्किो या देशांचे राष्ट्रीय उत्पन्न भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा कमी आहे. जगात सर्वाधिक राष्ट्रीय उत्पन्न २०१४ मध्ये यू.एस.ए. देशाचे १७८१३ मिलियन इतके होते.

## दरडोई उत्पन्न (Per Capita Income) :

**प्रास्ताविक :**

दरडोई उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा मापदंड समजला जातो. देशातील नागरिकांच्या राहणीमानाची पातळी समजण्यासाठी दरडोई उत्पन्नाची संकल्पना महत्वाची मानली जाते. देशातील नागरिकांच्या उत्पन्नाची सरासरी म्हणजे दरडोई उत्पन्न होय. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नास देशातील एकूण लोकसंख्येने भाग दिला असता दरडोई उत्पन्न मिळते. प्रत्यक्ष व्यक्तिगत उत्पन्न हे दरडोई उत्पन्नापेक्षा कमी किवा जास्त असू शकते. दरडोई उत्पन्न हे चालू किंमतीनुसार व पायाभूत (स्थिर) किंमतीनुसारही मोजता येते. दरडोई उत्पन्नावरून आर्थिक वृद्धीची कल्पना येते. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये त्या देशातील लोकांचा हिस्सा किती आहे हे समजण्यासाठी दरडोई उत्पन्न समजून घ्यावे लागते. संबधित देशाची प्रगती किती झाली आहे तसेच देशाची आर्थिक परिस्थिती व उत्पन्न वाटप याची माहिती त्या देशाच्या दरडोई उत्पन्नावरून कळते.

**दरडोई उत्पन्नाचा अर्थ** : दरडोई उत्पन्नाच्या विविध व्याख्यावरून दरडोई उत्पन्नाचा अर्थ लक्षात येईल.

१) '' देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भागले असता जे उत्पन्न मिळते त्याला दरडोई उत्पन्न असे म्हणतात.''

२) ''देशातील प्रत्येक व्यक्तीचा राष्ट्रीय उत्पन्नातील सरासरी हिस्सा म्हणजे दरडोई उत्पन्न होय.''

$$\text{दरडोई उत्पन्नाचे सूत्र} \rightarrow \text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{एकूण राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

दरडोई उत्पन्नाच्या आकडेवारीवरून विविध देशातील प्रगतीची अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय तुलना करता येते.

### तक्ता क्रमांक ३.१

### जगातील काही निवडक देशांची दरडोई उत्पन्नाची तुलना

| अ.क्र. | देश | दरडोई उत्पन्न (यू.एस.डॉलर्समध्ये) |
|---|---|---|
| १. | यू.एस.ए | ५५२०० |
| २. | कॅनडा | ५१६९० |
| ३. | जर्मनी | ४७६४० |
| ४. | फ्रान्स | ४३०७० |
| ५. | यू.के | ४२६९० |
| ६. | जपान | ४२००० |
| ७. | इटली | ३४२८० |
| ८. | रशिया | १३२१० |
| ९. | मेस्किको | ९८६० |
| १०. | चीन | ७३८० |
| ११. | भारत | १५७० |

Source - World Bank, World Development Indicators -2015

वरील तक्त्यामध्ये जगातील काही निवडक देशांचे यू.एस. डॉलर्समध्ये दरडोई उत्पन्नाची तुलना केली आहे. वरील तक्त्यामध्ये सर्वाधिक दरडोई उत्पन्न यू.एस.ए. मध्ये आढळते. विविध देशांची तुलना करता भारताचे दरडोई उत्पन्न कमी आढळते. एवढेच नव्हे तर अल्पविकसीत अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांच्या तुलनेने सुद्धा भारताचे दरडोई उत्पन्न फारच अल्प आहे. भारतातील राष्ट्रीय दरडोई उत्पन्न कमी असण्याचे कारणे

**भारतात राष्ट्रीय दरडोई उत्पन्न अतिशय अल्प आहे त्याची कारणे पुढीलप्रमाणे –**

**१) नैसर्गिक आपत्ती :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा मुख्य हिस्सा हा शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा असतो. परंतू भारतीय शेती ही अनियमित पावसावर अवलंबून असल्याने शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची खात्री नसते. दुष्काळ, महापूर, रोगराई, वाईट हवामान, लहरी, मान्सून, टोळधाड इ. नैसर्गिक आपत्तीमुळे राष्ट्रीय उत्पन्न व पर्यायाने दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**२) लोकसंख्येतील वाढ :**

भारताच्या वाट्याला जगाच्या एकूण भूभागापैकी २.४% भूभाग व लोकसंख्या मात्र १७.५% आली आहे. हे प्रमाण अतिशय विषम आहे. भारताची लोकसंख्या अतिशय वेगाने वाढते आहे. लोकसंख्या वेगाने वाढत

असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी होऊन दरडोई उत्पन्न कमी राहते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात जरी वाढ होत असली तरी लोकसंख्येतील उच्च वाढीच्या दरामुळे दरडोई उत्पन्नाची वाढ अल्प राहते.

**३) औद्योगिकरणाचा मंद वेग :**

भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात उद्योगापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा फारच कमी आहे. बिगर शेती व्यवसायाचा विकास जलदगतीने न झाल्याने राष्ट्रीय उत्पन्न पर्यायाने भारताचे दरडोई उत्पन्न अल्प आहे.

**४) भांडवलाची कमतरता :**

भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न कमी असल्याने बचत कमी आहे, बचत कमी असल्याने भांडवल संचय व भांडवल गुंतवणूक कमी त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात कमी वाढ झाल्याने दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**५) शेतीची अल्प उत्पादकता :**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून ती मागासलेली आहे. भारतीय शेतीची उत्पादकता शेतीतील अनेक संकटामुळे दर हेक्टरी व प्रती श्रमिक जगातील इतर देशांच्या तुलनेने फारच अल्प आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील लोकांचे उत्पन्न कमी राहिल्याने दरडोई उत्पन्नही कमी राहते.

**६) शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव :**

भारतात आजही निरक्षर लोकांचे प्रमाण जवळजवळ २६% इतके प्रचंड आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी आहे परंतू त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण नसते. ते आपला व्यवसाय वंशपरंपरेने करतात. कुटिरोद्योगातील ग्रामीण उद्योगातील कारागीर हे परंपरागत पद्धतीने उत्पादन करतात त्यामुळे त्यांची उत्पादकता कमी राहून दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**७) शासनकर्त्यांची चुकीची धोरणे :**

भारतात १९५१ पासून नियोजनाला सुरवात केली. नियोजन काळात भूधारनेवर कमाल मर्यादा, कुळकायदे, मक्तेदारीविरूद्ध कायदे इ. तसेच अलीकडील काळात नोटाबंदी, जीएसटी इत्यादींची अंमलबजावणी चुकीच्या पद्धतीने केल्याने राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न अपेक्षित प्रमाणात वाढले नाही.

**८) दोषपूर्ण शिक्षण पद्धती :**

भारतातील शिक्षण पद्धती ही कारकून निर्माण करणारी आहे. भारतात प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगी नसलेले व कुचकामी असलेले पुस्तकी शिक्षण दिले जाते. अशा शिक्षणामुळे कला, वाणिज्य, शास्त्र, अभियांत्रिकी शाखेतील लाखो पदवीधर बेरोजगार आहेत. उद्योग व्यवसायाला अपेक्षित असलेले शिक्षण, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध शिक्षण पद्धतीतून मिळत नसल्याने बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढून दरडोई उत्पन्न अल्प आहे.

**९) मानवी भांडवलाचा कनिष्ठ दर्जा :**

देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये मानवी भांडवलाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. भारतात लोकसंख्या अधिक आहे मात्र मानवी भांडवलाची गुणवत्ता कमी दर्जाची आहे. धार्मिक व दैववादी प्रवृत्ती, नशिबावर अवलंबून राहण्याची वृत्ती, श्रमाला महत्त्व नसणे, उदासीनता, शिकावू वृत्ती नसणे, राहणीमान कमी दर्जाचे

इत्यादीमुळे मानवी भांडवल कमी दर्जाचे असल्याने उत्पादकता व राष्ट्रीय उत्पन्न कमी मिळते त्यामुळे दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**१०) क्षमतेचा अपुरा वापर :**

भारतात अनेक लोक, उद्योगसंस्था, उद्योग पूर्ण क्षमतेने काम करीत नाहीत. वीज व कच्च्या मालाची टंचाई अशा अनेक कारणामुळे उद्योगात प्रचंड गुंतवणूक केलेली असतानाही या उद्योगांची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी मिळून दरडोई उत्पन्न अल्प राहते.

## मानवी विकास निर्देशांक

**प्रास्ताविक :**

आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक महत्त्वपूर्ण असतो. अलीकडील काळात आर्थिक वाढीकडून मानवी विकासाकडे अधिक लक्ष वेधले आहे. १९९० पासून युनोनी आपले मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यास सुरवात करून मानवी विकास निर्देशांक विकसीत केला आहे. यू.एन.डी.पी. च्या सन १९९७ मधील अहवालात मानवी विकास संकल्पनेचे विश्लेषण केले आहे. प्रत्येक देशाच्या सर्वागीण विकासामध्ये मानवी साधन संपत्ती अतिशय महत्त्वाची असून देशाचा विकास हा मानवी भांडवला शिवाय होऊ शकत नाही. कारण देशाच्या आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनला मौलिक स्थान आहे.मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढविणे हे विकासाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी मानवाचे आरोग्य व शिक्षण यावर आवश्यक खर्च करावा लागतो. म्हणून मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्त्वाची असते. देशातील नागरिकांचे ज्ञान, कौशल्याचा विकास व त्याचा पर्याप्त वापर न करणारा देश विकसीत होऊ शकत नाही.

**अर्थ :**

‘‘ अपेक्षित आयुमर्यादा निर्देशंक, शैक्षणिक प्राप्ती निर्देशांक, राहणीमान निर्देशांक आणि समायोजन वास्तव दरडोई उत्पन्न निर्देशांक यांची साधी सरासरी म्हणजे मानवी विकास निर्देशांक होय.’’

काही देशामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही मानवी संसाधनाचा पुरेसा विकास न झाल्यामुळे तो देश मागास राहिलेला दिसून येतो. याउलट इस्त्राईल सारख्या देशाने अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यावर मत करून मानवी विकास घडवून आणून आर्थिक प्रगती केली आहे. जपानने देखील मानवी भांडवल निर्मिती करून जागतिक बाजारपेठवर प्रभुत्व मिळविले आहे. त्यामुळे देशाला आर्थिक विकास करावयाचा असेल तर मानवी विकासाकडे पुरेसे लक्ष देणे गरजेचे आहे. मानवी विकास म्हणजे अधिकाधिक उत्पादकता होय. मानवी विकास हा त्या देशातील लोकांचे शिक्षण, आहार आरोग्य, आणि राष्ट्रीयत्वाची भावना इत्यादी घटकावर अवलंबून असतो.

**मानवी विकास निर्देशांकाचे मापन :**

मानवी विकासाचे मापन करणे अतिशय कठीण आहे. मानवी विकास निर्देशांक तयार करणे ही एक संकल्पना आहे. निर्देशांक तयार करून आर्थिक विकासाची व्याप्ती लक्षात घेतली जाते. किंवा मानवी विकासाच्या सहाय्याने आर्थिक विकासाचा वेग लक्षात घेतला जातो. आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्ना बरोबरच मानवी विकास निर्देशांक उपयुक्त आहे. मानवी विकास निर्देशांक वरील बाजूने वाढणारा किंवा वाढ होत

जाणारा असेल तर विकास साधणारा किंवा होणारा आहे असे म्हटले जाते.

**मानवी विकास निर्देशांक रचना :** मानवी विकास निर्देशांक तयार करताना तीन प्रमुख निदर्शक मिळून तयार केला जातो.

**१) दीर्घायुष्य** : (Longevity) दीर्घायुष्य हे आयुष्यमान/सरासरी आयुर्मानाच्या सहाय्याने मोजले जाते.

**२) ज्ञान** (Knowledge) :

ज्ञान हे शैक्षणिक कौशल्य किंवा प्रौढ साक्षर प्रमाण किंवा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण यांच्या सहाय्याने मोजले जाते.

**३) जीवनमान** (Standard of Living ):

जीवनमान दर्जा हा वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने किंवा पैशातील खरेदीशक्ती समता साहाय्याने मोजले जाते.

मानवी विकास तयार करताना प्रत्येक निर्देशकाचे स्थिर कमाल व किमान मुल्य हे निश्चित केले जाते.

१) सरासरी आयुर्मान = २५ वर्षे ते ८५ वर्षे

२) प्रौढ साक्षर प्रमाण = ० टक्के ते १०० टक्के

३) एकत्रित स्थूल नावनोंदणी गुणोत्तर (ज्ञान) = ० टक्के ते १०० टक्के

पुढील सूत्राच्या साहाय्याने गणिती करून निर्देशांक तयार करता येतो.

$$\text{निर्देशांक (Index)} = \frac{\text{प्रत्यक्षात मूल्य - किमान मूल्य (Actual value -Minimum value)}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य (Maximum value - Minimum value)}}$$

उदा. जर एखाद्या देशातील सरासरी आयुर्मान ६० वर्षे असेल तर सरासरी आयुर्मानाचा निर्देशांक हा ०.५८३ असेल. (६०-२५ भागिले ८५-२५ =३५ भागिले ६०= ०.५८३)

**तक्ता क्रमांक ३.३**

**मानवी विकास निर्देशांक : आंतरराष्ट्रीय तुलना**

**१९९० ते २०१४ मधील निवडक देशांचा मानवी विकास निर्देशांक कल**

| मानवी विकास निर्देशांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| देश व स्थान – | १९९० | २००० | २००१ | २०१३ | २०१४ |
| **अतिउच्च मानवी विकास – ४९ देश** | | | | | |
| १. नार्वे –०१ | ०.८४९ | ०.९१७ | ०.९४१ | ०.९४२ | ०.९४४ |
| २. ऑस्ट्रेलिया –०२ | ०.८६५ | ०.८९८ | ०.९३० | ०.९३३ | ०.९३५ |
| ३. स्विझर्लंड – ०३ | ०.८३१ | ०.८८८ | ०.९२५ | ०.९२८ | ०.९३० |
| ४. डेन्मार्क – ०४ | ०.७९९ | ०.८६२ | ०.९२० | ०.९२३ | ०.९२३ |
| ५. नेदरलँड – ०५ | ०.८२९ | ०.८७७ | ०.९१९ | ०.९२२ | ०.९२२ |
| **उच्च मानवी विकास – ५६ देश :** | | | | | |
| १. रोमानिया – ५३ | ०.७०३ | ०.७०६ | ०.७८६ | ०.७९१ | ०.७९३ |
| २. उरूग्वे – ५४ | ०.६९२ | ०.७४२ | ०.७८६ | ०.७९१ | ०.७९३ |
| ३. कझाकिस्तान – ५५ | ०.६९० | ०.६७९ | ०.७७२ | ०.७८५ | ०.७८८ |
| ४. बोरबोडस – ५६ | ०.७१६ | ०.७५३ | ०.७८६ | ०.७८५ | ०.७८५ |
| ५. पनामा – ६० | ०.६५६ | ०.७१४ | ०.७५९ | ०.७७७ | ०.७८० |
| **मध्यम मानवी विकास –३९ देश :** | | | | | |
| १. इजिप्त – १०८ | ०.५४६ | ०.६२२ | ०.६८२ | ०.६८९ | ०.६९० |
| २. इंडोनेशिया – ११० | ०.५३१ | ०.६०६ | ०.६७१ | ०.६८१ | ०.६८४ |
| ३. दक्षिण आफ्रिका– ११७ | ०.६२१ | ०.६३२ | ०.६५७ | ०.६६३ | ०.६६६ |
| ४. भारत – १३१ | ०.४२८ | ०.४९६ | ०५९७ | ०.६०४ | ०.६०९ |
| ५. कंबोडिया– १४४ | ०.३६४ | ०.४१९ | ०.५४१ | ०.५५० | ०.५५५ |
| **अल्प मानवी विकास – ४४ देश :** | | | | | |
| १. पाकिस्तान – १४७ | ०.३९९ | ०.४४४ | ०.५७२ | ०.५६३ | ०.५३८ |
| २. नायजर – १८८ | ०.२१४ | ०२५७ | ०.३३३ | ०.३४५ | ०.३४८ |

**संदर्भ : मानवी विकास अहवाल (२०१४) :**

वरील तक्त्यावरून आपणास पुढील तुलनात्मक बाबी लक्षात येतात. १८८ देशांचे मानवी विकास निर्देशांक

संग्रहित केले आहेत. परंतु १८८ देशांच्या मानवी विकास निर्देशकांचे विश्लेषण करणे कठीण असल्याने विश्लेषनाच्या सोयीसाठी निवडक देशांचेच मानवी विकास निर्देशांक दिले आहेत. १८८ देशांपैकी ४९ देश अति उच्च मानवी विकास गटात आहेत. ५६ देश उच्च मानवी विकास गटात आहेत. ३९ देश मध्यम मानवी विकास गटात येतात. तर ४४ देश अल्प कमी मानवी विकास गटात मोडतात. मानवी विकास निर्देशांकात प्रथम स्थानी नार्वे, दुसऱ्या स्थानी ऑस्ट्रेलिया, तिसऱ्या स्थानी स्विझर्लंड, चौथ्या स्थानी डेन्मार्क तर पाचव्या स्थानी नेदरलँड आहे. रोमानिया ५३ व्या स्थानी, पनामा ६० व्या स्थानी, इजिप्त १०८ व्या स्थानी, भारत १३१ व्या स्थानी, पाकिस्तान १४७ व्या स्थानी तर शेवटच्या १८८ व्या स्थानी नायजर हा देश आहे.

**मानवी विकास निर्देशकाचे महत्व :**

आर्थिक प्रगतीत मानवी विकास निर्देशांक महत्वाची भूमिका पार पाडतो. मानवी विकास निर्देशांकामुळे अहवालावरून देशाच्या विकासाची अवस्था समजते. तसेच यामुळे संबंधित देशातील लोकांचे शिक्षण, आहार, आरोग्य याबाबत योग्य माहिती मिळण्यास मदत होते. मानवी विकास निर्देशांकामुळे मानव विकास निर्देशांक सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी विकास निर्देशांकामुळे देशातील शिक्षण, आरोग्य, उत्पन्न या परिणामाची योग्य माहिती मिळते. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा दर्शक म्हणून मानवी विकास निर्देशांक उपयुक्त असतो. अशा विविध कारणामुळे मानवी विकास निर्देशांकाला महत्व प्राप्त झाले आहे.

**सारांश :** या प्रकरणामध्ये जगातील भारतासह निवडक देशांच्या राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक यांची तुलना केली आहे. जगातील निवडक देशांच्या तुलनेवरून असे लक्षात येते की भारताचे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक खूपच अल्प आहे. यामध्ये वाढ करण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न केले पाहिजेत.

## ३.३ सारांश :

भारतातील बेकारी आणि दारिद्र्याच्या समस्येतूनच आर्थिक आणि सामाजिक विषमतेचा प्रश्न निर्माण होतो. अलिकडच्या काळात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकरण स्वीकारल्यापासून आर्थिक व सामाजिक विषमतेचा प्रश्न गंभीर बनत चाललेला आहे. उत्पन्नातील विषमता वाढत जाते. त्यामुळे वर्तमान व भविष्यात या समस्येचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्याला अनुसरून या उपघटकामध्ये आर्थिक व सामाजिक विषमतेच्या संकल्पनांची मांडणी समजण्यास मदत होते. त्याप्रमाणेच आर्थिक विषमता निर्माण होण्याची कारणे, त्याप्रमाणेच आर्थिक विषमता कमी करण्यासाठी केलेल्या व सुचविलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतलेला आहे. त्याप्रमाणेच भारतातील सामाजिक विषमतेची संकल्पना त्याबरोबरच सामाजिक विषमता का निर्माण होते, त्याची पारंपारिक आणि आजची कारणे समजून घेता येतात. सामाजिक विषमतेचे परिणाम काय होतात याची कल्पना येते. ही सामाजिक विषमता कमी करण्यासाठी आतापर्यंत सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या यावरून भविष्यकालीन कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याचा ही अंदाज येतो. आर्थिक आणि सामाजिक विषमते बरोबरच भारताला भेडसावणारी प्रमुख समस्या प्रादेशिक असमतोलाची आहे. भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेमध्ये समतोल आर्थिक विकास घडवावा. सर्व राज्यांचा/प्रदेशांचा समतोल विकास घडून येणे आवश्यक आहे. भारतामध्ये काही राज्ये विकसित तर काही राज्ये मागासलेली दिसून येतात. या मागासलेल्या

राज्यांकडे ही लक्ष पुरविण्याची गरज आहे. प्रादेशिक असमतोल म्हणजे काय ? प्रगत राज्ये व मागासलेली राज्ये कोणती यांचा थोडक्यात आढावा घेतलेला असून प्रादेशिक असमतोलाचे घटक विचारात घेतलेले आहेत. यावरून प्रादेशिक असमतोल का निर्माण होतो. त्याबरोबरच प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न किंवा उपाययोजना याविषयी माहिती देण्यात आलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांकांची आंतरराष्ट्रीय तुलना करण्यात आली आहे. थोडक्यात सदर उपघटकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थे समोरील असणारी आव्हाने, स्वरूप, व्याप्ती, कारणे, परिणाम आणि उपाययोजना इत्यादी विषयी संपूर्ण माहिती मिळण्यास मदत होते.

### ३.४ पारिभाषिक शब्द :

१) आर्थिक विषमता – गरीबी व श्रीमंती यातील फरक. २) प्रादेशिक असमतोल – विभागाविभागाच्या विकासातील फरक. ३) असमतोल – विकासातील असमानता. ४) पायाभूत – विकासाला आवश्यक असणारे घटक. ५) औद्यागिक धोरण – उद्योगाबाबत आखलेले धोरण. ६) राष्ट्रीय उत्पन्न – देशाचे एका वर्षातील उत्पन्न. ७) दरडोई उत्पन्न – देशातील लोकांचे सरासरी उत्पन्न. ८) मानवी विकास – मानवी प्रगती. ९) मानवी विकास निर्देशांक – मानवाच्या विकासाचे मोजमाप.

### ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

### ३.५ (ब)दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. भारतात आर्थिक विकासाबरोबर प्रादेशिक असमतोल .......................... आहे.

(अ) घटला (ब) वाढला (क) स्थिर (ड) मध्यम

२. राज्याच्या लोकसंख्येच्या आधारे सर्वात गरीब .......................... राज्य आहे.

(अ) पंजाब (ब) बिहार (क) ओरिसा (ड) महाराष्ट्र

३. .............................. राज्यात औद्योगिक विकास सर्वात जास्त झाला आहे.

(अ) महाराष्ट्र (ब) गोवा (क) प. बंगाल (ड) पंजाब

४. वांच्छू समितीची स्थापना ........ मध्ये करण्यात आली.

(अ) १९५१ (ब) १९७१ (क) १९६८ (ड) १९७५

५. प्रादेशिक असमतोलाची निर्मिती .................................... काळात झाली.

(अ) ब्रिटिश (ब) नियोजन (क) स्वातंत्र्योत्तर (ड) आर्थिक सुधारणा

६. जागतिक बँकेच्या २०१४ च्या अहवालानुसार जगातील ........ देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सर्वाधिक आहे.

(अ) जपान (ब) रशिया (क) जर्मनी (ड) अमेरिका

७. ................ पासून युनोने मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यास सुरवात केली.

(अ) १९९१ (ब) १९९० (क) २००१ (ड) २००५

८.  २०१४ च्या मानवी विकास अहवालानुसार .................. चे प्रथम स्थान आहे.

(अ) डेन्मार्क  (ब) नेदरलँड  (क) नॉर्वे  (ड) अमेरिका

**३.६ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तुनिष्ठ प्रश्न) उत्तरे :**

३.५ अ) १) अ २) अ ३) ब ४) ब ५) ब ६) ब ७) अ ८) क ९) ब

३.५ ब) १) ब २) क ३) अ ४) क ५) अ ६) ड ७) ब ८) क

**३.७ सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा लिहा :**

१) भारतातील आर्थिक विषमता २) आर्थिक विषमतेची कारणे ३) भारतातील सामाजिक विषमता कमी करण्याच्या उपाययोजना ४) भारतातील सामाजिक विषमता ५) भारतातील सामाजिक विषमतेचे प्रकार/कारणे ६) भारतातील सामाजिक विषमतेचे परिणाम ७) भारतातील सामाजिक विषमता कमी करण्यासाठी भारत सरकारने केलेल्या उपाययोजना ८) भारतातील प्रादेशिक असमतोल ९) भारतातील प्रादेशिक असमतोलाचे घटक १०) भारतातील असमतोल कमी करण्यासाठी शासकीय प्रयत्न ११) राष्ट्रीय उत्पन्न १२) दरडोई उत्पन्न १३) मानवी विकास निर्देशांक.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील आर्थिक विषमता निर्मितीची कारणे सांगून आर्थिक विषमता कमी करण्याचे उपाय सुचवा. २) भारतातील सामाजिक विषमतेचे कारण व परिणामांचा आढावा घ्या. ३) भारतातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचा सविस्तर आढावा घ्या. ४) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ? राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना स्पष्ट करा. ५) दरडोई उत्पन्नाची संकल्पना स्पष्ट करून भारताचे दरडोई उत्पन्न कमी असण्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

**३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**


१) भारतीय अर्थव्यवस्था : देसाई-भालेराव, निराली प्रकाशन-९ वी आवृत्ती, सप्टेंबर २०१२

२) भारतीय अर्थव्यवस्था : घाटगे-वावरे, निराली प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जून २०१०

३) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २०१०

४) अर्थव्यवस्था, नियोजन आर्थिक विकास आणि कृषी : जाधव-काळे-मगर सुर्यवंशी, रत्नाई पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, एप्रिल २०१२

५) शिवार्थ २३ वे वार्षिक अधिवेशन, शिवाजी विद्यापीठ, इकॉनॉमिक्स असोशिएशन, कोल्हापूर २०१३

६) भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. प्रभाकर देशमुख, पिंपळी पुणे ॲण्ड के, पब्लिशर्स, नागपूर.

७) Indian Economy - Datt Sundaram - S. Chand Company Ltd. New Delhi.

८) भारतीय अर्थव्यवस्था : साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.

९) Indian Economy - A. N. Agarwal, Wishwa Prakashan, New Delhi.


***

# घटक क्र. ४

# भारतातील लोकसंख्या
# ( Population in India )

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ लोकसंख्या वाढ आणि वाढीची कारणे -

४.२.२ लोकसंख्येची वैशिष्ट्ये

अ) लोकसंख्येचे आकारमान

ब) जन्मदर आणि मृत्यूदर

क) लोकसंख्येची घनता

ड) स्त्री - पुरूष प्रमाण

इ) साक्षरता प्रमाण

फ) लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी

ग) लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी

ह) लोकसंख्येची ग्रामीण आणि शहरी विभागणी.

४.२.३ लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम

४.२.४ लोकसंख्या धोरण -२०००

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्दांचा अर्थ

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

**४.० उद्दिष्टये :-**

'भारतातील लोकसंख्या या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल

१) भारतीय लोकसंख्येचे स्वरूप लक्षात येईल.

२)	भारतातील लोकसंख्येची वाढ आणि लोकसंख्या वाढीची कारणे ध्यानात येतील.

३)	भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट होतील.

४)	लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील परिणाम समजून घेता येईल.

५)	भारताचे सन २००० मधील लोकसंख्याविषयक धोरण समजून घेता येईल.

### ४.१ प्रास्ताविक :

भारताच्या आर्थिक विकासात देशातील नैसर्गिक साधन संपत्ती आणि लोकसंख्या हे दोन घटक अतिशय महत्वपूर्ण ठरतात. लोकसंख्येचे आकारमान, लोकसंख्येची रचना, लोकसंख्या वाढीचा वेग यांचा देशाच्या आर्थिक विकासावर अनुकुल किंवा प्रतिकूल परिणाम होत असतो. लोकसंख्येचे आकारमान पर्याप्त राहिल्यास देशाचा सर्वांगीण विकास गाठता येणे सोपे जाते. या पार्श्वभूमीवर भारतीय लोकसंख्या वाढीची कारणे, भारतीय लोकसंख्येची ठळक लक्षणे तसेच भारतातील लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील होणारा परिणाम इ. बाबींचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

### ४.२ विषय विवेचन :

कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती ही त्या देशातील नैसर्गिक संसाधने आणि लोकसंख्या यावर अवलंबून असते. तसेच देशाची लोकसंख्या आणि त्या देशाचे उत्पादन यांचाही परस्पराशी निकटचा संबंध असतो.देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा यावरूनच ठरतो. लोकसंख्येचा आकार, लोकांची उपक्रमशीलता,व्यवसायिक विभागणी तसेच तांत्रिक ज्ञान या घटकांवर देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर अवलंबून असतो. विकसनशील राष्ट्रात लोकसंख्या वेगाने वाढताना दिसते. ही एक गंभीर समस्या आहे. याचा देशाच्या आर्थिक विकासावर बहुतेक वेळा प्रतिकूल परिणाम होतो. भारतातही लोकसंख्या वाढीचा वेग अधिक असून त्याचा भारताच्या आर्थिक विकासावर अनुकुल व प्रतिकूल परिणाम होताना दिसतो. भारत सरकारने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेळोवेळी लोकसंख्याविषयक धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली आहे. या सर्वाचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केला आहे.

#### ४.२.१ लोकसंख्या वाढीची कारणे :-

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकसंख्या खूप वेगाने वाढलेली दिसून येते. १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. त्यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन सन २०११ च्या शिरगणतीप्रमाणे भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी झाली आहे. गेल्या दशकात लोकसंख्या वाढीचा एकत्रित वार्षिक वृद्धीदर १.६४ इतका राहिला आहे. भारताच्या इतिहासात सन १९२१ हे वर्ष वगळता लोकसंख्या सातत्याने वाढताना दिसून येते आहे. सन १९११ ते १९२१ या दशकात भारताच्या लोकसंख्येत २५.२ कोटी वरून २५.१ कोटी इतकी घट झाली. म्हणून सन १९२१ या वर्षाला **'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष'** असे म्हणतात. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सध्या लोकसंख्येबाबत भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. भारताची लोकसंख्या वेगाने वाढण्यास पुढील अनेक घटक कारणीभूत आसलेले दिसून येतात.

### १) विवाहाची सार्वत्रिक प्रथा :

भारतात विवाहाला एक धार्मिक कर्तव्य मानले जाते. विवाह हा धार्मिक विधी असल्याने लग्न करण्याच्या वयात भारतातील सर्व स्त्री-पुरूष विवाह करतात. अविवाहीत व्यक्तीकडे समाज हिन नजरेने पाहतो. त्यामुळे विवाह केलाच पाहिजे असा समज समाजामध्ये आहे. पर्यायाने नवीन जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण वाढते. सार्वत्रिक विवाहाच्या या प्रथेमुळे भारतातील लोकसंख्या जलद गतीने वाढलेली दिसून येते.

### २) निरक्षरता :

भारतीय लोकसंख्या वाढीचे निरक्षरता हे मूळ कारण आहे. स्वातंत्र्यानंतर साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी त्यामध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमीच आहे.त्यामुळे अधिक अपत्यांना जन्माला घालण्याचे प्रमाण वाढले. साक्षरतेचे प्रमाण वाढलेले असले तरी लोकसंख्या कमी झालेली नाही. चुकीच्या धार्मिक व सामाजिक समजूतीमुळे आजही दोनपेक्षा अधिक अपत्यांना जन्माला घालण्याचे प्रमाण वाढले आहे.

### ३) दारिद्रय :

भारतीय लोकांचे दारिद्र्य हे ही भारतातील लोकसंख्या वाढीचे कारण झाले आहे. भारतात अद्यापही बेरोजगारी व दारिद्रय मोठ्या प्रमाणात आहे. भारतीय लोकांच्या गरीब परिस्थितीमुळे घरात अधिकाधिक मुलांचा जन्म झाला. जेवढी अधिक मुले होतील तेवढी ती शेतीसाठी किंवा इतरत्र कामधंदा करून पैसे मिळवतील. म्हातारपणी भाकरीला आधार मिळावा म्हणून अधिक मुलांना जन्माला घातले जाते. पर्यायाने लोकसंख्येत वाढ होत गेली.

### ४) उच्च जननदर :

उच्च जननदर हे लोकसंख्यावाढीचे प्रमुख कारण आहे. २०११ च्या शिरगणतीनुसार भारतात जननदर २०.९७ आहे. तर मृत्यूदर ७.९ आहे. म्हणजेच गेल्या काही वर्षापासून भारतात जननदर अधिक आहे व मृत्यूदर कमी असल्याने भारताची लोकसंख्या एकसारखी वाढतच आहे.

### ५) अंधश्रध्दांचा पगडा :

भारतात आजही रूढी-परंपरा, देव-धर्म यांचे अंधानुकरण केले जाते. त्याचबरोबर पितृप्रधान समाज असल्याने मुलगा जन्माला आला तरच आपल्या घराण्याचे नाव व परंपरा चालू राहील असे मानले जाते. त्यामुळे भारतात मुलगा होईपर्यंत मुलांची संख्या वाढविली जाते. वंशाचा दिवा अखंड ठेवावा या हेतूने मुलगा होईपर्यंत लोक अपत्यांना जन्म देतात. त्यामुळे लोकसंख्या वाढत राहते.

### ६) बालविवाहाची प्रथा :

भारतात बालविवाहाची पद्धत बऱ्याच ठिकाणी रूढ आहे. लहान वयात लग्न झाल्याने प्रजोत्पादनासाठी बराच काळ मिळतो व त्यामुळे लोकसंख्या वाढते. सन. १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा संमत झालेला असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. भारतातील ८१% मुलींची लग्ने १० ते २० वर्षांच्या वयामध्ये होतात. हे वय प्रजोत्पादनाच्या दृष्टीने अधिक प्रबळ असते. त्यामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

### ७) बेरोजगारी :

भारत हा तरूणांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतीय लोकसंख्येतील जवळ-जवळ ५०% लोकसंख्या ही २५ वर्षाखालील आहे. वाढत्या युवकसंख्येला शेतीशिवाय अन्य क्षेत्रात रोजगार मिळणे आवश्यक आहे. पण शेती व्यवसायातील अदृश्य बेकारीमुळे इतरत्र रोजगार मिळत नसल्याने शेतीवरच अवलंबून रहावे लागते. अशातच रोजगाराच्या अभावामुळे युवकांचे लैंगिक सुखांकडील आकर्षण वाढून लोकसंख्येत वाढ होण्याची भिती आहे.

### ८) हवामान :

भारतातील लोकसंख्या वाढण्याचे कारण हवामान हे एक आहे. भारतातील हवामान उष्ण आहे आणि अशा हवामानात मुले-मुली लवकर वयात येतात. त्यामुळे त्यांची लग्ने लवकर होतात. प्रजननास लहान वयातच सुरवात झाल्याने लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

### ९) एकत्र कुटुंबपद्धती :

एकत्र कुटुंबपद्धतीत घराचा खर्च एकत्रीतरित्या चालत असतो. त्यामुळे आपल्याला कितीही मुले झाली तरी त्यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी ही कुटुंबाची सामुदायिक जबाबदारी मानली जाते. त्यामुळे कोणीही आपले कुटुंब मर्यादित करण्याचा विचार करत नाही. भारतात अजूनही एकत्र कुटुंबपद्धतीचे अस्तित्व असल्याने फार मोठ्या प्रमाणात भारताची लोकसंख्या वाढत आहे.

### १०) बहुपत्नीत्व :

पूर्वी भारतात अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची प्रथा होती. आज हिंदू कायद्यानुसार द्वि-भार्या प्रतिबंधक कायदा करण्यात आलेला आहे. परंतू त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. मुस्लीम समाजाला याबाबत कायदेशीर निर्बंध नाहीत. अनेक स्त्रियांशी विवाह म्हणजे लोकसंख्येत मोठी वाढ होय.

### १०) कुटुंबनियोजनाला अपूरा प्रतिसाद :

सरकारने कुटुंबनियोजन मोहिम राबविली तरी भारतातील बहुसंख्य समाज निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे सरकारी पातळीवर राबविलेली ही मोहिम तितकीशी यशस्वी झाली नाही. कुटुंबनियोजन कार्यक्रमाविषयी लोकांमध्ये निरूत्साह व उदासीनता असल्याने भारताची लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**स्वयं - अध्ययन प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या ......................... कोटी आहे.

(अ) १००.२ (ब) ३६.१ (क) १२१ (ड) यापैकी नाही.

२. भारतात सन...............................हे वर्ष वगळता लोकसंख्या सातत्याने वाढत आहे.

(अ) १९५१ (ब) १९०१ (क) १९२० (ड) १९२१

३. लोकसंख्येत भारताचा जगात ...................................... क्रमांक लागतो.

(अ) पहिला (ब) दुसरा (क) तिसरा (ड) चौथा

४) भारतात जन्मदर .... असून मृत्यूदर वेगाने घटत आहे.

(अ) अधिक (ब) कमी (क) १२१ (ड) यापैकी नाही.

### ४.२.२ भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्टये :

भारतातील लोकसंख्येची वैशिष्टये अभ्यासतांना आपणास लोकसंख्येचे आकारमान ,जन्मदर व मृत्यूदरातील तफावत, स्त्री-पुरूष प्रमाण, लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी,सरासरी आयुर्मान, लोकसंख्येचे शहरी व ग्रामीण विभागणी साक्षरता प्रमाण इ. बाबतीत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झालेला बदल विचारात घेणे उचित ठरेल. या सर्व घटकांचे तपशीलवार विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) लोकसंख्येचे आकारमान -**

लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताच्या लोकसंख्येचे आकारमान खूप मोठे आहे. लोकसंख्येच्या आकारमानावरून भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत भारतातील लोकसंख्या वाढीचा दर अधिक राहीला आहे. सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. सन२०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी झाली आहे. एकूण जागतिक क्षेत्रफळापैकी भारताच्या वाटयाला २.४% भूमी आली आहे. तर जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास १७.५% लोकसंख्या भारतात राहते आहे. अमेरिका, इंग्लंड व रशिया या तीन देशांची मिळून जितकी एकूण लोकसंख्या होईल तितकी लोकसंख्या एकट्या भारतात राहते आहे. यावरून भारतीय लोकसंख्येच्या आकारमानाची कल्पना येते. भारतात पहिली शिरगणती सन १८८१ मध्ये झाली. त्यानंतर प्रति १० वर्षातून एकदा नियमीतपणे शिरगणती केली जाते. भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदलाची कल्पना कोष्टक क्र. ४.१ वरून येईल.

**तक्ता क्र. ४.१**

**भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदल**

| जनगणना वर्ष | लोकसंख्या | लोकसंख्येतील दशवार्षिक वाढ (कोटी) | वार्षिक लोकसंख्या वाढ |
|---|---|---|---|
| १९०१ | २३.६ | – | – |
| १९११ | २५.२ | + १.६ | + ०.५७ |
| १९२१ | २५.१ | – ०.१ | – ०.०३ |
| १९३१ | २७.९ | + २.८ | + १.१ |
| १९४१ | ३६.९ | + ४.० | + १.४ |
| १९५१ | ३६.१ | + ४.२ | + १.३ |
| १९६१ | ४३.९ | + ७.८ | + २.१ |
| १९७१ | ५४.८ | + १०.९ | + २.५ |
| १९८१ | ६८.४ | + १३.५ | + २.७ |
| १९९१ | ८४.४ | + १६.१ | + २.४ |
| २००१ | १०२.७ | + १८.३ | + २.१ |
| २०११ | १२१.२ | + १७.६ | + १.६४ |

**संदर्भ :** Datta/Sundaram-Indian Economy - 2011

वरील कोष्टकावरून भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदल स्पष्ट होतो. सन १९२१ चा अपवाद वगळता भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. या काळात साथीचे रोग, महापूर अवर्षन इ.मुळे लोकसंख्येत घट झाली आहे. म्हणून सन १९२१ हे वर्ष 'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष' म्हणून ओळखले जाते.

सन १९२१ ते १९५१ या कालखंडात लोकसंख्या हळूवारपणे वाढली आहे. लोकसंख्यावाढीचा वार्षिक सरासरी दर १.२२% इतका राहिला आहे.

सन १९५१ पासून २००१ पर्यंत लोकसंख्या वेगाने वाढलेली दिसून येते. सन २००१ ते २०११ या दशकात लोकसंख्या वाढीचा सरासरी वार्षिक वृद्धीदर १.६४% होता. लोकसंख्या वाढीचा सरासरी ही बाब समाधानाची आहे. तरीसुद्धा भारतीय लोकसंख्येचे आकारमान आणि वाढीचा वेग जागतिक स्तरावर विचार करता खूप मोठा आहे. असे म्हणावे लागेल.

**(ब) जन्मदर आणि मृत्यूदर**

प्रतिवर्षी १००० लोकांमागे जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे जन्मदर होय. यालाच जननदर असेही म्हणतात. उच्च जन्मदर हे भारतीय लोकसंख्येचे वैशिष्ट्ये होय. तसेच दरवर्षी १००० लोकांमागे मृत्यूमुखी

पडणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर होय. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात मृत्यूदरात वेगाने घट झाली आहे. जन्मदर व मृत्यूदरात जेव्हा अंतर जास्त असते तेव्हा लोकसंख्या वेगाने वाढते. पुढील कोष्टकावरून भारतातील जन्मदर व मृत्यूदरात झालेल्या बदलांची कल्पना येईल.

**तक्ता क्र. ४.२**

**भारतातील जननदर व मृत्युदर**

| कालावधी | जननदर (दर हजारी) | मृत्युदर (दर हजारी) |
|---|---|---|
| १९५१ | ४०.० | १८.० |
| १९७१ | ३६.९ | १४.९ |
| १९८१ | ३३.९ | १२.५ |
| १९९१ | ३९.५ | ९.८ |
| २००१ | २५.८ | ८.५ |
| २०११ | २०.९ | ७.९ |

संदर्भ : Datta/Sundaram-Indian Economy, Page No.62 - edition 2011

वरील कोष्टक क्र. ४.२ वरून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात मृत्यूदरात वेगाने घट झालेली दिसून येते. तर जननदर अद्यापही अधिक असलेला दिसून येतो.

सन १९५० ते २०११ या कालावधीत जन्मदर दर हजारी ३९.९ वरून २१.८ पर्यंत कमी झाला सन १९६० ते सन १९७० या दशकात मात्र तो वाढलेला दिसून येतो मृत्यूदराच्या बाबतीत सन १९५० ते २०११ या काळात वेगाने घट झालेली दिसून येते. तो २७.४ वरून ७.१ इतका झाला अर्थात १९६० ते १९७० या दशकात मृत्यूदरातही वाढ झालेली दिसून येते.

भारतातील सर्वच घटक राज्यात जन्मदर व मृत्यूदर समान नाही.बिहार, उ.प्रदेश, राजस्थान, झारखंड या राज्यांमध्ये जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी आहे. तर गोवा, त्रिपूरा, केरळ नागालँड या राज्यात जन्मदर व मृत्यूदर अल्प असलेला दिसून येतो.

जगातील निवडक देशांची तुलना केली असता भारतातील ढोबळ जननदर जास्त आहे. उदा. सन २०१६ मध्ये चीनचा जननदर १२, अमेरिका, जपानचा ८, जर्मनीचा ९ आणि भारताचा जननदर १९ होता. तर भारताचा मृत्यूदर ७, जपान -११, इटली १०, जर्मनी ११ इतका असलेला दिसून येतो. भारतातील बालविवाहाची प्रथा, निरक्षरता, एकत्र कुटुंबपद्धती, स्त्री साक्षरतेचे अल्प प्रमाण, दारिद्र्य इ. कारणामुळे जननदर उच्च राहिला आहे. तर पिण्याच्या पाण्याची सोय सार्वजनिक आरोग्य सेवेत सुधारणा, रूग्णालयांच्या संख्येत वाढ, दळणवळण सोईत सुधारणा इ. मुळे मृत्यूदरात वेगाने घट झाली आहे.

**क) लोकसंख्येची घनता :-**

एक किलोमीटर क्षेत्रात सरासरी किती लोक राहतात. त्याला त्या प्रदेशाची घनता असे म्हणतात.सामान्यपणे लोकसंख्येची घनता ही अनुकुल हवामान, शिक्षण,आरोग्य, वाहतूक व दळणवळण सुविधा, भौगोलिक परिस्थिती जमिनीची सुपीकता इ. घटकावर अवलंबून असते. याशिवाय धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे तसेच माहितीची उपलब्धता यांचाही लोकसंख्येच्या घनतेवर प्रभाव असतो.

लोकसंख्येच्या घनतेवरून एखाद्या प्रदेशात लोकसंख्या विरळ आहे कि दाटीवाटीने रहाते हे समजते. भारतात सन १९०१ मध्ये लोकसंख्येची घनता ७७ होती ती सातत्याने वाढत जाऊन सन २०११ च्या जनगननेनुसार ३८२ इतकी आहे. भारतात लोकसंख्येची घनता विविध राज्यात कमी-अधिक असलेली दिसून येते मुंबई, दिल्ली, कलकत्ता यासारख्या महानगरात लोकसंख्येची घनता जास्त असलेली दिसून येते. भारतातील बिहार, प. बंगाल, केरळ, उत्तर प्रदेश, हरियाना, तामिळनाडू, पंजाब, आंध्र प्रदेश या राज्यांमधील लोकसंख्येची घनता भारताच्या २०११ च्या सरासरी घनतेपेक्षा जास्त आहे. तर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान, जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश या राज्यातील लोकसंख्येची घनता भारताच्या सरासरी पेक्षा कमी आहे. सन २०११ मध्ये भारतात लोकसंख्येची सर्वोच्च घनता दिल्लीमध्ये ११३२० इतकी होती तर अरूणाचल प्रदेशाची घनता सर्वात कमी १७ इतकी होती.

पुढील कोष्टकावरून भारतातील लोकसंख्येची घनता कशी बदलत गेली आहे हे लक्षात येते.

**५) स्त्री-पुरूष प्रमाण :-**

दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे असणारे प्रमाण म्हणजे स्त्री -पुरूष प्रमाण होय. स्वातंत्र्योत्तर काळात पुरूषांच्या संख्येच्या मानाने स्त्रीयांच्या संख्येत घट होत गेल्याचे आढळते. भारतातील पुरूष प्रधान संस्कृतीमुळे पाश्चात्य राष्ट्रांच्या तुलनेने स्त्रीयांची संख्या कमी असल्याचे पुढील कोष्टकावरून दिसून येते.

**तक्ता क्र. ४.३**

**भारतातील लोकसंख्येची घनता**

| कालावधी | घनता |
|---|---|
| १९०१ | ७७ |
| १९६१ | १४२ |
| १९९१ | २६७ |
| २००१ | ३२५ |
| २०११ | ३८२ |

| घटकराज्य | घनता |
|---|---|
| दिल्ली | ११२९७ |
| छत्तीसगड | ९२५२ |
| महाराष्ट्र | ३६५ |
| अरूणाचल प्रदेश | १७ |
| अंदमान निकोबार | ४६ |

Source : Census of India - 2011

वरील कोष्टकावरून भारतातील स्त्री-पुरूष प्रमाणात घटीची प्रवृत्ती दिसून येते. सन २०११ मध्ये स्त्री-पुरूष प्रमाणात सुधारणा होतांना दिसते. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात केरळमध्ये १०८४ आणि पाँडेचेरीमध्ये

१०३७ इतके स्त्री पुरूष प्रमाण आहे. तर सर्वात कमी सिक्कीम राज्यात ८९० आणि केंद्रशाशीत प्रदेशात दमन-दिव मध्ये ६१८ इतके कमी असलेले दिसून येते.

**इ) साक्षरता प्रमाण :-**

देशातील लोकसंख्येच्या साक्षरता प्रमाणावरून त्या देशातील लोकसंख्येची गुणवत्ता स्पष्ट होते. साक्षरता प्रमाण हा भारतीय लोकसंख्येच्या अभ्यासाचा एक महत्वाचा घटक आहे. कारण साक्षर लोकसंख्येवरून देशातील लोकसंख्येच्या प्रगतीचा तांत्रिक दर ठरतो. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात साक्षरता प्रमाण खूपच कमी होते. युनोच्या मते व्यक्तीला लिहिता -वाचता येण्याच्या क्षमतेला साक्षरता असे म्हणतात. भारतात ६ वर्षापेक्षा मोठ्या व्यक्तीला किमान त्याच्या मातृभाषेतून लिहिता- वाचता येत असेल. तर अशा व्यक्तीला साक्षर असे म्हटले जाते. याचाच अर्थ ज्यांना लिहिता व वाचता येत नाही अशा व्यक्तींना निरक्षर असे म्हटले जाते. भारत सरकारने नियोजन काळात देशातील विविध वयोगटातील व्यक्तीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. १४ वर्षाच्या आतील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे तसेच मुलांना जेवण, शिष्यवृत्ती इ.योजना सुरू केल्या आहेत. यामुळे भारतातील साक्षरता प्रमाण वाढलेले दिसून येते ही बाब पुढील कोष्टकाने अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. ४.५**

**भारतातील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

| जनगणना वर्ष | एकूण साक्षरता | पुरूष साक्षरता | स्त्री साक्षरता |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ |
| १९६१ | २८.३३ | ४०.४० | १५.३५ |
| १९७१ | ३४.४५ | ४६.०० | २२.०० |
| १९८१ | ४३.७ | ५६.३८ | २९.५ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.३ |
| २००१ | ६४.८३ | ७५.८५ | ५२.१ |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.५ |

**Source : Census of India 2011**

**भारतातील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

कोष्टक क्र. ४.५ वरून असे दिसून येते की भारतात सन १९५१ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी केवळ ११.३३%लोकसंख्या साक्षर होती, त्यामध्ये २७.१६ % पुरूष तर केवळ ८.८६% स्त्रीयांचा समावेश होता. यामध्ये वाढ होत जाऊन सन २०११ पर्यंत एकूण साक्षरता प्रमाण ७४.४% इतके झाले. पुरूष साक्षरता (८२.१४% आणि स्त्री साक्षरता ६५.०५% पर्यंत वाढली. भारतातील वेगवेगळ्या राज्यात लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण कमी-अधिक असलेले दिसून येते. सर्वाधिक साक्षरता प्रमाण असलेले राज्य म्हणून ओळखल्या

जाणाऱ्या केरळमध्ये ९४% इतके साक्षरता प्रमाण आहे.या पाठोपाठ लक्षद्वीप-९१.८५% मिझोराम- ९१.३३% गोवा ८८.७०%इ. साक्षरता प्रमाण उच्च असणारी राज्ये आहेत तर बिहार - ६६.८२% अरूणाचल प्रदेश ६६.९५% व झारखंडमध्ये ६७.६३% इत्यादि साक्षरता प्रमाण कमी असणारी राज्ये आहेत.

तथापि भारत सरकारने साक्षरता प्रमाण वाढविण्यासाठी निरंतर प्रौढ साक्षरता कार्यक्रम - १९७८, राष्ट्रीय साक्षरता अभियान -१९८८, सर्वशिक्षा अभियान- २००१, बेटी बचाओ बेटी पढाओ -२०१५ यासारखे विविध उपक्रम सुरू केले आहेत.

**फ) लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी :-**

देशाच्या लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी केल्यास एकूण लोकसंख्येत कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण किती आहे हे समजते. सर्वसाधारणपणे ० ते १४ आणि ६० वर्षावरील व्यक्ती या काम करण्याच्यादृष्टीने अकार्यक्षम म्हणजेच अनुत्पादक मानली जाते. तसेच १५ ते ६० वयोगटातील काम करण्यास सक्षम असणाऱ्या लोकसंख्येला उत्पादक किंवा कर्ती लोकसंख्या म्हणतात. कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असेल तर परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण कमी असते. सध्या भारतात कर्ती लोकसंख्या अधिक असल्यामुळे भारत सर्वाधिक तरूणांचा देश ठरला आहे.ही बाब पुढील कोष्टकावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.६**

**लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी**

**वयोगट**

| वर्ष | ० ते १४ | १५ ते ६० | ६० पेक्षा अधिक |
|---|---|---|---|
| १९२१ | ३९.२ | ५९.६ | १.२ |
| १९३१ | ३८.४ | ६०.२ | १.५ |
| १९५१ | ३७.४ | ५७.१ | ५.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५४.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| २००१ | ३५.५ | ५८.२ | ६.३ |
| २०११ | २९.१ | ६५.४ | ५.५ |

**Source : Ashwini Mahajan Indian Economy - 2012**

**ग) लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी**

अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि विकासाची अवस्था समजण्यासाठी देशातील कर्त्या लोकसंख्येची विविध व्यवसायात कशा रितीने विभागणी झालेली आहे. हे अभ्यासणे उपयुक्त ठरते. भारतात व्यवसायानुसार प्रमुख तीन क्षेत्रात विभागणी केली जाते.

**१) प्राथमिक क्षेत्र –** प्राथमिक क्षेत्रात शेती, वन, पशूसंवर्धन, मासेमारी इ. व्यवसायांचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रावर निसर्गाची भूमिका फार महत्वाची ठरते.

**२) द्वितीय क्षेत्र –** यामध्ये लघु व मोठे उद्योगधंदे, बांधकाम, खाणी इ.चा समावेश होतो. शेती क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार पुरविण्याचे काम या क्षेत्रातून केले जाते.

**३) तृतीय क्षेत्र–** या क्षेत्रात वाहतूक दळण-वळण, व्यापार, शिक्षण, वैद्यकीय व्यवसाय, अभियांत्रिकी, बँक व्यवसाय इ.चा समावेश होतो. सेवांची निर्मिती करणाऱ्या सेवांचा या क्षेत्रात समावेश होतो.

**तक्ता क्र. ४.७**

**लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (टक्केवारी)**

| व्यावसायिक क्षेत्र | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ७२.१ | ७१.८ | ७२.१ | ६८.८ | ६६.७ | ५८.४ | ५२.२ |
| द्वितीय | १०.७ | १२.२ | ११.२ | १३.५ | १२.७ | १६.२ | २०.२ |
| तृतीय | १७.२ | १६.० | १६.७ | १७.५ | २०.५ | २५.४ | २७.३ |

**संदर्भ : महाजन अश्विनी भारतीय अर्थव्यवस्था**

**लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (टक्केवारी)**

**ह) लोकसंख्येची ग्रामीण आणि शहरी विभागणीः–**

देशातील एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि किती लोकसंख्या शहरी भागात राहते याची माहिती घेणे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे ठरते. कारण देशाच्या आर्थिक विकासाचा वेग, औद्योगिकरणाबरोबर नवीन औद्योगिक शहरांची संख्या वाढते ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतात. परिणामी शहरातील लोकसंख्या वाढते. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे होणारे स्थालांतर आर्थिक विकासाचे द्योतक मानले जाते. पुढील कोष्टकावरून भारतीय लोकसंख्येची ग्रामीण शहरी विभागणी कशी झाली आहे हे समजते.

**तक्ता क्र. ४.८**

**भारतातील शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण**

| वर्ष | ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण | शहरी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| १९०१ | ९८.०% | ११.०% |
| १९५१ | ८२.७ % | १७.३ % |
| १९६१ | ८२.० % | १८.० % |
| १९७१ | ८०.१ % | १९.९ % |
| १९८१ | ७६.७ % | २३.३ % |
| १९९१ | ७४.३ % | २५.७ % |
| २००१ | ७२.२ % | २७.८ % |
| २०११ | ६८.८५ % | ३१.१५ % |

**संदर्भ : जनगणना अहवाल, रजिस्ट्रार जनरल, भारत**

**स्वयं – अध्ययन प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. दरवर्षी ................ लोकसंख्येमागे मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर होय.

(अ) १०० (ब) १०,००० (क) १००० (ड) यापैकी नाही.

२. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी भारताच्या वाट्याला .................. इतकी जमिन आली आहे.

(अ) २०.४% (ब) ५.२% (क) २.४% (ड) यापैकी नाही.

३. युनोच्या मते व्यक्तीच्या लिहिता-वाचता येणाऱ्या क्षमतेला ...................... असे म्हणतात.

(अ) निरक्षरता (ब) घनता (क) साक्षरता (ड) यापैकी नाही.

४. भारतीय लोकसंख्येची ग्रामीण-शहरी विभागणी लक्षात घेता सध्या ग्रामीण भागात ........ लोकसंख्या राहते.

(अ) ३१.१५% (ब) ४०.०% (क) ६८.८५% (ड) यापैकी नाही.

**४.२.३ लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम –**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती, मानवी साधनसंपत्ती आणि

वित्तीय साधने या तीन प्रमुख घटकांवर अवलंबून असतो. यापैकी लोकसंख्या आणि आर्थिक विकास या दोहोत परस्पर संबंध असलेला दिसून येतो भारतात लोकसंख्या वाढीबरोबर श्रमपुरवठा वाढत असला तरी लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावर अनेक प्रतिकूल परिणाम होताना दिसतात.

अर्थतज्ञ कोलीन क्लार्क आणि एव्हरेस्ट हंगिन याच्या मते विकसनशील देशात मोठी आणि वाढती लोकसंख्या ही त्या देशाच्या विकासाला लाभदायक ठरते. सध्या प्रगत म्हणून ओळखला जाणाऱ्या अमेरिका,इंग्लंड जपान यासारख्या राष्ट्रात आर्थिक विकासाच्या काळात तेथील वाढत्या लोकसंख्येने हातभारच लावला होता. तथापी भारताच्या बाबतीत स्वातंत्र्योत्तर काळात भारतात घडून आलेली लोकसंख्यावाढ ही प्रतिकूल परिणाम करणारी ठरली आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गात वाढती लोकसंख्या कशी अडसर ठरली आहे. हे पुढीलप्रमाणे सविस्तर स्पष्ट करता येईल.

**लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील आघात –**

**१) राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्न :–**

भारताच्या राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्नातील वाढीच्या तुलनेने लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. दरडोई उत्पन्न म्हणजे त्या देशात राहणाऱ्या लोकांच्या वाट्याला येणारा राष्ट्रीय उत्पन्नातील सरासरी वाटा किंवा हिस्सा होय. राष्ट्रीय उत्पन्न वाढत असताना लोकसंख्या वेगाने वाढत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी होऊन दरडोई उत्पन्न कमी राहील.

भारतात चालु किंमतीनुसार दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न सन १९५०– ५१ मध्ये २६४ रू होते. ते सन १९८०–८१ मध्ये १८५२ रू., सन २००९–१० मध्ये ४६,१७७ रू. आणि सन २०१३–१४ मध्ये ७४,३८० रू. होते. अर्थात आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिल्यास भारताचे दरडोई उत्पन्न सन २००६ मध्ये ८२० होते. तर चीन चे २०१० आणि अमेरिकेचे ४४७० होते. यावरून भारताची लोकसंख्या स्थिर झाल्याशिवाय दरडोई उत्पन्नात वाढ दिसून येणार नाही.

**२) अन्नधान्य पुरवठा :–**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. हरित क्रांतीनंतर भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण बनला. तथापि, दरडोई प्रतिदिन उपलब्ध होणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण विशेष वाढू शकले नाही. कारण लोकसंख्या वेगाने वाढत गेली. सन २०११–१२ मध्ये दरडोई अन्नधान्य उपलब्धता ४६२.१ ग्रॅम इतकी होती. हे प्रमाण सन १९९० मध्ये ४८०.१ ग्रॅम होते. याचा अर्थ अन्नधान्य प्रतिव्यक्ती उपलब्धता फारशी वाढलेली नाही. गेल्या ६५ वर्षात अंदाजे अन्नधान्य उत्पादन ५.५ पटीने वाढले. परंतु दरडोई अन्नधान्य उपलब्धता केवळ १.२ पटीने वाढली याचे महत्वाचे कारण म्हणजे लोकसंख्या वाढ होय.

**३) बेरोजगारीत वाढ :–**

वाढती लोकसंख्या बेरोजगारी निर्माण होण्याचे एक महत्वाचे कारण बनले आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्नपुरवठ्यात वाढ होते. परंतू सर्वांनाच रोजगार मिळत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या वेगाने

रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. त्यापेक्षा अधिक प्रमाणात लोकसंख्येत वाढ झाली. राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार सन १९९३-९४ मध्ये बेरोजगारांची संख्या २०.१३ दशलक्ष होती. ती सन १९९९-२००० मध्ये २६.५८ दशलक्ष झाली. सन २०१६ मध्ये भारतात बेरोजगारीचा दर ३.५१ % इतका होता. तो सन २०१७ मध्ये ३.५२% इतका झाला. भारतात लोकसंख्या वाढीमुळे बेरोजगारीचा दर जास्त राहिला आहे.

**४) शेतजमिनीवर अतिरिक्त भार :-**

जगातील एकूण जमिनीपैकी भारताच्या हिश्याला केवळ २.४ % जमिन आलेली आहे. यामध्ये कोणतीही वाढ होत नाही. तथापि, गेल्या ७० वर्षात भारताची लोकसंख्या वेगाने वाढली आहे. या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येला सामावून घेईल इतक्या मोठ्या प्रमाणात देशातील औद्योगिक तसेच सेवा क्षेत्राचाही विकास झालेला नाही. त्यातही लोकसंख्या वाढीचा दर शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आहे. त्यामुळे शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडतो आहे. यातूनच शेतीच्या विभाजनाचा व तुकडीकरणाचा प्रश्न निर्माण होत आहे.

**५) अनुउत्पादक उपभोक्त्यांचा वाढता भार :-**

उत्पादनाला हातभार न लावता जे फक्त देशातील वस्तुंचा उपभोग घेतात. त्यांना अनुत्पादक उपभोक्ते असे म्हणतात. सामान्यपणे १४ वर्षाखालील मुले व ६० वर्षावरील जेष्ठ लोकांचा अनुत्पादक उपभोक्त्यात समावेश होतो. सन २००१ मध्ये ४१.८% एवढे अनुत्पादक उपभोक्त्यांचे प्रमाण होते. ते सन २०११ मध्ये ३७.५ % लोकसंख्या अनुत्पादक होती. एकूण लोकसंख्येमध्ये म्हणजेच १२१ कोटीपैकी ४५.३७५ कोटी लोकसंख्या अनुत्पादक होती. यावरून वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेवर अनुत्पादक लोकसंख्येचा प्रतिकूल परिणाम होत आहे.

**६) सामाजिक सोई-सुविधांवर ताण :-**

भारतात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक दळणवळण, वैद्यकीय सुविधा, पिण्याचे पाणी व वीजपुरवठा यासारख्या मुलभूत सोई-सुविधावर अतिरिक्त ताण होतो आहे. देशाच्या महानगरातून वाढत्या लोकसंख्येमुळे निवासांचा प्रश्न गंभीर बनला आहे. बचतीचे प्रमाण कमी असल्यामुळे आणि या सुविधांवर भरमसाट खर्च करावा लागत असल्यामुळे विकासात अडसर निर्माण झाला आहे.

**७) दारिद्र्यात वाढ :-**

भारतात वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि कृषीची अल्प उत्पादकता, औद्योगिकरणाचा मंद वेग, वाढती बेरोजगारी यामुळे लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. देशातील जवळपास ४०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन जगत आहे. दारिद्र्याच्या दृष्ट चक्रामुळे लोकांची कार्यक्षमता कमी होऊन आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो आहे.

**८) भांडवल संचय :-**

आर्थिक विकासासाठी भांडवल हा घटक महत्वाचा असतो. भारतात भांडवल संचयाचा दर कमी

असल्यामुळे पुनर्गुंतवणूकीचा दरही कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर लोकसंख्या वाढ होत असल्यामुळे दरडोई उत्पन्न वेगाने वाढताना दिसत नाही. परिणामी लोकांची बचतक्षमता कमी आहे. यामुळे भांडवल संचयावर प्रतिकूल परिणाम होतो.

### ९) स्त्री श्रम शक्तीचा अपव्यय :-

भारतात जननदर उच्च आहे. सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी १ कोटी ६० लाख स्त्रियांची प्रसूती होते. त्यामुळे प्रसुतीकाळात स्त्रिया काम करू शकत नाहीत. त्यांची श्रमशक्ती वाया जाते. मानवी संसाधनांचा हा अपव्यय मानवी विकासाला पायबंध घालतो.

### १०) लोकसंख्या वाढ व शाश्वत विकास :-

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमुळे वेगवेगळ्या प्रकारची साधन संपत्ती मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. भविष्यकाळातील पिढीला कोळसा, लोखंड, पेट्रोलियम पदार्थ यासारख्या मर्यादीत प्रमाणावर असलेल्या नैसर्गिक साधन सामुग्रीचा तुटवडा भासू नये यासाठी पर्यायी धोरण स्विकारावे लागते. परंतु याचवेळी वाढत्या लोकसंख्येचे पोषण करण्यासाठी या नैसर्गिक साधन संपत्तीचा बेसुमार वापर करावा लागत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. थोडक्यात शाश्वत विकासाच्या संकल्पनेत अपेक्षित असलेला मानवी विकास निर्देशांक सुधारण्याचे उद्दीष्ट गाठताना देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करून पर्यावरण समतोल राखणे कठीण बनले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न:**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. अर्थतज्ञ ------ यांच्या मते विकसनशील देशात मोठी आणि वाढती लोकसंख्या त्या देशाच्या विकासाला लाभदायक असते.

(१) कोलीन क्लार्क व एव्हरेस्ट हेगिन (२) अमर्त्य सेन

(३) केन्स (४) यापैकी नाही

२. भारतात लोकसंख्या वाढीचा वेग देशाच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न वाढीपेक्षा ------ राहीला आहे.

(१) कमी (२) जास्त (३) सारखा (४) यापैकी नाही

३. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीचा दर ----------------- राहीला आहे.

(१) जास्त (२) कमी (३) समान (४) यापैकी नाही

### ४.२.४ भारताचे लोकसंख्या विषयक धोरण :

भारताची सध्याची लोकसंख्या आकाराने खूपच मोठी आहे आणि लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असल्यामुळे भारतात लोकसंख्येचा प्रश्न गंभीर बनला आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांशी लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे देशातील आर्थिक व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी

लोकसंख्येचा प्रश्न सोडविणे आवश्यक ठरले आहे. यासाठी भारत सरकारने लोकसंख्या विषयक धोरण आखून त्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते.

लोकसंख्याविषयक धोरण म्हणजे लोकसंख्येचा आकार व रचना याविषयी सरकारने आखलेले धोरण होय. सामान्यत: देशातील आर्थिक विकासाला भरीव मदत व्हावी. यासाठी लोकसंख्येचा आकार व रचना यावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने आवश्यक व योग्य अशा लोकसंख्यावाढीच्या दराची नीती आखणे म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

**व्याख्या :–**

**१) स्पेगलर व डंकन–** 'लोकसंख्येचा आकार आणि रचना याबाबत सरकारने निश्चित केलेल्या उद्दिष्टांचा समूह व ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपयोगात आणलेली साधने म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.'

**२) थॉमसन आणि लेविस –** 'एखाद्या लोकसंख्या समूहाची स्वत:ची संख्या आणि वैशिष्ट्ये नियंत्रित ठेवण्यासाठी अंमलात आणली जाणारी हेतूपूरस्सर योजना म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.'

थोडक्यात लोकसंख्या धोरणात लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यावर भर दिला जातो. शिवाय लोकांचे आयुर्मान वाढविण्यासाठी ठरविलेली उद्दिष्टये व आखलेल्या योजनांचा कार्यक्रम म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

**लोकसंख्याविषयक धोरणाची उद्दिष्ट्ये :**

१) देशातील जननदरात घट घडवून आणणे.

२) लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे.

३) लोकांच्या गुणवत्तेत व कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणणे.

४) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे.

५) मृत्यूदरात घट घडवून आणणे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंख्याविषयक धोरणाची वैशिष्ट्ये :**

**१) कुटुंबनियोजन कार्यक्रम –**

कुटुंबनियोजन कार्यक्रम राबविणारा भारत हा पहिला देश आहे. सन १९५२ पासून कुटुंबनियोजन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रारंभी जननदर कमी करण्यासाठी उपाय योजण्यात आले. तद्नंतर माता–बालक स्वास्थ्य, पोषण आहार व कुटुंबकल्याण या बाबींचा समावेश करण्यात आला.

**२) राष्ट्रीय आणीबाणीचा कालावधी (१९७५–७७) –**

भारतात १९७५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळात सरकारने संजयगांधीचा चार कलमी कार्यक्रम आणि इंदिरा गांधीच्या २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत लोकसंख्या नियंत्रणाचा सक्तीचा कार्यक्रम

राबविला. त्यामध्ये निर्बिजीकरणाच्या शस्त्रक्रिया, आणीबाणीच्या दोन वर्षात ६.२ दशलक्ष पुरूष नसबंदी करण्यात आल्या. कुटुंबनियोजनाचे उद्दिष्ट १००% पेक्षा जास्त पूर्ण करण्यात आले.

**३) कुटुंबकल्याण कार्यक्रम –**

भारत सरकारने कुटुंबकल्याण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागावर या कार्यक्रमाचे केंद्रीकरण करण्याचे ठरविण्यात आले. कुटुंबकल्याण कार्यक्रमाची इतर आरोग्य योजनांशी सांगड घातली. 'लहान कुटुंब, सुखी कुटुंब' या विषयी जनजागृती केली. मुलींच्या शिक्षणाला महत्व देण्यात आले. मुलामुलींचे विवाहाचे वय अनुक्रमे २१ व १८ वर्षे निश्चित करण्यात आले. तसेच रेडिओ, दूरदर्शन, मासिके, वर्तमानपत्रे इ.वर या कार्यक्रमाचा प्रचार करण्यात आला.

**४) सन १९८१ ते सन २००० पर्यंतचे लोकसंख्याविषयक धोरण :**

या काळात नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या कार्यकारी गटाने लोकसंख्येबाबत पुढीलप्रमाणे उद्दिष्टे सुचविली यात प्रामुख्याने कुटुंबाचे सरासरी आकारमान २ ते ३ मूलापर्यंत ठेवणे, जननदर २१ पर्यंत कमी करणे, प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करणे, सरासरी मृत्यूदरात घट घडवून आणणे, माता व अर्भक दरात घट घडविणे, तसेच परिचारिका प्रशिक्षण राबविणे इ.चा समावेश होतो.

या बरोबरच शासकीय संस्था, सामाजिक मंडळे, शाळा–महाविद्यालये, राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामार्फत संतती नियमनाचा प्रचार करण्याचा कार्यक्रम राबविला.

**सन २००० मधील भारताचे लोकसंख्याविषयक धोरण :–**

१५ फेब्रुवारी सन २००० रोजी भारत सरकारने नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहिर केले. या धोरणात आरोग्यविषयक सेवांची सुलभ उपलब्धता, संतती नियमन, माता आरोग्य, अर्भक मृत्यूदर कमी करणे यासारख्या तरतूदी करण्यात आल्या. दोन मुलांचे कुटुंब आणि सन २०४६ पर्यत लोकसंख्या स्थिर करणे ही प्रमुख उद्दिष्टे ठेवून या धोरणाची आखणी करण्यात आली. कारण भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्याकरिता आणि उत्पन्नाचे समान वितरण करण्यासाठी लोकसंख्या स्थैर्य आवश्यक आहे. हे ओळखून धोरण जाहीर करण्यात आले.

**धोरणाची उद्दिष्टे :–**

सन २००० मधील धोरणांच्या उद्दिष्टाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) **अल्पकालीन उद्दिष्टे :–** यामध्ये नागरिकांना आरोग्याच्या सोई पुरविणे, संतती नियमनाची साधने पुरविणे, प्रजनन क्षम वयोगटातील स्त्रीया आणि मुलांना आरोग्याच्या सेवा पुरविणे, तसेच सुरक्षित प्रसुतीच्या सोई देणे इ. चा समावेश होतो.

२) **मध्यमकालीन उद्‌दिष्टे** :– सन २०१० पर्यंत एकूण प्रजनन (Total Fertility Rate) दर २०१ इतका कमी करणे.

३) **दीर्घ मुदतीची उद्दिष्टे** :– सन २०४६ पर्यत भारतीय लोकसंख्या नियंत्रीत करून लोकसंख्या स्थिर करणे.

**लोकसंख्या धोरणाची लक्ष्ये :-**

सन २००० च्या लोकसंख्या धोरणात पुढील लक्ष्ये ठेवण्यात आली.

१) प्रतिलाख जन्मामागे माता मृत्यूदर १०० पेक्षा कमी करणे.

२) मुलींचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे ठरविण्यात आले.

३) १००० बालकामध्ये अर्भक मृत्यूदर ३० पेक्षा कमी करणे.

४) सुरक्षित गर्भपाताच्या सोईंचा विस्तार करणे.

५) बालकांना लसीकरण मोहिमे अंतर्गत सर्व प्रकारच्या रोगप्रतिबंधक लसींची सोय करणे.

६) जन्म, मृत्यू, विवाह इ.च्या १०० % नोंदी करणे.

७) दोन अपत्यांचे कुटुंब यासाठी प्रोत्साहन देणे.

८) कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिक लोकाभिमुख बनविणे.

**लोकसंख्या धोरणाची वैशिष्ट्ये :-**

**१) सन २०४६ पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे :** सन २००० च्या लोकसंख्या धोरणाचे हे एक महत्वाचे वैशिष्ट आहे. देशातील शुद्ध जननदर कमी करून सदृढ माता बालकांची संख्या वाढविण्यावर या धोरणात भर दिला आहे. देशातील लोकसंख्या वाढीचा वेग कमी करून लोकसंख्येत स्थैर्य प्रस्थापित करणे साठी ग्रामपंचायत, निमसरकारी संस्था, खाजगी डॉक्टर्स इ.चे सहाय्य घेतले जाईल.

**२) ग्रामीण भागात आरोग्याच्या सोई वाढविणे :** ग्रामीण भागात आरोग्यविषयक सोईची असलेली कमतरता दूर करून प्रसुतिविषयक सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

**३) विवाह, जन्ममृत्यूच्या नोंदी** : या धोरणानुसार विवाह व जन्म आणि मृत्यूच्या नोंदी काटेकोरपणे केल्या जाणार आहेत. प्रसुतीकाळात मृत्यू पावणाऱ्या महिलांची नोंद घेतली जाईल.

**४) महिलांना सकस आहार पुरविणे** : महिलांना पोष्टीक व सकस आहार मिळत नाही. तसेच अल्पवयीन विवाह, निरक्षरता, अंधःश्रद्धा, कुपोषण आणि लहान वयात प्रजननास सुरवात इ. मुळे त्यांचे आरोग्य चांगले राहत नाही. यासाठी त्यांना सकस आहार उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

**५) बालमृत्यू कमी करणे** : या धोरणात बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यावर भर देण्यात आला. गरोदर महिलांना प्रतिबंधात्मक लस पुरविण्याचे ठरविण्यात आले.

**६) राष्ट्रीय लोकसंख्या समिती** : या धोरणात राष्ट्रीय लोकसंख्या समिती स्थापन करण्यात आली. देशाचे पंतप्रधान या समितीचे अध्यक्ष असतील. राज्यपातळीवरही या पद्धतीच्या समित्या कार्यरत असतील.

**लोकसंख्या धोरणाचे मूल्यमापन :–**

**सन २००० मधील लोकसंख्या धोरणाचे टीकात्मक परिक्षण पुढीलप्रमाणे करता येईल.**

१) डॉ. नीना पुरी (भारतीय कुटुंबनियोजन संघटनेच्या अध्यक्ष)

यांच्या मते हे धोरण कुटुंब नियोजनाच्या बाबतीत पुरूषांच्या सहभागाबाबत सौम्य असल्याची टीका केली आहे.

२) या धोरणाने कुटुंब मर्यादित ठेवण्याची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रीयांवर सोपविण्यात आली आहे. अशी टीका केली जाते.

३) कुटुंबनियोजन कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करण्यात आली परंतू पुरेशा प्रमाणात खर्च न झाल्याने कुटुंबनियोजन कार्यक्रमाला अपयश आले अशी टीका केली जाते.

४) कुटुंब नियोजन कार्यक्रम लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या प्रयत्नांना यश आले नाही. त्यामुळे हा कार्यक्रम सरकारचा कार्यक्रम बनला.

५) केंद्र सरकारने आखलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात देशातील अनेक राज्यांना अपयश आले. त्यामुळे हे धोरण केंद्र सरकारचेच राहिले. थोडक्यात लोकसंख्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक होते. तसेच या कार्यक्रमामध्ये लोकसहभाग महत्वाचा होता. परंतू या बाबतीत अपयश आल्याने लोकसंख्या धोरण प्रभावी ठरले नाही.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :–**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) लोकसंख्येचा ........... याविषयी सरकारने आखलेले धोरण म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

(अ) आकार व रचना (ब) घनता (क) साक्षरता (ड) यापैकी नाही.

२) लोकसंख्या धोरणात लोकसंख्या ....................................... कमी करण्यावर भर असतो.

(अ) साक्षरता दर (ब) निरक्षरता दर (क) वाढीचा दर (ड) यापैकी नाही.

३) .................................. रोजी भारत सरकारने नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर केले.

(अ) १५ ऑगस्ट १९४७ (ब) १ जानेवारी १९५० (क) १५ फेब्रुवारी २००० (ड) यापैकी नाही.

**४.३ सारांश :**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात त्या देशातील उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्या हे घटक महत्वाचे असतात. भारतात हे दोन्ही घटक विपूल प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि भारतातील नैसर्गिक साधन संपत्तीच्या तुलनेने भारताची लोकसंख्या अतिरिक्त आहे. लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकसंख्येचे आकारमान वेगाने वाढत गेलेले दिसून येते. जगातील इतर देशांचा विचार करता भारतीय लोकसंख्या वाढीचा दर अद्यापही उच्च असलेला

दिसून येतो. भारतीय लोकसंख्या वेगाने वाढ होण्यास जबाबदार असलेल्या कारणांमध्ये उच्च जननदर आणि वेगाने घटत असलेला मृत्यूदर, विवाहाची सार्वत्रिक प्रथा, बालविवाहाची पद्धत, भारताचे हवामान, बहुपत्नीत्व, निरक्षरता, एकत्र कुटुंबपद्धती, अंधःश्रद्धा, सामाजिक जागृतीचा अभाव, आरोग्याच्या सोई-सुविधात वाढ तसेच कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे अपयश इ. विविध कारणे असलेली दिसून येतात.

भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये विचारात घेता भारतात कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे भारताची ओळख सर्वाधिक तरूणांचा देश अशी बनलेली दिसून येते. भारतीय लोकसंख्येची ग्रामीण -शहरी विभागणी अभ्यासता अद्यापही सत्तर टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. भारतात शहरीकरणाचा दर कमी आहे. लोकसंख्येची क्षेत्रिय विभागणी विचारात घेता मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात काम करते आहे. उद्योग क्षेत्राच्या मंद वाढीमुळे औद्योगिक क्षेत्रात तुलनेने कमी काम करताना दिसते. अर्थात अलिकडील काळात सेवा क्षेत्राचा विस्तार होऊ लागल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. भारतातील लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढत असून विशेषतः स्वातंत्र्यानंतर घनता वेगाने वाढली आहे. तथापि भारतात सर्वत्र ती एकसारखी नसून दिल्लीमध्ये ती सर्वाधिक आहे. तर अरूणाचल प्रदेशात ती सर्वात कमी असलेली दिसून येते. लोकसंख्येची घनता वाढत असल्याने सामाजिक मुलभूत सुविधांवर अतिरिक्त ताण येतो आहे. भारतीय लोकसंख्येचे सरासरी आयुर्मान आणि साक्षरता प्रमाण स्वातंत्र्योत्तर काळात वाढले आहे. मात्र भारतातील स्त्रियांचे सरासरी आयुर्मान आणि साक्षरता प्रमाण पुरूषांच्या तुलनेत अद्यापही कमी असलेले दिसून येते. त्यामध्ये वाढ घडून येणे आवश्यक आहे.

लोकसंख्या वाढीचा भारताच्या आर्थिक विकासावर बहुतांशी प्रतिकूल परिणाम होतांना दिसून येतो. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊनही लोकांचे दरडोई उत्पन्न त्याप्रमाणात वाढलेले दिसून येत नाही. लोकसंख्येचा शेतीवरील अतिरिक्त भार, वाढती बेरोजगारी, अनुत्पादक उपभोक्त्यांची वाढ, मुलभूत सोई-सुविधांवर ताण निर्माण झाला आहे. भांडवल निर्मितीच्या दरावर प्रतिकूल परिणाम, स्त्रियांच्या श्रमशक्तीचा अपव्यय, दारिद्रयात वाढ इ. गंभीर परिणाम होत असलेले दिसून येतात. परिणामी भारताच्या आर्थिक विकासात अडसर निर्माण होतो आहे. भारताची लोकसंख्या अशीच वाढत राहीली तर नियोजनामुळे मिळणारे फायदे भारतीय समाजाला मिळणार नाहीत. यासाठी भारत सरकार लोकसंख्या विषयक धोरण राबविताना दिसते.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात श्री. आर. डी. कर्वे, म. गांधी, पं नेहरू, रविंद्रनाथ टागोर यांनी लोकसंख्या नियोजनाबाबत कार्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या सुरवातीपासूनच स्वतंत्र असे लोकसंख्याविषयक धोरण आखले आणि त्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या नियंत्रणासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून खर्चाची तरतूद केली आहे. तथापि लोकसंख्या नियंत्रणात भारत सरकारला फारसे यश आलेले नाही. यासाठी सरकार बरोबरच देशातील स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्था, खाजगी उद्योग इ. नी सामाजिक कल्याणाच्या हेतूने हा कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने राबविणे आवश्यक आहे. असे झाले तर लोकसंख्या वाढ रोखणे शक्य होऊन भारताची आर्थिक प्रगती वेगाने घडून येईल.

**४.४ पारिभाषिक शब्दांचा अर्थ :**

१) शिरगणती – जनगणना किंवा लोकसंख्येची मोजदाद करणे.

२) नैसर्गिक संसाधने – मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी आणि निसर्गत: विनामूल्य उपलब्ध असणारी साधने.

३) अनुत्पादक – उत्पादन कार्यात सहभागी नसणारे.

४) दरडोई उत्पन्न – देशातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी उत्पन्न.

५) पंचवार्षिक योजना – आर्थिक विकासासाठी सरकारने पाच वर्षाच्या काळासाठी तयार केलेली योजना.

**४.५ स्वयंअध्यन प्रश्नांची उत्तरे :**

**४.२.१ –** i) 3

ii) 4

iii) 2

iv) 1

**४.२.२ –** i) 3

ii) 1

iii) 3

iv) 3

**४.२.३ –** i) 1

ii) 2

iii) 1

**४.२.४ –** i) 1

ii) 3

iii) 3

**४.६ सरावासाठी प्रश्न :**

**(अ) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येची कारणे स्पष्ट करा.

२) भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये लिहा.

३) भारतीय लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील परिणाम स्पष्ट करा.

४) इ.स २००० मधील भारताचे धोरण स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा :**

१) जन्मदर व मृत्यूदर

२) लोकसंख्येची क्षेत्रिय विभागणी

३) लोकसंख्येचे आकारमान

४) लोकसंख्येची ग्रामीण-शहरी विभागणी

५) स्त्री-पुरूष प्रमाण

६) लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास

७) भारताचे लोकसंख्याविषयक धोरण

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


i) Ruddar Datt & K. P. M. Sundharam (2004) Indian Ecomomy S. Chand & Company Ltd, Ram Nager New Delhi 110055

ii) डॉ. घाटगे, एल. एन. आणि डॉ. वावरे, ए. के. (२०१०) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन १३१२, शिवाजीनगर, पुणे - ४११००५

iii) ए. बी. सवदी आणि पी. एस. कोळेकर, १९९५ मानवी लोकसंख्या भूगोल निराली प्रकाशन ४१ बुधवार पेठ, पुणे - ४११००५

iv) Census of India - 2011 Govt. of India

v) डॉ. देसाई व डॉ. सौ. भालेराव १९९८ भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन ४१, बुधवार पेठ, पुणे - ४११००५ बी. ए. भाग - १ : भारतीय अर्थव्यवस्था-३.


***